रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, १७ सप्टेंबर २०२३



# 'जुलमी' निजामशाहीचा अंत ?

आधुनिक केसरी

भारतात सनातन धर्म, हिंदू संकृती, परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न सातव्या शतकापासून सुरु झाला.मोगल आणि इंग्रजानी भारतात अनेक वर्षे राज्य करून तेच केले. हैद्राबादच्या संस्थान निजाम हा हिंदू व्देष्टा होता. त्याचे तर संस्थानला 'इस्लाम राष्ट्र' करण्याचे स्वप्न होते. यासर्व सम्राटांची भारतातील हिंदू धर्म नष्ट करण्याची मानसिकता होती.पण हिंदु धर्म तर नष्ट झाला नाहीच, पण त्यांचे सामाज्र गेले,वंशही बुडाला. त्याप्रमाणे हैदाबादच्या निजामशाहीचा १७ सप्टेंबर १९४८ ला अंत झालेला आहे. याला भारतातील दुसरे स्वातंत्र्य म्हणावे लागेल! आज मराठवाड्यातील तरुण पिढीला विचारले "तुम्हाला स्वातंत्र्य कधी मिळाले ?

तर लगेच उत्तर मिळेल!! १५ ऑगस्ट १९४७! यात त्यांची चूक नाही, महाराष्ट्र शासनाची आहे. कारण त्यांना हैद्राबादच्या स्वातंत्र्य लढा शिकवला गेलाच नाही. हैद्राबाद संस्थान लढा मोठा आणि रक्तरंजित इतिहास आहे. पण आजही महाराष्ट्र शासन व विचारवंत व पत्रकार या लढ्याला 'मराठवाडा मुक्ती संग्राम' असे म्हणतात! जो लढा कधीच झालेला नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा ५६५ राजांनी संस्थाने होती. या संस्थानाना भारतात सामील करणे, हा कठीण प्रश्न होता. देशाचे गृहमंत्री सरदार वल्लभाई पटेल यांचकडे जबाबदारी देण्यात आली होती. त्यांनी साम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून ही संस्थाने भारतात विलीन केली. त्यांचेमुळे भारत जोडला गेलेला आहे. आज मणिपूरच्या घटनेवर राजकारण केले जातेय. तेव्हा मणिपूरचे संस्थान भारतात सहज सामील झालेले नाही. आम्ही भारतीय वंशाचे नसून थायी वंशाचे आहोत, तेंव्हा ब्रिटीशांनी बळजबरीने जखडून ठेवले आहे,असा राजाचा आक्षेप होता. या संस्थानचे विलीनकरण करण्यात आले. तेंव्हा देशाची सीमा आखताना काही प्रदेश ब्रह्मदेशाला दिला गेला. यातून मणिपुरला बंडाळी सुरु झाली.तो वाद आजही चालूच आहे. तेव्हा जुनागडचा पण जम्मू -काश्मिर व दक्षिणचे हैद्राबाद संस्थान भारतात सामील होण्यास तयार नव्हते. नंतर जम्मू -काश्मिरचे राजा हरीसिंह यांनी भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरूंनी काश्भिर प्रश्न स्वतः कडे घेतला होता.पण त्यांच्या नीतीमुळे जम्मू -काश्मिरचा प्रश्न डोकेदुखी होऊन बसला होता. जुनागड राजा नवाब महाबत खान आणि हैद्राबाद संस्थानचा निजाम हे मीर उस्मान अली खान हे होते.यांच्या राज्यात प्रजा बहुसंख्य हिंदु,तर राजे मुस्लिम होते. या दोन राजांची मानसिकता पाकिस्तानमध्ये जाण्याची होती. जुनागड सर्वमतानंतर भारतात विलीन झाले. पण हैद्राबाद संस्थानच्या विरोधात लढा द्यावा लागला.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850


दक्षिणेत सेनापती मीर करुउद्दीन उर्फ निजाम- उल मुल्क याने बंड करुन १७२४ मध्ये निजामशाहीची स्थापन केली. त्याची हैद्राबाद (भागानगर) ही राजधानी होती. निजामशाहीत सात राजे होवून गेले. यात सातवा निजाम मीर उस्मानअली खान हा शेवटचा. तो कट्टर धर्मांध, कपटी, महत्वाकांक्षी दुराग्रही होता. या निजामाला नेहरू यांनी दि. २७ ऑगस्ट १९४७ रोजी पत्र पाठविले. त्यात त्यांनी सर्वसंमती घेवून संस्थान भारतात सामील होण्याची सुचना केली होती. पण निजामाने भारतात सामील होण्यास नकार दिला.त्यांचा' संस्थान स्वतंत्र इस्लाम राष्ट्र' निर्माण करण्याचा मनुसबा होता. निजामांनी निर्बंध अधिकार व 'सत्ताधीश' म्हणून २२४ वर्षे राज्य केले. या हैद्राबाद संस्थानात हैद्राबादचे आठ तर



कर्नाटकचे तीन, मराठवाड्यातील पाच जिल्हे त्यात औरंगाबाद बीड, परभणी, नांदेड व उस्मानाबाद (धाराशीव) समावेश होता.हैदाराबाद संस्थानची एकूण लोकसंख्या१ कोटी ६० लाख होती.त्यात ७० टक्के हिंदू व १८ टक्के दलित व केवळ ११ टक्के होते. मुस्लिम व अन्य धर्माचे होते. तेलगू व कन्नडी व मराठी बोलीभाषा अधिक होती. परंतू राज्याची शासकीय उर्दू होती व राजधर्म इस्लाम सत्ता म्हणुन होता. निजामाचे भाकरी चिन्ह असलेला पिवळा ध्वज होता. निजाम हा गर्भ श्रीमंत होता पण जनता दारिद्र्यात खितपत पडलेली होती.मुस्लिम लोकांना 'अनल मलिक' या सिध्दातांनुसार हे (दारुल इस्लाम) इस्लाम राष्ट्र व आपण त्याचे भागिदार आहोत, असे वाटत होते. या निजामाने राज्यात मुस्लिमांचे वर्चस्व निर्माण केले,यातून हिंदुचा अतोनात छळ होत गेला. हैद्राबादची "रियासत' टिकवायची असेल तर मुस्लिमांची बहुसंख्य होणे आवश्यक आहे, अशी त्याचे म्हणत असे. तेव्हा राज्यात धर्मांतर हे शासकीय व राजकीय कार्यक्रम म्हणून घेतला जात असे. हिंदूना राजकीय व सामाजिक अधिकार नव्हते.शासकीय नोकरीत मुसलमानांना ८० टक्के संधी होती. हिंदू व इतर धर्मियाना दिली जात नव्हती. हिंदू धार्मिक स्वातंत्र्यावर हुकुम काढुन निर्बंध लादले.यात हिंदूनी मंदिरे बांधू व दुरुस्ती नयेत. मस्सिदीसमोर वाद्य वाजू नयेत. तेव्हा देशात लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली.निजाममाने आपल्या त्यावर बंदी घातली होती. शाळेत मुलांना उर्दू भाषेत शिक्षण घेणे बंधनकारक होते. निजामाची स्तुती करणारे राष्ट्रगीत शाळेत प्रार्थनेच्यावेळी म्हंणणे सक्तीचे होते. तेव्हा भारतात 'वंदे मातरम् व 'भारत माता की जय' या घोषणा स्वातंत्र्याची चळवळीसाठी जीव की प्राण होता. पण निजाम सरकारने या घोषणांवर बंदी घातली. तकेच नव्हे या घोषणा देणाऱ्यांवर राज्यद्रोहाची कारवाई केली जायची! चाबकाचे फटके मारले जायचे. निजामाला'आला हजरत' असे म्हंटले जायचे! हे केवळ हिंदूचा नव्हे दलितांचाही छळ केला जात असे दलितांसाठी 'पस्त अकवास'फंड निर्माण केला. तो धर्मांतरासाठी वापरला जायचा. तेंव्हा धर्मातरासाठी शासकीय कार्यालय उघडले होते. डॉ. आंबेडकर यांनी दलितांना मुस्लिमांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता.'सवर्णाकडून दलितांवर अन्याय झाला, हे जरी खरे असले तरी मुस्लिम आपले हितकर्ते होऊ शकत नाहीत'हे जे म्हटले, हे लक्षात घेतले पाहिजे. सातवा निजाम श्रीमंत होता, तो तेवढाच कंजुष होता. त्याने एकच शिरवाणी १७ वर्षे वापरली होती. त्याच्या जनानखाण्यात ४२ बायका, ५० मुले व ४६ नातू होते. 'मुसलमानों का तेरी सल्तनतसे नशा बाकी' अशी ग्वाही दिली जायची! निजामाने हिदुंना चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.त्याने १९१७ मध्ये पाच धार्मिक आदेश काढून हिंदुची मुस्कटदाबी केली. तसेच निजाम राजवटीत हत्या, लूट, बलात्कार या घटना सामान्य बाब होती. हा अन्याय हिंदूंनी सुमारे २२४ वर्ष सहन केला. कडवा नेता बहाद्दूर यार जंग याने १९३८ ला 'मजलिस ए-इत्तेहादूल मुस्लिमीन (म्हणजे मुस्लिम एकता) संघटनेची स्थापना केली. तो भडकावू भाषण देण्यास प्रसिध्द होता. या संघटनेचे ५० हजार सदस्य होते. या संघटनेचा उद्देश हिंदूना इस्लाम धर्म स्विकारण्यास भाग पाडणे हेच काम करत असे. त्याला निजामाची साथ होती. त्याच्या मृत्यूनंतर या संघटनेचे सूत्रे १९४६ मध्ये कासीम रिझवी याच्याकडे आली. तो रझाकाराचाही प्रमुख नेता होता. रझाकार हा अरबी शब्द. मराठीत त्याचा 'स्वयंसेवक' असा अर्थ होतो. कासीम रझवी हा लातूरला वकील होता. तो निजामाच्या संपर्कात आला. तो त्यांचा सल्लागार बनला. त्याने निजामाला भारतात सामील न होण्याचा सल्ला दिला.आपण भारताच्या दवाबाखाली यावयाचे नाही,आपण त्यांचा मुकाबला करु शकतो,असा विश्वास दिला होता.सरकारने आमच्यावर दबाब आणला हिंदूची कत्तल करू,अशी वल्गना केली होती.यासाठी मुस्लिग लिग व पाकचे संस्थापक बॅ.जीना यांनी निजामाला २० कोटीचे कर्ज दिले.रिझवीने २ लाख खासगी अर्धसैनिक दल म्हणजे रझाकाराची फौज उभी केली होती.निजामाचे याला प्रोत्साहन मिळत असे!.निजाम व रिझवी याच्या हिंदू अत्याचारामुळे राजवटीच्या विरोधात उठाव सुरु झाला.त्याने हा उठाव मोडीत काढण्यासाठी रझाकारांना गावो- गावी पाठविले.या टोळीने राज्यात हत्या,लूट, बलात्कारांचे थैमान घातले.या संस्थानमध्ये हिंदू जनतेवर अत्याचार घटना वाढत चालले होते.तेंव्हा स्वामी रामानंदतीर्थ यांनी दिल्लीत भारतीय नेत्यांची भेट घेतली व हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली.या हैद्राबाद संस्थानच्या विरोधात स्वामीजीच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद मुक्ती लढा उभारला.या लढ्यात हजारो तरुण सहभागी झाले!त्यांनी रझाकारच्या विरोधात मुकाबला केला. अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती








दिली. या लढ्यात हजारो रझाकारांना व रोहिल्यांना थेट 'जहन्नम'ला पाठविले गेले. हैद्राबाद जळत असताना गृहमंत्री सरदार पटेल यांनी भारतीय सैनिक पाठवून निजाम संस्थानला चोहोबाजूने घेरले, याला 'पोलिस ॲक्शन' म्हंटले जाते. शेवटी सातवा निजाम हा शरण आला व त्याने भारतात सामील होण्याचे मान्य केले.ही माहिती रेडिओवरुन देण्यात आली. हैद्राबादला स्वातंत्र्य मिळाले पण मुक्तीदाता स्वामीजी मात्र जेलमध्ये होते. नंतर त्यांना मुक्त करण्यात आले. यावेळी रझाकारी क्रूर नेता रिझवी याला अटक करण्यात आली. नंतर त्याला ३८ तासात भारत सोडून पाकला जाण्याच्या अटीवर सोडले. तो पाकला गेला व तेथे त्याचा मृत्यू पावला. त्याचे कुटुंब भारतात होते. निजामाचा शेवटचा आठवा वंशज मीर बरकत अली हा १५ जानेवारी २०२३ तुर्कीमध्ये एका खोलीत मृत्यू पावला. त्याची स्वतः च्या 'वतनात' दफन करण्याची शेवटची इच्छा होती त्यामुळे त्याचा मृतदेह हैद्राबादला म्हणजे भारतात आणला होता. त्याचेवर (सुपूर्द -ए -खाक ) दहनविधी करण्यात आला. तेंव्हाही त्याच्या कबरीवर फुले वाहण्यासाठी तेलंगणाचे मुख्यमंत्री के.सी.आर. आणि ए.आय एम. आय. एम. चे नेते औवैसी गेले होते. हैद्राबाद मुक्ती दिन हा केवळ मराठवाड्यात साजरा केला जातोय. पण हैद्राबाद, तेलंगणा व कर्नाटक राज्यात साजरा केला जात नाही, हे दुर्देव आहे. हैद्राबाद मुक्ती संग्राम लढ्यातील स्वातंत्र सैनिकांची संख्या मोठी आहे. यात दलित व महिलांचे मोठे योगदान आहे. तसेच मुस्लिम तरुण पत्रकार शोअबउल्ला खान हा' इमरोज' नावाचे वृत्तपत्र चालवित असे. तो निजाम जुलमी राजवटीवर सतत लिहावयाचा. त्यामुळेच रझाकारांनी दहशत निर्माण करण्यासाठी त्याला भर चौकात गाठले व खांद्यापासून हात तोडले व धड कापून कापून हत्या केली. आज त्यांनाही शहीद मानले जाते. गोविंदराव पानसरे यांचीही याच पध्दतीने हत्या केली गेली. शोअब यांचे नाव नांदेड येथील स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाच्या सभागृहाला देण्यात आले आहे. भारताने या लढ्यानंतर श्बेतपत्रिका काढली होती. त्यानुसार हैद्राबाद संस्थानच्या लढ्यात सुमारे १४४१ खेड्यातून १७ कोटी ८५ हजार ३८७ रुपायांची लूट केली गेली. तर ८ हजार ७८८ घरे जाळण्यात आली. ९२१ जणांच्या हत्या करण्यात आल्या व हजाराच्यावर बलात्काराच्या घटना घडल्या, अशी आकडेवारी आहे. पोलिस ॲक्शननंतर या भागात मोठा हिंचाचार झाला. त्याबाबत सुंदरलाल समितीच्या अहवालात अंदाजे २७ ते ४० हजार मुस्लिम मारले गेले, असे म्हंटले आहे. पण ते सर्व रझाकार, गुंड होते, असे म्हणणे आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामानंतर बहुसंख्य मुस्लिम बांधव मराठवाड्यात राहिला आहे,पण हिंदू नेत्यांनी बदला व सूडभावनेने वागले जात नाही. सापत्न वागणूक दिली जात नाही अथवा राज्य शासन भेदभाव करत नाही. भारतावर मोगल, इंग्रज, निजाम या परकीय राजांनी इस्लाम धर्माचा विस्तार करणे, हिंदू धर्म, संस्कृती,परंपरा नष्ट करण्याचे काम केले आहे. भारताचे विभाजन हे मुस्लिम लिगचे नेते आणि बॅ. महमदअली जीना यांच्या "स्वतंत्र इस्लाम राष्ट्राची या मानसिकतेमुळे झाले विभाजनामुळे लाखोंचा बळी गेला. तेंव्हाही बॅ. जीना हे भारतात मुस्लिमांना न्याय मिळणार नाही, असे म्हणत होते!स्वातंत्र्यानंतर देशात सिमी, मुस्लिम लिग, पी,एफ आय.यांची मानसिकता तीच आहे. यात ढोंगी व कॉंग्रेसचे नेते धर्मनिरपेक्ष या नावाखाली व्देषाचे दुकानाला साथ देत आहेत.यात देशातील ढोंगी राष्ट्रवादी मुस्लिम नेते भारतात मुस्लिम समाज सुरक्षित नाहीत, असे म्हणतात!यात काँग्रस पक्षाचे नेते राहुल गांधी व इतर नेते आहेत.यात निजामकालिन 'मजलिस इत्तेहादूल मुस्लिमीन म्हणजे एम. आय. एम. या संघटनेच्यापुढे औवेसी खानदानने १९५७ मध्ये केवळ "ऑल इंडिया' असे नाव लावून राजकीय पक्ष स्थापन केला.यांना देशात शरियतच्या आधारावर कायदे हवे आहेत! आजही देशात कट्टर मुस्लिम नेते' वंदे मातरम् व भारत माता की जय म्हणणार नाही,असे धाडस करतात.ही प्रवृती वाढत चालली आहे. औवेसी नेत्याने तर पोलिसांना दोन तास बाजूला सारा, शंभर कोटी हिंदूना संपविण्याची भाषा केली गेली होती. इस्लाम आणि हिंदू धर्मात वेगळेपण असे की हिंदू हा महा- उपनिषदातील "वसुधैव कुटुंबकम' श्लोकाप्रमाणे विश्वाला परिवार मानतो. तो सर्व धर्माचा आदर करतो.पण इस्लाम धर्मात स्वतःच्या धर्माशिवाय व इतर धर्म देवताला मानणे,हे काफीर समजले जाते. मुस्लिम समाजाला केवळ अल्लाने दिले शरियत (कायदे व नियम) हेच मान्य आहेत. त्यांना माणसांनी लिहिलेली घटना व कायदे नियम मान्य नाही. त्यामुळे कट्टर मुस्लिम नेते भारतीय कायद्याना विरोध करत असतात. काँग्रेस पक्षाचे नेते धर्मनिरपेक्षतेचा बुरखा घालून "व्होटबँक' साठी तुष्टीकरण राजकारण करत आहेत. राहूल गांधींनी हिंदूचे सर्व धर्म वाचले, असे सांगत आहेत. त्यांना सनातन धर्म कळालेला नाही, जगात हिंदू धर्माच्या दहशवादी संघटना आहेत काय ? हिदू कधीच व्देष करत नाहीत! आज देशात मुस्लिम व हिंदू समाज बंधूभावाने राहतात. काँग्रेस व इतर विरोधी पक्षाची व कट्टर मुस्लिम नेते धर्म विरोधी, हिंदू विषयी व्देष पसरवून सत्ता मिळविण्यासाठी राजकारण करत आहेत! खर तर! राहुल गांधी गांधी हे हिंदूच नाहीत! कारण त्यांचे नाव आडनाव, धर्मात घोटाळा आहे, असे भाजपा नेत्याने म्हंटले आहे. काँग्रेस व इतर विरोधी पक्ष सनातन धर्म नष्ट करण्याची भाषा करत आहेत. कारण हिंदु समाज सहनशील आहे, तो आक्रमक होणारा नाही. तो गळा कापण्याची भाषा करत नाही. भाजपा नेत्या नपूर शर्मा यांच्या एका शब्दाने इस्लामची बदनामी झाली म्हणून मुस्लिम राष्ट्र संघटना निषेधासाठी पुढे आली होती.लोकांचे गळा कापले गेले! देशात धर्माच्या नावावर हैदोस घातला जातोय! तेंव्हा काँग्रेसची तोंडे बंद का होती? हिंदू विरोधात काही जर बोलले तरी त्याचे पडसाद उमटत नाहीत! म्हणून जो -तो सनातन धर्मा विरोधात बोलत असतो! काँग्रेसचे नकली गांधी हे इतर धर्मा विरोधात बोलण्याचे धाडस करणार नाहीत!अगामी २०२४ च्या निवडणुकीसाठी काँग्रेस व विरोधी पक्षांनी २०२४ च्या निवडणुकीसाठी सनातन धर्म विरोधी 'अजेंडा' निश्चित केला आहे, असे दिसतेय ! आता याचा फैसला जनतेला हातात आहे.

# स्वयंपूर्ण ग्रामीण भारत




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

ग्रामीण भागात ज्वारी, बाजरी, डाळी आदी सर्व प्रकारचे धान्य तर उत्पन्नच होत होतेच पण त्याशिवाय वस्त्रनिर्मिती, धातूची भांडी तयार करणे, मातीची भांडी तयार करणे, लोखंडाची अवजारे, शस्त्रे तयार करणे, तेल उद्योग आदी अनेक प्रकारचे उद्योग लोक परंपरेने करीत. त्यांच्याजवळ अनुभव आणि परंपरा यातून आलेले समृद्ध ज्ञान होते. तुम्ही सोपानकाकांच्या गावात गेला होता. तेथे तुम्ही बारा बलुतेदारांची माहिती घेतली की नाही ? तर बाळांनो, तुम्हाला आश्चर्य वाटेल पण जवळपास दोन हजार प्रकारच्या वस्तू ग्रामीण भागात निर्माण होत होत्या. ' ' बापरे, खरंच काका ! म्हणजे त्या काळातील खेडी केवढी गजबजलेली आणि स्वयंपूर्ण असणार ! ' पिंकी म्हणाली.
' बरोबर आहे, पिंकी. अगदी तशीच होती आपली प्राचीन खेडी. आणि गंमत म्हणून तुम्हाला सांगतो. या गावांमध्ये बाहेरून एकही वस्तू आयात होत नव्हती. गावातील लोकांना लागणाऱ्या सगळ्या वस्तूंची निर्मिती गावातच होत होती. फक्त एकच वस्तू ते लोक बाहेरून आयात करीत. काही अंदाज करता येईल का तुम्हाला ? ' भगवानरावांनी हसत विचारले.

पिंकी, राजेश आणि चैतन्यने बराच वेळ डोके खाजवले. पण त्यांना काही लक्षात येईना. राजेश म्हणाला, ' काका, आम्हाला नाही सांगता येत. तुम्हीच सांगा ना ! भगवानराव हसत म्हणाले, ' अगदी सोपं आहे. आता मला सांगा की तुमची आई जेवण बनवताना त्यात मीठ टाकायचं विसरली, तर काय होईल ? ' ' अहो बाबा, मीठ नसेल तर जेवण किती बेचव आणि अळणी लागेल. ' चैतन्य म्हणाला. पिंकी म्हणाली, ' काका, आलं लक्षात. बहुधा ते लोक फक्त मीठ आयात करत असावेत. अगदी बरोबर. गावात फक्त मीठच बाहेरून येत होत होते. कारण मीठ हे समुद्रकिनारीच तयार होऊ शकतं. पण गावाला लागणाऱ्या इतर सर्व वस्तू गावातच तयार होत होत्या. केवळ तयारच होत होत्या असं नव्हे तर गावाला पुरुनही उरेल एवढं उत्पादन अनेक वस्तूंचं होत होतं, त्यामुळे ही गावं त्यांची निर्यात करत होती. त्यातून खेडी स्वयंपूर्ण झाली होती. गावात कोणी बेरोजगार, उपाशी किंवा भिकारी नसायचा. शहरांची संख्या मर्यादित होती. त्या शहरांना या गावातूनच जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व्हायचा. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था असे दोन स्तर होते. उद्योगासाठी लागणाऱ्या प्राथमिक गरजा किंवा कच्चा माल गावातच उपलब्ध असे.



# आनंदी पहाट



## मैत्री टिकवण्यासाठी आत्मपरीक्षण गरजेचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यांत अनेक घडामोडी घडत असतात. कितीतरी लोक आपल्या आयुष्यांत येतात आणि जातात. पण सगळ्यांत अधिक लक्षात कोण रहात असेल तर, ते म्हणजे सगे-सोबती अर्थात आपले मित्र-मैत्रिणी. अगदी बालपणीच्या मित्र-मैत्रिणींची नावेही त्यांच्या स्वभावासहित लक्षात राहतात. अर्थात हे सगे-सोबती आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर पल्याला भेटत असतात. पदोपदी आपण आपल्या आयुष्याची नवनवीन रांगोळी काढत असतो आणि त्यांत विविध रंग भरण्याचे काम आपले सगे-सोबतीच करत असतात. प्रसंगी आपले मन मोकळे करण्याची एक सुरक्षित जागा सुद्धा मित्र-मैत्रिणींपैकीच असते. आपल्या चुका हक्काने दाखवणे असेल अथवा आपले कौतुक करणे असेल, मित्रमंडळी शिवाय ह्यात सहसा पुढाकार इतर कोणी घेत नाही. थट्टा मस्करी करून आणि विनोद सांगून डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसवणाऱ्या मित्रमंडळी शिवाय आपल्याला मनाने अधिक जवळ फारसे कोणी नसते. मैत्रीचे नाते अगदी दुध-पाण्यासारखे असते. दोन्ही एकत्र केले कि ते वेगळे करता येत नाही. आपल्या मित्र-मैत्रिणी निवडताना आत्मनिष्ठता असणे गरजेचे असते. आपला सर्जनशील विचार नेहमीच आपल्या मित्र-मैत्रिणींच्या निवडीमध्ये नेमकेपणाने निर्णय घेण्यास उद्युक्त करत असतो. आपल्या प्रत्येक निवडीच्या संदर्भातील सर्व संभ्रम दूर करण्याचे काम याद्वारे होऊ शकते. आपला स्वतःकडे आणि इतरांकडे बघण्याचा दृष्टीकोन कशा प्रकारचा आहे, हे आत्मपरीक्षणाच्या माध्यमातून समजून घेणे महत्वाचे आणि म्हणूनच आवश्यक असते. अनेकदा आपला दृष्टीकोन जितका महत्वाचा असतो तितकेच ती दृष्टी कोण देते, ते देखील तितकेच महत्वाचे असते.

शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर मुलांना संगत निरनिराळ्या पद्धतीने घडवत असते; त्यामुळे आपल्या संगतीतील माणसे किंवा मुले कोणत्या गुणांची आहेत, हे अगोदर प्रत्येकाने पाहिले पाहिजे, तशी जाणीव प्रत्येकाला झालीच पाहिजे.

# संयम ....

आधुनिक केसरी

कुठल्याही गोष्टीत संयम खूप महत्त्वाचा असतो. अगदी नाथ माऊलींसारखा, गांधीजी सारखा संयम ठेवला की होतात सगळी काम नीट. पण तो असणे गरजेचा आहे. कधी काही तासांचा ,कधी दिवसांचा, कधी महिन्यांचा, तर कधी वर्षाचा. कधी कधी तर वर्षांनुवर्ष संयम ठेवावा लागतो . तेव्हा कुठे इच्छित ध्येय प्राप्त होतं .ध्येय गाठल्यानंतर सुद्धा संयम ठेवला पाहिजे .नाहीतर पाय जमिनीवर न राहता हवेत गेले की संयम सुटला म्हणून समजा. पाण्याच्या जोरात ओघांना जसा बांध फुटतो तसा काही अपरिहार्य कारणांनी संयम सुटतो. बांध फुटणे आणि संयम सुटणे दोन्हीही त्रासदायकच आहे. आवरता न येण्याजोगे... संयम ठेवायचा असेल तर चिंतन झालं पाहिजे. ध्यानधारणा केली पाहिजे. मग संयम आपोआप येतो. विद्यार्थ्यां जवळ तर किती संयम असतो .वर्षानुवर्ष शिक्षण घेतात ,किती मेहनत करतात तरीसुद्धा नोकरीची हमी नसते. अगदी शेवटच्या पायरीवर पोहोचावं आणि मंदिर बंद व्हावं. तसं विद्यार्थ्यांचं असतं. कितीतरी नोकरीच्या संधी हातातून जातात .हातातील वाळूचे कण निसटावे तसे. पण बहुतेक विद्यार्थ्यांना खूप संयम असतो. काही धुरंदरमंडळी विद्यार्थ्यांच्या संयमाची परीक्षाच घेतात. संयम बाळगला तर आनंद उपभोक्ता येतो .संयम सुटला तर दुःखाला, वादाला, संकटाला तोंड द्यावे लागते. संयम ठेवायचा म्हणजे खूप त्रास होतो. सर्व शरीर फुटून निघते. मनाचा चरफडा होतो. जिवाचा तिळपापड होतो. पण इतकं हे सगळं होऊन काही उपयोग नसतो. त्यातून काहीच बरं चांगलं होत नाही. त्यासाठी हवा असतो फक्त संयम. आधीच खूप उशीर झालेला आहे .रस्ता ओलांडायचा आहे. पण वाहने थांबतच नाही. जीवाची घालमेल होत आहे. काही उपयोग नाही...! संयम ठेवावाच लागेल!! वाट बघावीच लागेल.. थांबतील वाहने ....आता सावकाश जाता येईल रस्ता ओलांडून. तेव्हा संयम ठेवायला शिकलाच पाहिजे ...

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.१६

# श्री नवनाथ माहिती

आधुनिक केसरी

नाथांचे मूळ गुरू आदिनाथ म्हणजे शिव असून याचा दत्त संप्रदायाशी देखील अगदी निकटचा संबंध आहे. नाथ परंपरेप्रमाणे नवनाथांपैकी अनेकांना या संप्रदायाची दीक्षा दत्तात्रेयाकडून मिळाल्याचे दिसून येते. तांत्रिकदृष्ट्या जरी दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांमध्ये भिन्नत्व असले तरी दोन्ही संप्रदायांकरिता अत्यंत पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध असल्याचे आढळते. नाथांच्या परंपरेमध्ये अनेकदा हा संप्रदाय म्हणूनच नाथमत, अवधूतमत, अवधूत संप्रदाय, सिद्धमत इत्यादी नावांनी देखील ओळखला गेला आहे. नाथ संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून प्रामुख्याने मत्स्येन्द्रनाथ (मच्छिन्द्रनाथ) आणि गोरक्षनाथ या गुरुशिष्यांचे नाव घ्यावे लागेल. या दोहोंचा जन्म, त्यांचे चमत्कारांनी भरलेले आयुष्य, त्यांनी केलेले कार्य या विषयांशी संबंधित अनेक कथाही जनमानसात प्रचलित आहेत. मत्स्येन्द्रनाथांनी त्यांच्या मासळी- आईच्या पोटात असतानाच शिव-पार्वती संवाद दैवयोगाने कानी पडल्यावर प्राप्त करून घेतलेले ज्ञान, गाईच्या शेणाच्या ढिगातून गोरक्षनाथांचा झालेला जन्म, मत्स्येन्द्रांना खाव्याशा वाटलेल्या वडयाकरिता गोरक्षनाथांनी आपला एक डोळा काढून देऊन दाखविलेली पराकोटीची गुरुभक्ती, मंत्रजप करताना हाती असलेल्या मातीच्या पुतळ्यामध्ये प्राणसंचार होऊन गोरक्षनाथांकडून गहिनीनाथांचा झालेला चमत्कृतीपूर्ण जन्म अशा त्यांच्या असंख्य कथा महाराष्ट्राच्या मातीत खोलवर रुजल्या आहेत. नवनाथांच्या परंपरेमध्येच आपल्याला चौऱ्याऐंशी सिद्धांचा उल्लेख सापडतो. ही ८४ सिद्धांची कल्पना मूलतः वज्रयान परंपरेतील आहे. संशोधकांचे असे मत आहे की, बौद्ध धर्माच्या ऱ्हासाच्या काळात गोरक्षनाथांच्या प्रभावाने अनेक बौद्धानुयायी ज्या वेळी नाथपंथात सामील झाले, त्या वेळी त्यांच्याकडील ८४ सिद्धांची ही संकल्पना नाथांकडे रूढ झाली असावी. या सिद्धांची देखील विस्तृत नामावली उपलब्ध असून त्यापैकी ८४ सिद्ध नेमके कोणते, याबद्दल मितभिन्नता आढळते. ढोबळमानाने असे म्हणता येईल की, नवनाथांचा संप्रदाय अनेकांनी स्वीकारून सिद्धपद प्राप्त केले. या सिद्धांकडून आणि त्यांच्या शिष्यांकडून विविध लोकांना सांप्रदायिक उपदेश मिळाला आणि यातून पुढे नाथ संप्रदायातील अनेक गुरु-शिष्य परंपरांचा जन्म झाला. यातील काही परंपरांमध्ये प्रामुख्याने मंत्र-तंत्रविषयक ज्ञान आहे. काही परंपरा तत्त्वज्ञानप्रधान असून त्यामध्ये योग आणि ध्यान या उपासना पद्धतींचा अवलंब केला जातो. महाराष्ट्रातील भक्तीमार्गातही नाथ परंपरा रुजली असून अनेक भक्त मंडळी गुरुपदिष्ट मार्गाने नामसंकीर्तन, गुरुपूजन इत्यादीद्वारे मोक्षप्राप्ती करून घेण्याची मनीषा बाळगतात.

# निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

तेजश्चौजश्च शान्तिं च देहि शङ्करवल्लभे|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ९० || हे श्रीशंकरवल्लभे, मला तेज, ओज आणि शांती दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

वन्दों मैं वह परम गुरु, जिन यह ज्ञान पसार ।
देव सदाफल आदि में, जिन यह शब्द उचार
।।५०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/५० मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : त्या नित्य अनादि सद्गुरू सुकृतदेवांना मी वंदन करतो, ज्यांनी सृष्टीच्या प्रारंभी या ज्ञानाचा (ब्रह्मविद्येचा) प्रचार केला. प्रथम सद्गुरूदेवांच्या द्वारेच ब्रम्हविद्येचा प्रचार प्रारंभ झाला आहे . ब्रह्मविद्येचे प्रथम आदि गुरू नित्य अनादि सद्गुरू सुकृतदेव आहेत. प्रथम 'ब्रह्मविद्या' हा शब्द त्यांच्याच मुखातून निघाला आहे.म्हणून ब्रह्मजा ब्रह्मविद्येचे आदि प्रचारक सद्गुरू देव आहेत.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# सिध्दलक्षण

आधुनिक केसरी

साधूसंत आणि बुद्धि एकदा का स्वस्वरूपाच्या अनुसंधानात मग्न झाली म्हणजे तिचे रूपांतर आत्मबुध्दित होते.आपण सर्व देहबुद्धीला कवटाळून बसणारी माणसं आहोत. पण संतांच्या संगतीत राहून आत्मोध्दार तर करायचा आहे. त्यासाठी आपल्याला वाट दाखवण्यासाठी साधूसंताची विचार सरणीं मार्गदर्शक ठरणार आहे.
आपला धर्म प्रमाणापेक्षा प्रिय मानावा. त्याच्याशी एकरूप होऊन जीवन जगावे ही संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला आहे काही चुकल्यास महाराज क्षमा करतील.
साधूंची संगत धरावी कारण सत्संगात विनासायास काहीही कष्ट न घेता स्वस्वरूपाशी लीन होता येते.स्वस्वरूपाशी तन्मयता आली की साधूंची लक्षणे आपल्या अंगात आपोआपच मुरतात.त्यासाठी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी ती म्हणजे सदासर्वकाळ स्वस्वरूपाशी एकरूप होणे होय.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# सत्समागम हा सर्व साधनांचा राजा

आधुनिक केसरी

मनुष्यजन्माला येणे, संतांची भेट होणे, आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास होणे, या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही असे म्हणतात. सत्समागम म्हणजे सर्व साधनांचा राजा होय. काही मागण्याची इच्छाच संत नष्ट करतात, मग मिळवायचे कुठे राहते ? संत बनणे व्यावहारिक दृष्ट्या काही सुखाचे नसते. एखाद्या स्नानसंध्याशील आणि सदाचरणी माणसाच्या अंगावर तेज दिसते, कारण देहाला धरून झालेल्या कर्माचे ते तेज असते; पण एखाद्या सत्पुरुषाच्या देहावर बाहेर तसे तेज दिसणारही नाही. आत वावरणाऱ्या भगवंताच्या ज्ञानाला योग्य असा सत्पुरुषाचा देह असतो. देहाच्या आधाराने भोगण्याची या जगामधली जी सुखे आहेत, त्यांचे मार्ग सत्पुरुषापेक्षा आपण प्रापंचिक लोक जास्त जाणतो, परंतु देहाच्या पलीकडे असणारे आणि कायमचे टिकणारे, आणि देहाला विसरून आणि देवाला स्मरून जे मिळवायचे, असे भगवंताचे सुख आहे. ते प्राप्त होण्याचा मार्ग समजावून घेण्यासाठी आपण सत्पुरुषाकडे गेले पाहिजे. विषय तृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे.



हा संतसंगतीचा परिणाम. असा जो असेल तोच संत, नव्हे प्रत्यक्ष भगवंत होय. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. संत आपल्याला सत्यस्वरूपाची ओळख करून देतात. सत्पुरुषाने आखून दिलेल्या मार्गाने कायावाचामनाने जे कर्म केले जाते ते पौरुषच होय. आगगाडीत बसणारी सर्व माणसे, मग ती कोणत्याही क्लासमध्ये बसणारी असोत, इतकेच नव्हे तर बिनतिकिटाची माणसेदेखील, गाडीबरोबर सरळ म्हणजे शेवटच्या स्टेशनापर्यंत जाऊन पोहोचतात; त्याचप्रमाणे संतांची संगत करणारी सर्व माणसे भगवंतापर्यंत पोहोचतात. त्यांच्यामधली बिनतिकिटाची, म्हणजे दुष्ट, पापी, दुराचारी, त्याज्य, आणि अयोग्य, अशी माणसेसुद्धा तरून जातात; मात्र कोणीही गाडी तेवढी सोडता कामा नये. हाच सत्संगतीचा महिमा. परमार्थ साधण्यासाठी सत्संगती फार उपयोगी पडते. ही संगती तीन प्रकारची असते : एक, संताचा प्रत्यक्ष देहामध्ये सहवास; दोन, संताने सांगितलेल्या मंत्राचा सहवास; आणि तीन, संताच्या विचारांची संगत. संगतीचा परिणाम नकळत होतो, म्हणून सत्संगती धरावी. आपण ज्याकरिता जन्माला आलो ते कारण फक्त संतच उमगले; म्हणून त्यांना शरण जावे. संत स्वतः समाधान मिळवून ते दुसऱ्याला देतात, हे त्यांचे आपल्यावर केवढे उपकार आहेत !

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

म्हणजे लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्या शिवाय सोने होत नाही हि त्या ग्रंथाची किमया आहे त्यातील दैवी शक्तीचा अनुभव आहे अशी भावना आपली ज्या ग्रंथा बाबत असते तोच आपला उत्कृष्ठ ग्रंथ असतो मग कोणाचा गीता असेल, कुराण असेल, कुणाचा बायबल, तर कोणाचा आणखी काही. म्हणजे जगात उत्कृष्ठ ग्रंथाची कमी नाही कमी आहे ती या विषयावर आत्मचिंतन करून स्वताचा उद्धार करून घेणाऱ्याची . प्रत्येकाच्या आयुष्यात असा एक उत्कृष्ठ ग्रंथ असायलाच हवा असा ग्रंथ ही आयुष्यात योगायोगानेच येत असतो तुम्ही शोधून सापडत नसतो आणि आपण जर एखादा ग्रंथ उत्कृष्ठ म्हणत असू तर त्या वर आपले जीवापाड प्रेम असावे त्यातील विचार आचरणात आणावे त्याचे मनन करावे व सभोवतालच्या अज्ञानी लोकांना हि आपण ज्या चांगल्या रस्त्यावरून चालत आहोत तो मार्ग जरूर दाखवावा म्हणजे त्या ग्रंथराजाची खऱ्या अर्थाने सेवा होते.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

कां रे गमाविल्या गाई ।आली वळती तुझी जाई ।मागें जालें काई ।एका तें का नेणसी ॥१॥केलास फजित ।मागें पुढें ही बहुत । लाज नाहीं नित्य ।नित्य दंड पावतां ॥ध्रु.।वोला खोडा खळि गाढी ।ऐसा कोण तये काढी ।धांवेल का पाडी ।तुझी आधीं वोढाळा ॥२।चाल धांवें ।मी ही येतों तुजसवें ।तुका म्हणे जंव ।तेथें नाहीं पावली ॥३॥काय या संतांचे मानूं उपकार ।मज निरंतर जागविती ॥१॥काय देवा यांसि व्हावें उतराई ।ठेवितां हा पायीं जीव थोडा ॥ध्रु.॥सहज बोलणें हित उपदेश ।करूनि सायास शिकविती ॥२॥
तुका म्हणे वत्स धेनुचिया चित्तीं ।तैसें मज येती सांभाळित ३॥
कंठीं धरिला कृष्णमणी ।अवघा जनीं प्रकाश ॥१॥
काला वांटूं एकमेकां ।वैष्णवा निका संभ्रम ॥ध्रु.॥
वांकुलिया ब्रम्हादिकां ।उत्तम लोकां दाखवूं ॥२॥
तुका म्हणे भूमंडळीं ।आम्ही बळी वीर गाडे ॥३॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, १७ सप्टेंबर २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी · दैनिक

वर्ष - ०३ · अंक - ४८

आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • SUNDAY 17 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-48 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-5


# मराठवाड्याच्या कायापालटाचा संकल्प

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : 46 हजार कोटींहून अधिक विकास कामे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्याचा कायापालट घडविणारा तब्बल 46 हजार 579 कोटी 34 लाख रुपयांचा संकल्प आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला. छत्रपती संभाजीनगर येथील राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यामध्ये आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या 9 हजार 437 कोटी 90 लाख रुपये खर्चाच्या कामांचा देखील समावेश आहे. या पत्रकार परिषदेस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते.**

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी औरंगाबाद महसूल विभागाचे नामकरण छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नामकरण धाराशिव केल्याचे जाहीर केले. या नामकरणाबाबतची अधिसूचना जाहीर झाल्याने, या दोन्ही नामकरणांवर शिक्कामोर्तबचे झाल्याचेही त्यांनी सांगितले. मराठवाडा मुक्ती संग्रामाचे नेतृत्व करणारे स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुतळा नवी दिल्ली येथे उभारण्यात येईल. तसेच छत्रपती संभाजीनगर मधील 300 वर्षे जून्या तीन पुलांचे नुतनीकरण करण्याचा निर्णयही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त 2016 नंतर आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक छत्रपती संभाजीनगर येथे झाली. 2016 मध्ये आपण मुख्यमंत्री असताना घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी झाल्याबद्दलची माहिती उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, नियोजन, ग्रामविकास, कृषी तसेच पशूसंर्वधन आदी विभागांशी निगड़ीत विविध निर्णय घेण्यात आले. पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी मराठवाडा विभागात सुरु असलेल्या विकास कामांची माहिती दिली.

**मराठवाड्यात सुरू असलेल्या कामांची विभागनिहाय माहिती पुढीलप्रमाणे** : जलसंपदा – २१ हजार ५८० कोटी २४ लाख रुपये, सार्वजनिक बांधकाम–१२ हजार ९३८ कोटी ८५ लाख पशुसंवर्धन, दुग्धविकास, मस्त्यव्यवसाय– ३ हजार ३१८ कोटी ५४ लाख, नियोजन – १ हजार ६०८ कोटी २८ लाख, परिवहन – १ हजार १२८ कोटी ६९ लाख, ग्रामविकास – १ हजार २९१ कोटी ४४ लाख, कृषी विभाग – ७०९ कोटी ४९ लाख, क्रीडा विभाग – ६९६ कोटी ३८ लाख, गृह – ६८४ कोटी ४५ लाख, वैद्यकीय शिक्षण – ४९८ कोटी ६ लाख, महिला व बाल विकास – ३८६ कोटी ८८ लाख, शालेय शिक्षण – 490 कोटी ७८ लाख

**सार्वजनिक आरोग्य** –35 .37 कोटी, सामान्य प्रशासन– 287 कोटी, नगरविकास – २८१ कोटी ७१ लाख, सांस्कृतिक कार्य– २५३ कोटी ७० लाख, पर्यटन – ९५ कोटी २५ लाख, मदत पुनर्वसन – ८८ कोटी ७२ लाख, वन विभाग – ६५ कोटी ४२ लाख, महसूल विभाग– ६३ कोटी ६८ लाख, उद्योग विभाग– ३८ कोटी, वस्त्रोद्योग –२५ कोटी, कौशल्य विकास–१० कोटी, विधी व न्याय– ३ कोटी ८५ लाख

**जलसंपदा विभाग** – मराठवाड्यातला दुष्काळ हटविणार . पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहुन जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणार . २२ .९३ अ .घ .फुट पाणी वळविण्याची १४ हजार ४०कोटींची योजना राबविणार . पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाचे रूप पालटवणार . १५०कोटी, वैजापूर तालुक्यातील शनिदेवगावला उच्चपातळीचा बंधारा . १७९३हे क्षेत्र सिंचित होणार . २८५ कोटी ६४ लाख



**नियोजन विभाग** – मराठवाड्यातील विविध तीर्थक्षेत्रांचा विकास करणार वेरूळ येथील श्री क्षेत्र घृष्णेश्वर मंदिराचा सुधारित विकास राखडा .१५६ .६३कोटी, श्री तुळजा भवानी मंदिराचा१३२८कोटीचा विकास आराखडा , श्री क्षेत्र औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकास . ६० .३५ कोटी उदगीर येथे बाबांच्या समाधी स्थळ विकास आराखड्यासाठी १कोटी सिल्लोड तालुक्यातील मोजे केळगावचे श्री मुर्डेश्वर महादेव मंदिर देवस्थानाच्या ४५ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता, पाथरी येथे साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखडा . ९१ .८०कोटी, मानव विकास कार्यक्रमात 100 बसेस पुरविणे . 38 कोटी महिला व बालविकास विभाग – मराठवाड्यातील ३४३९ अंगणवाड्यांच्या बांधकामांचा तीन वर्षांचा कालबद्ध कार्यक्रम . ३८६ .८८कोटी

**शालेय शिक्षण**– मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई स्व . दगडाबाई शेळके यांचे धोपटेश्वर येथे यथोचित स्मारक उभारणार . ५ कोटी मराठवाड्यातील स्वातंत्रसेनानीच्या गावातील शाळा भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेतून विकसित करणार . ७६ तालुक्यांतून शाळा निवडणार . विविध सुविधांसाठी ९५ कोटी . बीड जिल्ह्यांतील उस तोड कामगारांच्या मुलींसाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजना . १६०० मुलीना लाभ . ८० .०५कोटी मराठवाड्यातील निजामकालीन शाळांची दुरुस्ती व पुनर्बांधणी करणार . २० टक्के लोकसहभागाची अट शिथिल . २०० कोटी खर्च, परभणी जिल्ह्यातील सोनपेठ आणि पालम तालुक्यांमध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करणार . ४०० मुलींना शिक्षण घेणे शक्य . २० .७३कोटी खर्च



**क्रीडा विभाग** :परभणी जिल्हा क्रीडा संकुला साठी कृषी विभागाची जागा मंजूर . १५ कोटी, छत्रपती संभाजीनगर येथे क्रीडा विद्यापीठ स्थापण्यासाठी समिती गठीत . ६५६ .३८कोटी खर्चून अद्ययावत क्रीडा विद्यापीठ उभारणार कलाग्रामच्या जागेवर एमआयडीसी आणि मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम उभारणार .

**परळीत ५ कोटींचे तालुकाक्रीडासंकुलउभारणार** : उदगीर तालुक्यात जळकोट येथे ५ कोटी खर्चून क्रीडासंकुलउभारणार, परभणी जिल्हा क्रीडा संकुलाचे अद्ययावतीकरण करण्यासाठी १५ कोटीस मंजुरी

**पशुसंवर्धन विभाग** : मराठवड्यात दुधाची क्रांती येणार . सर्व जिल्ह्यातील



८६०० गावांत दुधाळ जनावरांचे वाटप . ३२२५ कोटी, तुळजापूर तालुक्यात शेळी समुह योजना राबविण्यासाठी १० कोटी, देवणी या गोवंशीय प्रजातीच्या उच्च दर्जाची वंशावळ निवड – ४ कोटी, **पर्यटन विभाग** : फर्दापूर, छत्रपती संभाजीनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना द्यान उभारणार . प्रत्येकी ५० कोटी , उदगीर तालुक्यातील हत्तीबेट येथे पर्यटनस्थळ– ५कोटी

अंबड येथील मत्स्योदरीदेवी संस्थानाचा विकास . 40 कोटी .



**सांस्कृतिक कार्य विभाग** : मराठवाड्यातील विविध स्मारके, प्रसिद्ध मंदिरांचा विकास .अंबेजोगाई, संगमेश्वर, तर, महादेव मंदिर माणकेश्वर, तेर मंदिर, महालक्ष्मी मंदिर, होट्टल मंदिर, भोग नृसिंह, गुप्तेश्वर मंदिर धाराशूर, चारठाणा मंदिर समुह, आदि . २५३ कोटी70 लाख .

**महसूल विभाग** : बीड जिल्हाधिकारी इमारत उभारणार .६३ .६८कोटी वसमत येथे मॉडर्न मार्केटच्या उभारणीसाठी जागा .

लातूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयाची मध्यवर्ती प्रशासकीय शासकीय इमारत . **वन विभाग** : लातूर, वडवाव, नागनाथ टेकडी विकास करणार .



५ .४२ कोटी, माहूर येथे वनविश्रामगृह बांधणार .

**मदत व पुनर्वसन** : वसमत मौजे कुरुंदा येथे पूर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी ३३ .०३कोटी, मराठवाड्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा मजबूत करणार . प्रादेशिक आपत्ती प्रतिसाद केंद्र आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे बळकटीकरण .५५ .६९कोटीखर्च .

धारुर तालुक्यातील सुकळी या गावचे पुनर्वसन .

**उद्योग विभाग** : आष्टीला कृषिपुरक क्षेत्रासाठी एमआयडीसी उभारणार . 38 कोटी, वसमत, चाकूर, वडवणी ( पुसरा ), मौजे सिरसाळा ता . परळी येथे एमआयडीसी स्थापन करणे . उदगीर आणि जळकोट येथे एमआयडीसी मंजूर, **कौशल्य विकास विभाग** : धाराशिव विश्वकर्मा रोजगार योजना राबविणार, **सार्वजनिक बांधकाम** : मराठवाड्यातील



रस्ते सुधारणार ३००कि .मी . लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेणार . २४००कोटी नाबार्ड अर्थसहायातून मराठवाड्यात ४४ कामे हाती घेणार . १०९कोटी हायब्रिड ॲन्यूईटी योजनेतून मराठवाड्यातील १०३०कि .मी . लांबीचे रस्ते सुधारणार . १० हजार ३००कोटी, साबरमती घाटाप्रमाणे नांदेडचा गोदावरीघाटाचे सौंदर्य खुलणार . रिव्हर फ्रंटसाठी १००कोटीखर्च औसा तालुक्यातील मातोळा येथे तसेच कंधार तालुक्यातील मौजे कंल्हाळी येथे हुतात्म्यांचे स्मारक उभारणे . लोहारा तालुक्यातील मौजे हिप्परगा येथे बहुउद्देशीय इमारत उभारणार . पाटोदा येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीस निधी . बीड येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम . लातूर–बार्शी–टेंभुर्णी महामार्ग चार पदरी करणे .

**ग्रामविकास विभाग** : मराठवाड्यातील ७५ ग्रामपंचायतींना आता स्वत :चे



कार्यालय मिळणार आहे . पुढील ३ वर्षात १८० कोटी देणार . स्व . बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत . बीड येथे जिल्हापरिषदेची नवीन इमारत . ३५ कोटी .

**उर्जा विभाग** : परळी औष्णीक विद्युत केंद्र येथील प्लांट्सना मंजुरी .

**गृह विभाग** : नांदेड शहरात सीसीटिव्हीचे जाळे .शहर सुरक्षित



होणार . १००कोटी, १८निजामकालीन पोलीस स्टेशन्सचा होणार कायापालट . ९२ .८०कोटी, बीड, परळी, अंबाजोगाई येथे पोलीस हौसिंग . 300 कोटी .

छत्रपती संभाजीनगर येथील क्रांतीचौक पोलीस ठाणे इमारत आणि निवासस्थाने तसेच मिल कॉर्नर येथील निवासस्थाने . 191 कोटी 65 लाख .

**परिवहन विभाग** : मराठवाड्यातील विविध शहरांतील बस स्थानकांमध्ये



अमुलाग्र बदल करणार, छत्रपती संभाजीनगर विभागात आधुनिक ११९७ई–बसेस चालवणार . ४२१कोटीस मान्यता, छत्रपती संभाजीनगर विभागात वाहन निरिक्षण व परिक्षण केंद्र स्थापन करणार .

१३५ .६१ कोटी, राज्यातील ९ राष्ट्रीय महामार्गावर INTELLIGENT TRAFFIC MANAGEMENT SYSTEMबसविणार . पुणे– छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या प्रकल्पास मान्यता . १८८ .१९कोटी खर्च येणार , छत्रपतीसंभाजीनगर व नांदेड येथे स्वयंचलित चाचणी पथ प्रकल्प .१० .३७ कोटी, वरील सर्व उपक्रमांना मिळून एकूण 1 हजार 128 कोटी 69 लाख निधी .

**नगरविकास विभाग** : मराठवाड्यातील विविध शहरांमधील मुलभूत



सोयीसुविधा विकासासाठी एकूण रुपये ६४० .२९ कोटी निधी . त्यापैकी रुपये ५३४ .७४ कोटी नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रासाठी तर रुपये ५०५ .५५ कोटी महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर, केंद्र पुरस्कृत अमृत २ .० – छत्रपती संभाजीनगर शहरासाठी रुपये २७४० .७५ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प रुपये २७५ .६८ कोटी किंमतीचा मलनि :स्सारण प्रकल्प तर रुपये २ .७८ कोटी किंमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प असे एकूण रुपये ३०५९ .२१ कोटी किमतीचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत . नांदेड वाघाळा महानगरपलिकेसाठी रुपये ३२९ .१६ कोटी किमतीचा मलनि :स्सारण प्रकल्प, अर्धापूर नगरपंचायतेसाठी रुपये २५ .१३ कोटी किंमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प, भूम नगरपरिषदेसाठी रुपये १ .८३ कोटी किंमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प

माहूर नगरपरिषदेसाठी रुपये २४ .६२ कोटी किंमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प, पेठ उमरी नगरपंचायतेसाठी रुपये ३ .६० कोटी किंमतीचा सरोवर पुनरुज्जीवनाचा प्रकल्प, हिंगोली शहरासाठी रुपये १०४ .२८ कोटी किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प, औंढा नागनाथ तिर्थक्षेत्रासाठी रुपये ३६ .४४ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प खुलताबाद शहरासाठी रुपये २१ .३२ कोटी किमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प, नळदुर्ग शहरासाठी रुपये ९३ .४२ कोटी किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प , माजलगांव शहरासाठी रुपये ४६ .५४ कोटी किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प , लोहा शहरासाठी रुपये ६६ .३९ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्प , तुळजापूर तिर्थक्षेत्रासाठी रुपये १५८ .५२ कोटी किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प, उमरगा शहरासाठी रुपये १२६ .८२ कोटी किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प , अंबड शहरातील भुयारी गटार प्रकल्प रुपये १६ .५६ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल .

जालना शहर पाणीपुरवठा प्रकल्पामध्ये ३५ MLD क्षमतेचे अंबड येथे जलशुध्दीकरण केंद्र व १५ MLDक्षमतेचे जालना येथे जलशुध्दीकरण केंद्र बांधण्यासाठी रुपये ५६ .०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल . जाफराबाद शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात येईल .रुपये ४७ .९८ कोटी, नांदेड वाघाळा महानगरपालिका घनकचरा प्रकल्प– रुपये ८ .०७ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात



येईल . **श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योर्तिलिंग विकास आराखडा**– रुपये २८६ .६८ निधी उपलब्ध करुन देण्यात येईल . औंढा नागनाथ विकास आराखडा रुपये ५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात येईल . मराठवाड्यातील विविध शहरांमधील मुलभूत सोयीसुविधा विकासासाठी एकूण रुपये ६४० .२९ कोटी निधी . त्यापैकी रुपये ५३४ .७४ कोटी नगरपरिषद/ नगरपंचायत क्षेत्रासाठी तर रुपये ५०५ .५५ कोटी महानगरपालिका क्षेत्रासाठी मंजूर, परभणी शहराची रुपये १५७ .११ कोटी किंमतीची समांतर पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात येईल .

परभणी शहराची रुपये ४०८ .८३ कोटी किंमतीचा मलनि :स्सारण प्रकल्प मंजूर करण्यात येईल . लातूर रस्ते विकास प्रकल्प रुपये ४१ .३६ कोटी मंजूर करण्यात येईल . नाट्यगृहाचे उर्वरित बांधकाम पूर्ण करण्याकरिता लातूर महानगरपालिकेस रुपये २६ .२१ कोटी व परभणी महानगरपालिकेस रुपये ११ .७५ कोटी निधी मंजूर करण्यात येईल . उदगीर नगरपरिषदेस नाट्यगृहाच्या बांधकामासाठी रुपये १२ कोटी निधी मंजूर करण्यात येईल . उदगीर शहरात भूमीगत गटार यंत्रणा .

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील कार्यान्वीत असलेल्या घनकचरा प्रकल्प व प्रगतीपथावर असलेल्या बायोगॅस प्रकल्पासाठी रुपये ८ .०७ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल . **माहिती व तंत्रज्ञान संचालनालय** : मराठवाड्यात ४३२ ग्रामपंचायतीना भारतनेट जोडणी वर्षभरात देणार . २८६ कोटी . छत्रपती संभाजीनगर व नांदेड येथे विद्यापीठ परिसरात मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यासाठी माहिती संग्रहालय . ( रोजगार हमी योजना )

**मराठवाड्यात 4 लाख विहिरींचा कार्यक्रम राबविणार** : ( कृषी विभाग )



आता मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी बीड येथे सीताफळ आणि इतर फळांवर प्रक्रिया उद्योग . ५ कोटी हळद संशोधनास आता वेग येणार . हिंगोलीतील हरिद्रा संशोधन केंद्रासाठी १०० कोटी . अंबाजोगाई येथील शासकीय कृषी महाविद्यालयात मुलामुलींचे वसतीगृह सुरु .105 कोटी .

**सार्वजनिक आरोग्य विभाग** : अहमदपूर, चाकूर, माजलगाव येथे ट्रॉमा केअर



सेंटर, धारुर तालुक्यातील तेलगाव तसेच वडवली येथे ग्रामीण रुग्णालयास निधी, किनगाव ग्रामीण रुग्णालय बांधकाम . एकूण निधी 374 कोटी 91 लाख . ( मृद व जलसंधारण ), अहमदपूर तालुक्यातील मानार नदीवर 9 कोल्हापुरी बंधारे . पाटोदा तालुक्यातील रोहतवाडी आणि उंबर विहिरा साठवण तलाव, आष्टी आणि शिरुर तालुक्यात कोल्हापूर बंधाऱ्यांचे लातूर टाईप बॅरेजमध्ये रुपांतर आणि गंगाखेड तालुक्यातील मासोळी, घळाटी, टोकवाडी आणि पोखर्णी नदीवर सिमेंट नाले बंधारे . ( अल्पसंख्याक विकास ), अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी परदेशात पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती .छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्याक आयुक्तालय व जिल्हा स्तरावर स्वतंत्र कार्यालय . डॉ . झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेच्या अनुदानात वाढ . तसेच पारंपारिक शिक्षणाबरोबर बोर्डाच्या शालेय अभ्यासक्रमाचे शिक्षण देणारे मदरसांचे अनुदान 2 लाखावरुन 10 लाख करणे . इतरही घोषणा :परळी वैजनाथ विकास आराखड्यात आयुर्वेद पार्कचा समावेश, वेरूळ येथे शहाजी राजे भोसले यांचे स्मारक .

# आशियान : हिंद प्रशांत क्षेत्रातील स्थैर्याचा केंद्रबिंदू



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**भारत हा आशिया खंडातील सर्वात शक्तीशाली देश म्हणून उदयास आला आहे. आशियाचा मित्र, मार्गदर्शक आणि तत्वचिंतक या नात्याने भारताची भूमिका निणार्यक ठरली आहे पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या विकास विषयक दृष्टीकोनाचे यर्थार्थ स्पष्टीकरण केले आहे. आशियान संघटनेचे विचारमंथन विकासाला नवी दिशा देणारे ठरले आहे. 21 वे शतक हे आशियाचे शतक आहे. भारत व आशियान राष्ट्रे इतिहास व भूगोलांनी एकत्र बांधलेली आहेत. या देशाच्या विकासासाठी भारताने 12 कलमी विकासाचा कार्यक्रम निश्चित केला आहे. हा कार्यक्रम भावी परिवर्तनाची नांदी ठरेल. कोविड साथीनंतरच्या नवीन जागतिक व्यवस्थेमध्ये मानवी कल्याणासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. हा पंतप्रधान मोदी यांचा जकार्ता संदेश होय. सर्व आशियान राष्ट्रांनी सागरी सुरक्षा व सागरी शांततेचा पुनर्रूचार केला आहे. शांतता विकास आणि सहभागी समृद्धी या तीन सुत्रावर भर देऊन आशियान राष्ट्रांनी नवा इतिहास घडविण्याचा संकल्प जकार्ता परिषदेत केला आहे. प्राचीन काळापासू भारत आणि आग्रेय आशियाई राष्ट्रामध्ये मैत्रीचा भक्कम आधार आहे.**

कौंडीण्य ऋषिनी सुवर्ण द्वीपामध्ये प्रवेश करून भारतीय वसाहत तयार केली तसेच कंबुज ऋषिनी कंम्बोडियामध्ये भारतीय संस्कृतिचे केंद्र उभा केले त्यातुन कंम्बोडिया या देशाचा जन्म झाला. आग्नेय आशियामधील इंडोनेशियासह 7-8 देशांचा समुह म्हणजेच ब्रहत्तर भारत होय. या सर्व देशांशी भारताचे सांस्कृतिक व राजकिय संबंध जुने आहेत. त्यामुळे इंडोनेशियातील जकार्ता या राजधानीच्या शहरात संपन्न झालेल्या 43 व्या आशियान परिषदेमध्ये पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी इतिहास व भूगोलामुळे आम्ही एकमेकांना जोडल गेलो असे यर्थाथ पणे नमूद केले आहे. समकालीन बहुध्रुवी जगामध्ये आशियान ही संघटना महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. दि. 7 सप्टेंबर रोजी झालेल्या आशियान परिषदेमध्ये उपयुक्त आणि फलदायी विचार मंथन घडून आले. या परिषदेतील मौलिक योगदानाची चर्चा या लेखात केली आहे.

**नवीन संघर्षा विरूद्ध इशारा :** या आशियान परिषदेमध्ये अमेरिका, चीन, रशिया इत्यादी देशांनी हजेरी लावल्यामुळे या शिखर परिषदेत महत्व प्राप्त झाले. इंडोनेशियाच्या अध्यक्षाने हिंद प्रशांत क्षेत्रातील महासत्ताच्या संघर्षा विरूद्ध जोरदार चेतावणी दिली. भारताचे पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी हिंद प्रशांत सागरी क्षेत्राचे महत्त्व आधोरेखित करून मुक्त आणि सुरक्षित हिंद प्रशांत क्षेत्राच्या उभारणीसाठी यथार्थ आव्हान केले. यासाठी आशियान राष्ट्रांचे सामुहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे असे सुत्र मांडले. त्यांच्या भाषणाचे सुत्र शाश्वस विकासातील भागिदारी आणि सामुदायिक प्रयत्नातून शांतता व स्थैर्य हे होते. इंडोनेशियाचे अध्यक्ष जोको बिडोडो यांनी आपल्या भाषणात बड्या राष्टांनी शत्रूत्व वाढविण्याऐवजी मैत्री व सहकार्यावर भर द्यावा अशी विनंती केली. या परिषदेमध्ये अमेरिकेच्या उपाध्यक्षा कॅमला हॅरिस, चीनचे पंतप्रधान लींकियांग आणि रशियाचे परराष्ट्र मंत्री फर्गई लॅवरोव्ह हे प्रामुख्याने उपस्थित होते. चीनच्या पंतप्रधानांनी अमेरिकेचा उल्लेख न करता हिंद प्रशांत क्षेत्रात नवीन शीत युद्ध निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे असे सांगूण ते टाळण्यासाठी प्रमुख शक्तींनी प्रयत्न केले पाहिजेत अशी विनंती केली. या बैठकिमध्ये इंडोनेशियाच्या अध्यक्षांनी वॉशिंग्टन आणि बीजिंग अर्थपूर्ण संवाद साधला. याचा अर्थ असा की तैवान प्रश्नांवर अमेरिका व चीनमधील मतभेद तसेच बीजिंग चे मास्कोशी असलेले संबंध आणि अमेरिका व चिनची हिंद प्रशांत क्षेत्रातील स्पर्धा यामुळे वाढत्या तणावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. या परिषदेतील विचार मंथनाची दिशा पाहता त्यातील अनेक विविध पैलू हे निश्चितच वळण देणारे ठरले आहे. आग्नेय आशियातील देशापुढे भेडसावणाऱ्या अनेक समस्या बाबत या परिषदेत झालेली चर्चा ही हिंद प्रशांत क्षेत्रातील शाश्वत विकासाला नवी दृष्टि देणारी ठरली आहे.

**12 कलमी विकास कार्यक्रम :** या परिषदेमध्ये त्यांनी हिंद प्रशांत क्षेत्रात 12 कलमी विकास कार्यक्रम घोषित केला. त्यामध्ये त्यांनी वर्तमान जगाच्या प्रश्नांचा वेध घेताना कनेक्टीव्हिटी म्हणजे जोडणीची समस्या तसेच डिजिटील व्यवस्थेचा विकास, परस्परातील व्यापार आणि आर्थिक वृद्धी, अन्न पुरवठा साखळी मजबूत करण्याची गरज यावर हवामान बदल, पर्यावरण रक्षण यावर भर दिला तसेच हिंद प्रशांत क्षेत्रातील सागरी सुरक्षिततेचा प्रश्न निल अर्थ व्यवस्था म्हणजे मच्छ व्यवसायाचा विकास इत्यादी महत्त्वाचे पैलू मांडले. या देशांच्या विकासासाठी भारताने पुढाकार घेऊन डिजिटल व्यवहार वाढीसाठी स्वतंत्र आर्थिक कौश उभारण्यास भारत पुढाकर घेईल व विशेष मदत करेल असे अभिवचन ही त्यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेला हा 12 कलमी कार्यक्रम म्हणजे भारताने आग्नेय आशियाई राष्ट्रांना दिलेले देणगी होय त्यामुळे तेथील अडकून पडलेले प्रगतीचे प्रवाह खुले होतील आणि भारता विषयी असेलेला त्यांचा विश्वास वाढीस लागेल. या 12 कलमी कार्यक्रमाचे आणखी एक सुत्र असे आहे की सागरी सहकार्यावरील संयुक्त निवेदन अर्थपूर्ण असून त्यामध्ये शांतता, प्रगती आणि सामुदायिक समृद्धी साठी आशियान भारत भागिदारी नवी दिशा देणार आहे. या 12 कलमी काग्रक्रमाच्या दस्तएवेजामध्ये निल अर्थशास्त्र (मासेमारी), अंतराळ संशोधन, अन्न सुरक्षा साखळी यासारख्या क्षेत्रात सहकार्य केले जाणार आहे. चौरस पोषण आहारामुळे कुपोषण दूर होईल तसेच दहशतवाद निर्मूलन, सायबर गुन्हेगारी विरूद्ध सामुदायिक आणि डिजिटल क्रांतीला हातभार ही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत या देशांना प्रगत माहिती तंत्रज्ञानाचे साह्य करून भारत विशेष आर्थिक कोष उपलब्ध करून देणार आहे.

**भू-राजनैतिक महत्व :** दक्षिण पूर्व आशियाई देशामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सुरक्षा विषयक प्रश्नांचा ओहापोह करून डावपेच निश्चित करण्यात आले. तसेच महासत्तांच्या राजकारणाला प्रतिशह देण्यासाठी नवी व्यूव्ह रचना करण्यात आली. आणि दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या जागतिक स्तरावरील प्रभाव क्षमता वाढविण्यासाठी करत असलेले प्रयत्न पाहून जागतिक नेत्यांनी या राष्ट्रांच्या क्षमता बद्दल प्रशंसा केली. विकासाबाबत सक्रिय असलेले हे देश शेती उद्योग, माहिती तंत्रज्ञान डिजिटलाइजेशन या क्षेत्रात परस्पर सहकार्यासाठी सक्रिय झाले आहेत. दर दोन वर्षांनी होणारी ही परिषद पुढील वर्षी लावोस या देशात होणार आहे. 24 फेब्रुवारी 1967 रोजी या संघटनेची स्थापना झाली व गेल्या 56 वर्षापासून कार्यरत आहे. या संघटनेच ध्येय विकासातील भागिदारी असून मिशन व व्हिजन आखण्यात आले आहे. भारत व आग्नेय आशियाई राष्ट्रे तसेच संवाद भागिदार म्हणून चीन, जपान, दक्षिण कोरीया या देशांचाही समावेश करण्यात आला आहे. आशियांचा व्यासपीठावर आग्नेय आशियाई राष्ट्रातील विकासाच्या प्रश्नांवर दर दोन वर्षानी एकत्र येऊन मंथन घडविले जाते. या बैठकितून त्याच्या पुढे भेडसावणाऱ्या जिवंत प्रश्नांवर सातत्याने आढावा घेतला जातो या राष्ट्रांच्या समोर असलेल्या अनेक ज्वलंत प्रनांवर मार्ग शोधले जातात.



**उज्वल भविष्याचा वेध :** आशियान राष्ट्रांनी मागे वळून पाहिले आणि पुढील भविष्याचा वेध घेतला भारताने डिजिटल क्रांतीला सामोरे जाण्यासाठी जाहिर केलेल्या कोषामुळे ह्या राष्ट्रामध्ये समाधानाचे वातावरण परसले आहे तसे किमोर येथे भारताची वकालत उघडण्याची घोषणा पंतप्रधानानी केली. त्यामुळे आशियान देश व भारतामध्ये लोकसंपर्क वाढण्यास मदत होईल तसेच 2015 पासून मुक्त व्यापारातील अडथळे कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारत व आशियान दरम्यान या पूर्वी झालेल्या मैत्री करारांची पार्श्वभूमी लक्षात घेता या वर्षी पंतप्रधानानी घोषित केलेला 12 कलमी विकास कार्यक्रम प्रत्यक्ष घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कृती करण्यासाठी उपयुक्त ठरला आहे. प्राचीन काळात असेलेले आपले सांस्कृतिक संबंध अधिक भक्कम करण्याचे दोन्ही देशांनी केलेले प्रयत्न हे भविष्याचा वेध घेतला असता अधिक रचनात्मक व सखोल ठरले आहेत. यावर्षीच्या आशियान शिखर परिषदेन मागील भूतकाळापेक्षाही अधिक ठाम भूमिका घेऊन दमदार पाऊले टाकले आहेत.

**समारोप :** 21 वे शतक हे आशियाचे शतक आहे. भारत व आशियान राष्ट्रे इतिहास व भूगोलांनी एकत्र बांधलेली आहेत. या देशाच्या विकासासाठी भारताने 12 कलमी विकासाचा कार्यक्रम निश्चित केला आहे. हा कार्यक्रम भावी परिवर्तनाची नांदी ठरेल. दक्षिण पूर्व आशियातील राष्ट्रांमध्ये आलेले नैराश्य दूर करण्याचे काम 18 व्या पूर्व आशिया शिखर परिषदेने केले जकार्ता येथे एकाच वेळी आशियान तसेच पूर्व आशियान शिखर परिषद एकत्र घेण्यात आली या परिषदेत पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी सर्व आग्नेय आशियाई राष्ट्रांना विकास व प्रगतीची नवी हमी दिली. सबका साथ सबका विकास हे तत्व केवळ नव्हे तर शेजारी राष्ट्रांसाठी लागू केले आहे. या परिषदेमध्ये घडून आलेले विचार मंथन हे नव्या युगाच हाक देणारे ठरले. पंतप्रधान नरेद्र मोदी यांनी भारतामध्ये कृतित आणलेले विकास मॉडेल हे आशियान देशांना प्रेरणा देणारे ठरले आहे. आशियान शिखर परिषदेत सर्व सदस्य राष्ट्रांनी भारताचे चंद्रयान मोहिमे बद्दल विशेष अभिनंदन केले. जकार्ता शिखर परिषदेचा संदेश हा हिंद प्रशांत क्षेत्राचे स्थैर्य शांतता व विकासावर भर देणारा आहे. नव्याने संघर्ष करू नका तणाव कमी करा असे इंडोनेशियाने आव्हान केले. चीन म्हणतो की आमेकिचेची बाजू घेऊ नका आणि चीनच्या सागरी कोंडाईस अमेरिकेचा विरोध आहे. खरे तर बड्या राष्ट्रांनी हिंद प्रशांत क्षेत्रात अशांतता आणू नये हे सर्व लक्षात घेऊन दक्षिण चीन समुद्रातील चिनच्या वाढत्या कारवाया शांततेत धोका ठरतात. तसेच उत्तर कोरियाही अडचणी वाढवितांना दिसतो त्यामुळे नवीन संघर्ष नवीन तणाव या पार्श्वभूमिवर भारताने दिलेला 12 कलमी विकास कार्यक्रम महत्त्वाचा ठरतो. या परिषदेत भारताने घेतलेली भूमिका शांतता पूर्ण सहजिवन व विकासावर आधारलेली आहे. पंतप्रधान मोदी यांचे या परिषदेतील भाषण एक नवा विश्वास देणारे ठरले आहे. डिजिटल क्रांती आणि आर्थिक विकासाचा मार्ग अधिक मजबूत करण्यात भारताची भूमिका निर्णायक ठरली आहे. सामाजिक व आर्थिक बदलासाठी पायाभूत सुविधांचा विकास हा महत्त्वाचा ठरतो. हे लक्षात घेऊन भारताने दिलेला आग्नेय आशियाचा विकासाचा 12 कलमी कार्यक्रम हा नवा विश्वास देणारा ठरला आहे. जी-20 च्या पार्श्वभूमिवर जकार्ता शिखर परिषदेने साध्य केलेले यश आशियान देशामध्ये नव चैतन्य निर्माण करणारे आहे. अशा प्रकारे आशियान ही संघटना हिंद प्रशांत क्षेत्रातील स्थैर्याची भूमिका बनली आहे.

# भारतातील मानवाधिकार आणि आव्हाने



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतीय राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत हक्कांचा भाग तिसरा आणि राज्यांच्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्वांचा भाग चौथा हा राज्यघटनेचा गाभा आहे. त्यांचा एकत्रित विचार केल्यास त्यामध्ये मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा, नागरी आणि राजकीय हक्क त्याचबरोबर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा करारनामा यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. घटनेमध्ये समतेचा स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्ध,शिक्षण व संस्कृती रक्षण करण्याचा व घटनात्मक उपाय योजनेचा अधिकाराचा उलेख केलेला आहे व या अधिकारांना घटनात्मक रांरक्षण देखील देण्यात आलेले आहेत.मानवाधिकार म्हणजे प्रत्येक माणसाला असणारे निसर्गदत्त मूलभूत अधिकार. हे अधिकार त्याला जन्मतःच मिळतात. पण, तरीही त्यावर आक्रमण होत असते.**

त्यामुळेच ते अबाधित राहण्यासाठी प्रयत्नांची, सतत जागरूक राहण्याची आवश्यकता असते.मानवी हक्क हे असे अधिकार आहेत जे कोणत्याही व्यक्तीला जन्मतःच मिळतात. दुसऱ्या शब्दांत, कोणत्याही व्यक्तीचा जगण्याचा अधिकार, स्वातंत्र्य, समानता आणि सन्मान हा मानवी हक्क आहे. देशाच्या राज्यघटनेत (जिथे तो रहिवासी आहे) या अधिकारांची तरतूद असली किंवा नसली तरीही प्रत्येक माणूस या हक्कांची मागणी करू शकतो. त्यांच्या उत्पत्तीचा स्त्रोत मानवी विवेक नसून मानवी मानसिक गुणवत्ता आहे. यामध्ये राजकीय, सामाजिक आणि आर्थिक यांसारख्या इतर अधिकारांचाही समावेश आहे. या अधिकारांबाबत संयुक्त राष्ट्रसंघाने १९४८ साली एक घोषणा जारी केली होती. या घोषणेमध्ये असे म्हटले होते की, मानवाचे मूलभूत हक्क हे कोणत्याही वंश, जात, धर्म, लिंग, समुदाय आणि भाषा इत्यादींपेक्षा वेगळे आहेत. मानवी हक्क लक्षात घेऊन भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात मूलभूत अधिकारांची तरतूद करण्यात आली आहे. त्याच्या अनुच्छेद 12 ते 35मध्ये देशातील प्रत्येक नागरिकाला कोणताही भेदभाव न करता 6 मूलभूत अधिकार आहेत. हे अधिकार राज्यावर बंधनकारक आहेत. त्यांच्या उल्लंघनापासून नागरिकांचे न्यायालयांपासून संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. याशिवाय संविधानाच्या भाग 4 मधील राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांतर्गत अनेक कलमांमध्ये मानवी हक्कांचीही खात्री करण्यात आली आहे. मानवाधिकारांशी संबंधित अनेक मुद्दे आहेत जे अजूनही भारतासाठी आव्हान आहेत. यामध्ये बालकामगार, लोकांना चांगल्या आरोग्य सुविधा, सर्व लोकांसाठी अन्न सुरक्षा, बालविवाह, महिलांचे हक्क, कोठडीत मृत्यू आणि चकमकीत मृत्यू, अल्पसंख्याक आणि अनुसूचित जाती-जमातींच्या हक्कांचे संरक्षण हे प्रमुख आहेत. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांना मानवाधिकार आयोगाच्या शिफारशी स्वीकारणे बंधनकारक नाही. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे आयोगाच्या शिफारशींची अद्यापही पूर्ण अंमलबजावणी होत नाही. प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क न्यायालयाची स्थापना आजही केवळ कागदावरच आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 च्या कलम 30 आणि 31 मध्ये प्रत्येक जिल्ह्यात मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याविषयी सांगितले आहे. राज्य सरकारांना ही जबाबदारी संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या संमतीने पार पाडावी लागते. देशातील अनेक जिल्ह्यांतील सत्र न्यायालयांना मानवाधिकार न्यायालये म्हणून काम करण्याची जबाबदारी देण्यात आल्याचे सांगितले जाते, मात्र बहुतांश जिल्ह्यांमध्ये अशी न्यायालये केवळ कागदावरच अस्तित्वात आहेत. परिस्थिती इतकी दयनीय आहे की वकिलांनाही त्यांच्या जिल्ह्यात अशी न्यायालये अस्तित्वात आहेत याची माहिती नाही. तसेच त्या जिल्ह्यातील लोकांमध्ये अशा न्यायालयांबाबत जागरूकता वाढवण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत. जुलै 2019 मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या संदर्भात केंद्र आणि राज्यांना नोटीसही बजावली होती. या दिशेने वेगाने काम करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची नितांत गरज आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग कोणत्याही मुद्द्यावर केंद्राकडून उत्तर मागू शकतो, परंतु राज्य मानवी हक्क आयोगाला तसा अधिकार नाही. राष्ट्रीय आयोग देखील सशस्त्र दलांद्वारे मानवी हक्क उल्लंघनाशी संबंधित प्रकरणांमध्ये केंद्राकडून अहवाल मागू शकतो. मानवाधिकार आयोग नुकसान भरपाई मागू शकतो, पण आरोपीला अटक करण्यासाठी तपास करण्याचा अधिकार त्याला नाही. आयोगाचे अधिकार वाढवूनच मानवाधिकारांना खऱ्या अर्थाने संवर्धन करता येईल. मानवी हक्क संरक्षण कायद्यांतर्गत, घटनेच्या एक वर्षानंतर तक्रार दाखल झाल्यास, आयोग त्या तक्रारींची चौकशी करू शकत नाही. अशा स्थितीत आयोगाकडे चौकशी न करता अनेक तक्रारी कागदावरच दडल्या जातात. द्वितीय प्रशासकीय सुधारणा आयोग (सेकंड एआरसी) ने देखील आपल्या अहवालात मानवाधिकार आयोगाला अधिक प्रभावी बनवायला हवे असे मान्य केले होते. मानवी हक्क आयोगाने तक्रारींचा निवाडा करण्यासाठी उपयुक्त मापदंड निश्चित केले पाहिजेत. या प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी वैधानिक आयोगामध्ये अंतर्गत यंत्रणा विकसित करावी. दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगानेही आयोगाचे कामकाज प्रभावी करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये सहकार्य वाढवण्याची शिफारस केली होती. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना संयुक्त राष्ट्रसंघाकडून मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा स्वीकारल्यानंतर भारतात स्वतंत्र मानवाधिकार संस्था स्थापन करण्यास ४५ वर्षे लागली. भारतात, मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 अंतर्गत 12 ऑक्टोबर 1993 रोजी भारतीय राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# महावितरणमध्ये अभियंता दिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या औरंगाबाद परिमंडल कार्यालयात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले व महापारेषणचे माजी संचालक उत्तम झाल्टे उपस्थित होते तर औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी झाल्टे यांनी विश्वेश्वरय्या यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. समाजाच्या व देशाच्या प्रगतीत अभियंत्यांचे मोलाचे योगदान असून महावितरणचे अभियंतेही घराघरात प्रकाश पोचवण्याचे काम करत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. खपले म्हणाले की, अभियंत्यांनी 'सोशल इंजिनीअरिंग' देखील केली पाहिजे. महावितरणच्या अभियंत्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून लोकाभिमुख सेवा दिली पाहिजे. डॉ.केळे यांनी महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अभियांत्रिकीतील योगदान सांगून संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांनीही विजेचा उल्लेख आपल्या साहित्यात केल्याचे दाखले दिले.

अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी, उत्क्रांत धायगुडे, कार्यकारी अभियंता प्रेरणा बनकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता विनय घनबहादूर, उपकार्यकारी अभियंता विजय दुसाने, सहायक अभियंता अविनाश चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता मोहन काळोगे, उपमहाव्यवस्थापक प्रवीण बागुल, कांचन राजवाडे, प्रभारी सहायक महाव्यवस्थापक स्वाती चव्हाण-गाडेकर, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, सतीश खाकसे, जयंत खिरकर, मकरंद कुलकर्णी, प्रेमसिंग राजपूत, प्रणाली विश्लेषक मनीषा निफाडकर, राजाराम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमुख लिपिक जयश्री कांबळे, निम्नस्तर लिपिक सागर अग्रवाल यांनी परिश्रम घेतले.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अमृत महोत्सवी वर्षा निमित्त पैठण शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थी , शिक्षक यांच्या भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी शहरातील 15 शाळांमधून 2000 विद्यार्थी सहभागी झाले होते. या प्रसंगी बेटी बचाओ, बेटी पढाओ, बालविवाह प्रतिबंधक कायदा, अंधश्रद्धा निर्मूलन, मराठवाडा मुक्ती संग्राम लढा, पर्यावरण वाचवा,पाणी वाचवा,झाडे लावा, झाडे जगवा, लसीकरण, मुलींचे शिक्षण, आंतरराष्ट्रीय साक्षरता अभियान, कुटुंब नियोजन यावर आधारित पथनाट्य सादर करण्यात आले.सर्व शाळांमधून स्वातंत्र्य वीर,क्रांतिवीर, शास्त्रज्ञ, संशोधक, क्रीडापटू, विविध संत यावर आधारित वेशभूषा करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना शालिवाहन नागरी पतसंस्थेकडून पिण्याचे पाणी व बिस्किट वाटप करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून रॅली ला तहसीलदार सारंग चव्हाण यांनी झेंडा दाखवून सुरुवात झाली. रस्त्याने जातांना सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. शाहीर सुधीर शिंदे,किरण गाडेकर, प्रमोद कोकाटे,दत्तात्रय सपाटे,सिद्धार्थ वाघ यांनी मराठवाडा महती व शिवछत्रपती यांच्यावर पोवाडा सादर केला. हुतात्मा स्मारक येथे सर्व स्वातंत्र्य सैनिक यांच्या नातेवाईकाचा तालुका प्रशासनाकडून यथोचित सन्मान करण्यात आला. मा.तहसीलदार श्री.सारंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार व श्री.प्रकाश लोखंडे शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या नियोजनानुसार श्री.समशेर पठाण सर,श्री.हमीद सर, श्री. शेवणकर सर,फुंदे सर,गलांडे सर ,चितळे सर,फलके सर,पठाडे सर,गाढे सर,झारखंड सर,मोरे सर,लोंढे सर,भापकरसर, राहुलढाकणे,श्रीम .पैठणपगारे कल्पना,विद्याआंधळे मॅडम, वैशाली कुटे, बिसेन मॅडम व इतर सर्व शिक्षक, मुख्याध्यापक यांनी विशेष परिश्रम घेतले. या वेळी श्रीम.डॉ. उर्मीला चाकूरकर, प्रा.संतोष गव्हाणे, शेख शेरू भाई,डॉ.पंडित किल्लारीकर,डॉ.चाकूरकर, श्री.किशोर चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी सहसंचालन समशेर पठाण यांनी केले. प्रास्ताविक श्री.प्रकाश लोखंडे यांनी ,श्री.अनिल पुदाट साहेब शिक्षण विस्तार अधिकारी यांनी मराडवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव चे महत्त्व सांगितले तर अध्यक्षीय समारोप श्री.सारंग चव्हाण तहसीलदार साहेब, पैठण यांनी केला. पैठण शहरात मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त सुंदर उपक्रम राबविल्या बद्दल सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांना धन्यवाद दिले.





# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधत चित्रकला स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी चित्रकला हे अतिशय प्रभावी माध्यम असल्याने मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधत चित्रकला स्पर्धेचे १६ सप्टेंबर शनिवारी पैठण शहरातील निंबार्क इग्लीश स्कुल मधे आयोजन करण्यात आले होते. ईयत्ता ४ थी ते ९ च्या सर्वच विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत सहभाग नोंदवला . याठिकाणी पैठण पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी प्रकाश लोखंडे यांनी भेट देवून विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रे पाहणी केली याठिकाणी प्रत्येक वर्गाला स्वतंत्र विषय देण्यात आला होता. प्रमुख्यानी चंद्रयान ३ विषयी विद्यार्थ्यांनी सविस्तर चित्र काढुन शिक्षण विस्तारअधिकारी यांनी विचारलेल्या प्रश्नाना उत्तरे दिली. वरिष्ठ पत्रकार चंद्रकात तारु ,सुरेश वायभट यांनी चित्रकला स्पर्धा उपक्रमाबद्दल विद्यार्थीचे कौतुक केले. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रविण मोरे, मुख्याध्यापक त्रिंबक बटूळे, सहशिक्षक रामनाथ जवरे, दत्तात्रय चेडे, कृष्णा जाधव, सौ.साधना मोरे, सौ पूजा औटे, प्रतिभा ज्योतीक, मीरा जाधव,.शाईन पठाण, प्रमोद ढाकणे, छाया काकडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गणेशोत्सवाच्या काळात ४०० फिरती स्वच्छतागृहे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आगामी गणेशोत्सवासाठी महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आलेली तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विसर्जन व्यवस्था, मूर्तीसंकलन केंद्र, विसर्जन ठिकाणी जीवरक्षकांची नियुक्ती, स्वच्छतागृहांची उपलब्धता आदींबाबत महापालिका प्रशासनाकडून नियोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या कालावधीत ४०० फिरती स्वच्छतागृहे आणि १५० फिरत्या हौदांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत विविध भागांत ४०० फिरत्या स्वच्छतागृहांची सुविधा देण्याचे नियोजित आहे. टॉयलेट सेवा ॲपमध्ये पत्ता टाकून त्या भागातील स्वच्छतागृहे शोधता येणार आहेत.




महाराष्ट्र Business Katta












# मराठवाड्यातील शेतकरी



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**शेतकरी मग तो कोणत्याही प्रांतातील असला तरी त्याचे म्हणून जे काही प्रश्न असतात ते एकसामायिक असतात असे आपण गृहीत धरतो, परंतु मराठवाड्यातील शेतकरी आणि उर्वरित महाराष्ट्रातील शेतकरी यांच्यात काही बाबतीत निश्चितच फरक आहे. त्याचे कारण त्याला दिलेल्या आश्वासनात जसे आहे तसेच भौगोलिकता हा घटक देखील महत्त्वाचा आहे. १८७० मध्ये सालार जंग याने राज्य पुनर्रचना करताना जो औरंगाबाद सुभा निर्माण केला तो म्हणजे आजचा मराठवाडा होय. अजिंठा, बालाघाट आणि सह्याद्रीच्या डोंगररांगांच्या मधील दारिद्र्य, कोरडवाहूपणा आणि राजकीय बेफिकिरीचा विस्तृत प्रदेश म्हणजे मराठवाडा होय.**



## क्षितिजापल्याड

काही अपवाद वगळता आठ जिल्हे आणि शहात्तर तालुक्यातून दिसून येणारा भणंगपणा म्हणजे आजचा मराठवाडा.

शेतकऱ्यांच्या विपन्नावस्थेकडे अर्धवट नागरी समाज तो त्यांचा प्रश्न म्हणून दूर्लक्ष करतो आहे, पण शेतकरी आज जात्यात तर आपण सुपात आहोत याचे भान मात्र त्यास नाही. नगदी पीक कमावणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र आणि इतरांकडे लक्ष देताना मराठवाड्यातील ज्वारी, सोयाबीन, कापूस करडी, तीळ, कारळ याकडे कोण कशाला लक्ष देईल? मराठवाड्यात जायकवाडीचा जो मोठा प्रकल्प आहे तो शेतीशिवाय शहरी आणि औद्योगिक भागाची तहान भागवण्यातच संपून जातो अशी अवस्था. एकूण पावसाच्या सत्तर टक्के पाणी वाहून जाते आणि हे वाहून जाणारे पाणी जमिनीच्या मगदुराप्रमाणे कसदार मातीदेखील वाहून नेते आणि पर्यायाने जमिनीचा पोत घसरतो. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना जर पाणी उपलब्ध करून दिले तर अनेक प्रश्न सुटू शकतात, परंतु स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांच्यानंतर तशी इच्छाशक्ती असणारा राजकीय नेता मराठवाड्यात निपजू नये हे दुर्दैव आहे. आज जी शेती आहे ती विशेष आर्थिक क्षेत्र, खाणपट्टे, औद्योगिक वसाहत, शहरविकास, महानगरांचा विस्तार, विमानतळ, महामार्ग यात मोठ्या प्रमाणात जात आहे. वाढीव रकमेच्या अमिषापोटी शेतकरी ती शासनाला देतो देखील पण हा पैसा शेतकरी जास्त काळ टिकवू शकत नाही. कारण काहीच न करता आलेली संपत्ती अति चंचल असते ती वाह्यातपणातच खर्च होते हा सार्वत्रिक अनुभव आहे. मग अशा शेतकऱ्यांची मुले काही दिवस उधळण संपल्यानंतर

शेतीवरून उठतात व झोपडपट्टीत स्थिरावतात. कामाची भीक मागण्याशिवाय आणि अर्धपोटी किंवा उपाशी राहण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय उरत नाही. ज्यांच्या जमिनी रस्त्यासाठी गेल्या आणि ज्यांना मुआवजा मिळाला अशी गावातील मंडळी आठवून पहा. एकेकाळी ढेरीवरून हात फिरवत गावभर फिरणारा इसम आज पोटाची खळगी भरण्यासाठी दारोदार भटकताना आढळेल. असो. विदर्भापाठोपाठ मराठवाड्यात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. एकूण महाराष्ट्राचा विचार करता जवळपास तीस ते पस्तीस टक्के कापूस उत्पादन मराठवाड्यात होते. गोदावरी, वैनगंगा, दुधना, पूर्णा, मन्याड या नदीखोऱ्यातील सुपीक जमिनीच्या पट्टयात कापसाचे पीक घेण्यात येते.

औरंगाबाद, जालना, बीड, परभणी आणि नांदेड या जिल्ह्यातील मोठे क्षेत्र या पिकाखाली येते.

नांदेड येथे कापूस संशोधन केंद्र देखील असताना काही अपवाद वगळता म्हणावे तसे संशोधन होत नाही. परभणीच्या कृषी विद्यापीठाची तीच अवस्था. याला कारण जशी राजकीय अनास्था तशीच जाणत्या लोकांनी याकडे केलेले दूर्लक्ष हे होय. यात सामान्य शेतकरी मात्र पिसल्या जात आहे याकडे

मात्र कोणाचेच लक्ष नाही. यातून शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले. या आत्महत्येसंदर्भात २००४ साली ऑल इंडिया बायोडायमॅनिक अँड ऑरगॅनिक फार्मिंग असोसिएशनने एक जनहित याचिका दाखल केल्यानंतर टाटा समाजविज्ञान संस्थेने यासंदर्भात आपला अभ्यास अहवाल सादर केला. यात विदर्भ आणि मराठवाड्यातील जालना, उस्मानाबाद, बीड आणि हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. यात असे आढळून आले की, कर्जाचा असह्य बोजा, वसुलीसाठी तगादा, कर्ज घेण्याचे कारण वाढता उत्पादन खर्च, घसरलेले शेतमालाचे भाव, बीटी कापसाबाबत झालेली फसवणूक जमिनीचे




तुकडेकरण आणि सिंचनाचा अभाव ही काही महत्त्वाची कारणे यातून पुढे आली. जानेवारी ते जुलै २००६ या सहा महिन्यांत १३५ आत्महत्या मराठवाड्यात झाल्या. कारण वाढता उत्पादन खर्च, आजारपण, शिक्षणावरील वाढता खर्च, शेतीमालास योग्य भाव न मिळणे. बसच्या पासचे पैसे वडील भरू शकत नाहीत कारण त्यांची आर्थिक परिस्थिती तशी नाही म्हणून मागे बीड जिल्ह्यातील एका शाळकरी मुलीने चिठ्ठी लिहून आत्महत्या केल्याची बातमी आपण सर्वांनी वाचली होती. ज्वारी, मूग, उडीद, बाजरी, तीळ, अंबाडी, कारळ, मका, कापूस, सोयाबीन पिकवणाऱ्या या प्रदेशाकडे उशिरा का होत नाही पण लक्ष दिल्यास हा भाग सुधारू शकतो.गरज आहे ती फक्त राजकीय इच्छाशक्तीची. मराठवाडा महाराष्ट्रात विनाअट सामील झाला तरी नागपूर करारातील अटी मराठवाड्याला देखील लागू होतील असे आश्वासन महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सभागृहात दिले होते. परंतु नंतरच्या काळात मात्र राजकीय नेतृत्वाला त्याचा विसर पडला. वैधानिक विकास महामंडळाकडून देखील म्हणावे तसे काम झाले नाही. कधी कधी विकासनिधी अक्षरशः परत गेला, ही वस्तुस्थिती आहे. सिंचनाची सुविधा आणि सहकार शेतीच्या माध्यमातून मराठवाड्यातील शेतकऱ्यांना लाभ मिळवून देता येईल. त्यासाठी जाणीव जागृती आणि इच्छाशक्ती महत्त्वाची आहे. राजकीय पक्षासोबतच इतर संघटनांनी देखील या कार्यास वाहून घेतले पाहिजे. सुरवातीच्या काळात माकप, शेकाप, शेतकरी संघटनेने या भागात बरेच कार्य केले. अगदी परभणीला झालेल्या शेतकरी संघटनेच्या दुसऱ्या अधिवेशनात पुढाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना गावबंदी ही घोषणा प्रभावी ठरून अनेक ठिकाणी आंदोलने झाली होती. परंतु नंतरच्या काळात संघटनेला राजकीय भूमिका घेता न आल्याने संघटना विखुरली आणि शेतकऱ्यांना दुसरा कोणी वाली राहिला नाही. येत्या काळात शेतकरी आणि शेती प्रश्न घेऊन सातत्याने काम करण्याची आवश्यकता आहे. **(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# कंत्राटी नोकरी, भांडवलदारांची चाकरी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारताने लोकशाही चा स्विकार करून सत्तरवर्षे पुर्ण केली. लवकरच आम्ही लोकशाही चा अमृतमहोत्सव साजरा करू. लोकशाहीचा स्विकार करून आता पंचेहत्तर वर्ष पुर्ण होताना ही मात्र लोकशाही व संविधान हे अजूनही लोकांना कळाले नाही. देशाचे संविधानच लोकांना न कळणे हि खुप मोठी शोकांतिकाच नाही तर देशासोबत केलेला द्रोह असुन आम्ही नैतिक दृष्टीने अडाणी आहोत याचे लक्षण आहे. भारतीय संविधानाला जगात एक आगळे वेगळे महत्त्व आहे. कारण भारतीय संविधानाने हजारो वर्षापासून चालत आलेली विषमता, थोतांड व गुलामीची व्यवस्था उलथून समता बंधुता न्याय, स्वातंत्र्य शिक्षण व हक्क अधिकार बहाल करून प्रत्येक नागरिकांना सारख्याच प्रमाणात सक्षम केले. परंतु याची जाणीव अनेकांना नाही. देशामध्ये लोकशाही लागु झाली आणि देशाचा कारभार सर्व सामान्य लोकांच्या हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला. परंतु प्रत्यक्षात आपण जर बघितले तर सर्वसामान्य लोकांना लोकशाहीचा आजही अर्थ पाहिजे तसा कळाला नाही.**

म्हणून लोकशाहीचा फायदा ज्या लोकांना व्हायला पाहिजे होता तो समुह आजही लोकशाही पासून खुप दूर आहे. हे सत्य नाकारू शकत नाही. एकिकडे लोकशाहीचा स्विकार करून शासन प्रशासनामध्ये प्रत्येक भारतीयांना समान संधी व समान दर्जा निर्माण करून सत्तेतही सहभागी होण्याचा अधिकार भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहाल केला. संविधानाने भारतीयांना हक्क अधिकार बहाल तर केलेच परंतु त्यांचे मजबूत संरक्षण सुद्धां करून दिले म्हणजे काहीही झाले तरीही नागरिकांचे मुलभूत हक्क कमी करता येणार नाहीत. आणि दुसरी गोष्ट म्हणजे कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारून शेवटच्या घटकाचा विकास करणेही सरकारचे काम आहे असे संविधान सांगते. तरीही आजही देशातील नागरिकांच्या समस्या कमी न होता वाढत जात आहेत. तर या मागचे मुळ कारण काय हे समजून घेणेही गरजेचे आहे. काही सत्य गोष्टी पचणी पडत नाहीत म्हणून, मनाला पटत नाहीत तरीही त्यावर बोलणे प्रबोधन करणे आवश्यक आहे. स्वतःला शिक्षीत समजणाऱ्या लोकांना ही सत्य गोष्टी मनाला पटत नाहीत म्हणून काल्पनीक गोष्टींना सत्य समजतात व जगतात. कारण काल्पनीक गोष्टींना सत्य माणणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. आणि काल्पनिक गोष्टींमधून कुठेतरी मनात भीती निर्माण करून दिली आहे. म्हणून बरेच लोक काल्पनिक बाबीं सत्य समजतात पण अशा ठिकाणी शिक्षणाचा फायदा काय? शिक्षणाने माणूस जागृत तर्कवादी बनुन सत्याचा स्विकार करून चुकिचे व काल्पनिक बाजूला सारून आदर्श जिवन जगतो तो सुशिक्षित असतो. असो सुशिक्षित माणुसही जागृत व तर्कवादी का नाही बनला हेच बघने आवश्यक आहे. भारतात हजारो वर्षांपासून जातीच्या नावाखाली विषमता, थोतांड, अंधविश्वास पाखंड निर्माण करून त्याआधारे स्वतः चे वर्चस्व निर्माण करून पोट भरण्याचे काम काम काही माणुसकी नसलेल्या लोकांकडून केल्या गेले. माणसाला माणूस म्हणून कधीच एकत्र येऊ न देता प्रत्येक जातीचा फायदा मात्र स्वतः साठी करून घेणारे धुर्त लोकांनी शिक्षण हक्क अधिकार व सर्वांगीण विकासापासून दुरच ठेवले. संविधानाच्या माध्यमातून हे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मोडून जरी काढले तरीही जातीय विषमता, अस्पृश्येतेची घाण डोक्यात असलेल्या लोकांनी कधीच भारतीय संविधान व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेतलेच नाही. शिक्षणाचा गंधही नसणाऱ्या, कोणताही हक्क अधिकार नसताना, संविधानाच्या अगोदर कुटुंबातील कोणीही सत्तेत वा लाभाच्या पदावर नसताना, एवढेच काय तर शेतजमीन भरून असुन, गजगंड श्रीमंत असुन गावातील शेतीचा हिशोब व शेतसारा गोळा करण्याचा ही अधिकार नसणाऱ्या लोकांना भारतीय संविधानाने राजकारणात आमदार खासदार केले, मंत्री केले. प्रशासनात मोठ्या पदावर अधिकारी, सचिन झाले हे केवळ संविधानामुळेच. परतुं एवढ्या मोठा पदावर गेल्यानंतर ही संविधान व बाबासाहेब वाचले नाही कारण डोक्यात कायम जात आहे. आज प्रत्येक जन इतर जातीला कमी समजून स्वतःला श्रेष्ठ समजून स्वतः चीच पाठ थोपटण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु सत्य परिस्थीती बघितली तर संविधानाचे मोठ मोठ्या हुद्यावर बसुन, लाखों रुपयांचे पगार घेऊन, स्वतः च्या कुटुबांची काळजी घेणारे, सोबत पेन्शन व इतर सुविधा घेऊन निवृत्तीनंतर ही आपले जिवन अगदी सुखा समाधानाने जगुन नोकरी चा थाट सांगणारे लोक संविधान समजून सांगत नाही तेव्हा त्यांच्या अज्ञानाची किव येते. ज्यांना समता बंधुता, न्याय, हक्क अधिकार इतरांना मिळूच नये असे वाटत होते पण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून बहाल करून दिले. पण विषमतावादी लोक यांनी देशातील लोकांच्या डोक्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान जाऊच दिले नाही. शिकलेल्या लोकांनाही ते समजून च नाही म्हणून जाती धर्माच्या नावाखाली मानसिक गुलाम बनवून संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर, आणि आरक्षण विरोधी विचार लोकांच्या मनात रूजवले व स्वतः शिकलेले, संविधानामुळे बोलायला लागलेले, आरक्षणामुळे च नोकरी वर लागुन उच्च पदावर गेलेले लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर व आरक्षणाच्या विरोधात बोलायला लागले तेव्हा यांचा बौद्धिक विकास झालाच नाही हे लक्षात आले. याचाच फायदा याच लोकांविरुद्ध कट कारस्थान करण्यासाठी विषमतावादी लोक घेत आहेत. याची जाणीव आजही लोकांना नाही हि खरी खंत आहे. लोकांच्या समस्या वाढवून सुद्धा लोक बोलत नसतील तर हे गुलामीचे लक्षण आहे. म्हणूनच आरक्षणाचे गाजर दाखवून जनतेची दिशाभूल करून संविधानाने दिलेल्या कायमस्वरूपी नोकरी, आरोग्य सुविधा, शिक्षण, पेंन्शन सर्व काही बंद करून टाकले तरीही लोकांना चिड आली नाही. विषेश म्हणून ज्यांच्या कडे काहीच नव्हते त्यांना संविधानाने शिक्षण, कायमस्वरूपी नोकरी, आरोग्य सुविधा, लाखों रुपयाचा पगार व पेंन्शन दिले. एवढे घेऊनही लोकांना संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले नाही म्हणून आज विषमतावादी लोकांनी संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले सर्व काही बंद करत आहेत. शासकीय नोकरी बंद करून कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करणार म्हणजे पुन्हा देशातील लोक भांडवलदारांचे गुलाम होणार. देशातील संवेदनशील व गुप्त माहिती भांडवलदारांच्या हाती जाणार. फुट भर जागेसाठी भावा भावात भांडणे करणारे, शे पाचशे रुपये कोणाला दिले तर वारंवार माघणारे लोक देशातील संपती ही केवळ मुठभर लोकांच्या हाती जात असताना आणि संपतीचे मुळ मालक भिकारी होत असताना ही शांत आहेत. याचा अर्थ गुलामी खोलवर गेली आहे. आज आपण बोलु शकतो, लिहु शकतो. आंदोलन करू शकतो तरीही लोक घरात बसले आहेत. स्वतः चे चांगले जिवन जगणाऱ्यांना येणाऱ्या पिढीची काळजी दिसत नाही. कंत्राटी कामगारांची भरती झाली तर पगार कमी, नोकरीची हमी नाही, सुरक्षेतेची हमी नाही, इतर सुख सुविधा नाही. भांडवल दार लोकांच्या विरोधात बोलु शकणार नाही. जो भांडवलदार लोकांच्या विरोधात बोलेल त्याला नोकरी मिळणार नाही. म्हणजे पोटभरण्यासाठी भांडवलदार लोकांची चाकरी करावी लागणार. आणि भारतीय संविधान सांगते तुम्ही या देशाचे मालक आहात. वडिलांचे निवृत्ती वेतन हे मुलांच्या पगारापेक्षा कमी आणि नोकरी ची हमी नसेल तरीही वडील आणि मुलगा यांच्या पैकी एकालाही व्यवस्थेची चिड येत नसेल तर ते कधीच गुलामी मधुन बाहेर येऊ शकणार नाही. कायमस्वरूपी नोकरी मध्ये हक्क अधिकारासाठी नोकरदारांना लढता येत होते. कंत्राटी मध्ये लढणे सोडा बोलताही येणार नाही. अशी परिस्थिती आपण स्वतः च्या अंगावर ओढावून घेतली आहे. आणि यासाठी जर आजही आवाज उठवला नाही तर भांडवलदार लोक सर्वसामान्य माणसाला लाचार बनवल्या शिवाय सोडणार नाहीत. भांडवलदार लोकांची चाकरी करायची तर लोकशाही कुठे जिवंत राहणार? लोकशाही मध्ये सार्वजनिक मालमत्ता ही जनतेच्या मालकीची असते. जनतेचेच प्रतिनिधी सरकार चालवत असतात. सरकारच आपल्या कर्मचारी अधिकारी यांची निवड करत असते. जर कंपनी कर्मचारी अधिकारी यांची निवड करेल, कंपणी पगार देईल तर मग ही भांडवलशाही झाली. मुळात डोक्यात विषमतावादी लोकांनी टाकलेले संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि आरक्षण या बद्दलचे चुकिचे विचार बाजूला काढून जातीची घाण बाजूला फेकून येथे माणसाला शिक्षण, आरोग्य हक्क अधिकार पाहिजे व जिवन जगण्यासाठी कायमस्वरूपी नोकरी पाहिजे आणि कोणत्याही जातीला नाही तर देशात राहणाऱ्या लोकांना पाहिजे हि भावना मनात रुजून जोपर्यंत समता बंधुतेची उर्जा निर्माण होणार नाही. तोपर्यंत सत्य कळणार नाही. म्हणजे माणसाच्या समसस्येवर माणसाने जागृत झाले पाहिजे. आज पर्यंत जात धर्म पाहून राजकीय नेत्यांना निवडून दिले त्या नेत्यांनी स्वतः ची भरभराट करून घेतली, स्वतः ला लाखों रुपयांचे पगार व पेंन्शन वाढवून घेतले आणि तेच लोक आज एका सरकारी पगारावर कंत्राटी मध्ये तिन लोक काम करू शकतात तर तो जनतेचा प्रतिनिधी नाही कंपनीचा प्रतिनिधी आहे. जनतेचे प्रतिनिधी जनतेच्या बाजुने बोलतात. परंतू शिक्षण, रोजगार, आरक्षण, यावर कोणीही बोलताना दिसत नाही. पेन्शन बंद , कायमस्वरूपी नोकरी बंद करणारे नेते जनतेचे असुच शकत नाहीत. जनतेचे प्रतिनिधी म्हणून सर्व सामान्य जनतेला भांडवलदाराच्या दावणीला बांधायचे काम सुरू केले आहे. एवढी गंभीर समस्या असुनही जर आज संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेतले नाही तर येणाऱ्या काळात गुलामी ठरलेलीच समजा. राजकीय नेत्यांना वठणीवर आणण्यासाठी आणि लोकशाही जिवंत ठेवून जनतेचे खरे प्रतिनिधी सत्तेत बसवण्यासाठी ईव्हीएम बंद करून पेपर वर निवडून घेण्याचा आग्रह धरा म्हणजे आपले हक्क अधिकार वाचतील व भांडवलदार लोकांची चाकरी करायची वेळ नाही.

# रोगराई, महागाई व भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**मारबत उत्सव ही नागपूरच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी 1880 मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली. यानंतर 1884 मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.**

आज काळ्या मारबतीला 143 वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला 138 वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ दूर व्हावा. नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही 143 वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात. असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे. त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते. मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून "ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत" अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहराती नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते. मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते "माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत"अशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही.कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून "बडगा" काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई, अत्याचार, आतंकवाद, महामारी, बॅंक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) सहभागी होतात. पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा,अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो. कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी, भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद



कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो. कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे 1897 मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर 1928 मध्ये नागपूरात हिंदू-मुस्लिम दंगल मोठ्या प्रमाणात भडकली होती. तरीही या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही. परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विग्घ निर्माण केले. परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले. मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात.यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ, पेट्रोल दरवाढ, शहरातील खड्डे,पाकिस्तान, चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी इत्यादींसह शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते. मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली. परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील139 कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो. यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो. देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की यांच्यामुळे देशात महागाईचा डोंगर उभा झाला आहे. याचे प्रायश्चित्त देशातील 139 कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सर्वप्रथम घेऊन जा गे मारबत!

# कारस्थान: नोकरभरतीचे कंत्राट, आरक्षणावर प्रहार



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**टी.व्ही.वाहिनीवरून व अनेक वृत्तपत्रामधुन शासनाकडून पंच्याहत्तर हजार विविध पदांची नोकर भरती होणार. ती भरती कंत्राट पद्धतीने असणार व त्याला कुठलेही आरक्षण लागू नसणार अशी बातमी वाचावयास मिळाली. खरे तर ही बातमी ऐकून अनेकांना जबरदस्त धक्का बसला असेल. अनेकजण अस्वस्थ झाले असतील. देशात काय चालू आहे याविषयी अनेक जण चर्चाही करत असतील. आज घडीला देशातली परिस्थिती सर्वांनाच अस्वस्थ करणारी आहे. या देशातील प्रत्येक माणूस भयावह परिस्थितीत जीवन जगतो आहे. रोज खून, मारामाऱ्या, गोळीबार, बलात्कार, आंदोलन, भ्रष्टाचार, उपोषण, जातीय धर्मीय तेढ, पेपर फुटी प्रकरण, सरकारी नोकऱ्या खाजगीकरणाकडे, महागाई, अग्निवीर योजना, कंत्राटी पद्धत, आमदार खासदार फुटाफुटी, पन्नास खोके, प्राथमिक शाळा बंद, नवीन शैक्षणिक धोरणातील बदल, शेतकरी आत्महत्या, खाजगीकरण अशा कितीतरी बातम्या वाचायला मिळतात.**

त्यातून अनेक तरुणांच्या मनावर नकारात्मक विचार बिंबला जातो. तरुणांची सकारात्मक ऊर्जा नष्ट होऊ लागली आहे. याकडे आम्ही कधीतरी गंभीर होऊन बघणार आहोत की नाही? तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे की नाही? असे कितीतरी प्रश्न देशात जीवघेणे निर्माण झाले आहेत. नव्हे ते इथल्या व्यवस्थेने आणि सरकारने जाणून बुजून केलेली दिसत आहेत. या सर्व गोष्टींचा आम्ही शिकलेली मंडळी, कार्यकर्ते, आमदार,खासदार, प्रशासकीय यंत्रणा विचार करणार आहोत की नाही? प्रत्येकाला फक्त स्वार्थ आणि स्वार्थ, लुटमार आणि भ्रष्टाचार दिसतो आहे. या देशातील जनतेचे आणि तरुणाईचे काय होणार? याबाबत आम्ही कधी बोलणार की नाही? सरकारला याविषयी जाब विचारणार की नाही ? आम्ही फक्त हिंदुत्व आणि धर्म या भोवतीच फिरत आहोत. उठता बसता, दिवस रात्र चोविस तास त्याचाच जप करायला लागलो आहोत. त्यामुळे एकमेकांविषयी एकमेकांच्या मनात राग,द्वेष,मत्सर निर्माण होऊ लागला आहे. प्रत्येकजण एकमेकाकडे संशयी वृत्तीने पाहू लागला आहे. माणूस माणसापासून दुरावत आणि तुटत चालला आहे. या गोष्टींचाही विचार कधी करणार आहोत की नाही? याकडेही सगळ्यांनी लक्ष देणे आज काळाची गरज निर्माण झाली आहे. केवळ फक्त टी.व्हीच्या बातमीत आणि नेत्यांच्या तोंडात विकास दिसतो आहे. वस्तुस्थिती बघितली तर सगळीकडे सगळ्या क्षेत्रात वातावरण अगदी भकास आणि भयावह दिसू लागले आहे. कोरोनाच्या काळात अनेकांच्या नोकरी गेल्या, आणि कारखाने,कंपन्या बंद पडल्या तो सर्व कामगार वर्ग गावाकडे येऊन भाकरीसाठी मोताल झाला आहे. गेल्या पंधरा वर्षापासून कुठल्याही प्रकारची नोकर भरती सरकारने काढली नाही. आणि त्याबाबत सरकार मनापासून विचारही करत नाही. त्यामुळे तरुणही जीवनाला कंटाळून जीवनाचे बरे वाईट करताना दिसत आहे. अनेकांचे वय संपून गेली आहे. तरीही त्यांच्या हाताला काम नाही. नोकरी नाही. कुठल्याही प्रकारची नोकर भरती नाही. जुन्याच लोकांना कमी पैशावर काम करा म्हणून सरकार सांगते आहे. नवीन तरुणांचे काय? महागाई गगनाला भिडली आहे, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही, तरुणांच्या हाताला काम नाही तरी आम्ही सारे जण ओरडतो देशाचा विकास होतो आहे. अशा अनेक गोष्टींचे जबर वादळ देशात आणि देशवासीयांच्या मनात जोरदारपणे घोंगावत आहे. या वादळातच अनेक माणसांचे जीवन गुरफटून आणि होरपळून गेले आहे, जात आहे. जीवन जगणे मुश्किल झाले आहे. सगळी माणसे एकमेकाकडे संकुचित दृष्टीने पाहत आहे. राजकारणही प्रचंड गढूळ झाले आहे. कोण काय बोलेल, कुणावर कोण कधी काय टीका करेल हे सांगता येत नाही. जिकडे तिकडे सगळ्या क्षेत्रात अनैतिकतेचा बाजार दिसत आहे. कारण सरकारच चातुर्वर्ण्यव्यवस्था निर्माण करून जोपासत आहे आणि लोकांना गुलाम करण्याचे षडयंत्र रचत आहे. संविधानाला नाकारून मनुस्मृती अआणू पहात आहे. म्हणून तर दिल्लीत संविधान जाळले जात आहे. ज्यांनी कुणी काही काम केले नाही त्यांनी ते काम आम्हीच केले आहे अशी जोरदारपणे सांगण्याची स्पर्धा सुरू आहे. खोटे बोल पण रेटून बोल हे सर्रास घडताना दिसत आहे. अनेक तरुणांना विविध प्रकारची खोटी आमिषं दाखविली जात आहेत. जाती धर्माच्या नावाखाली बहिकविले जात आहे. तरुणही मोठ्या प्रमाणावर आपले स्वतःचे करिअर सोडून भूलथापांना बळी पडताना दिसत आहे. जातीय, धर्मीय वातावरणात आजच्या तरुणाला अडकविल्या जात आहे. आरक्षणाच्या नावानं नानाविध समाज पेटून उठत आहेत. राजकारणी विविध माणसांना हाताखाली घेऊन खेळ करत आहेत. जाती-जातीत भांडणे लावत आहेत. त्यामुळे तिरस्कार वाढत आहे. त्यातच पुन्हा सरकारने पंच्याहत्तर हजार जागा भरण्यासंदर्भातील जी.आर. काढला आहे. त्यात पुन्हा कुठलेही आरक्षण नाही असेही सांगितले आहे. ह्या सगळ्या सरकारी जागा भरण्याचे काम खाजगी संस्थांना दिले आहे. त्या खाजगी संस्था ही मंत्री, आमदार आणि खासदारांच्याच आहेत असेही बोलले जाते. मग खऱ्यांना न्याय




कसा मिळेल हेही त्याहून वाईट आहे. देशाचा आधारस्तंभ असणाऱ्या तरुणांनी आता काय करायचे? हा विचार त्यांच्या मनामध्ये त्यांना सतावत आहे. अगोदरच पंधरा-वीस वर्षापासून अनेक तरुण डी.एड.,बी.एड.,नेट.,सेट.,पीएच्.डी.एम.फिल., इंजिनिअरींग व अनेक डिप्लोमे करून बसले आहेत. ज्यांची शिक्षण घेण्याची, डिप्लोमा करण्याची ऐपत नाही अशांच्या आई-वडिलांनी फार काबाडकष्ट उपसून पुढचे जीवन सुखी व्हावे म्हणून आपल्या मुला मुलींना शिकवले आहे. कधी उपाशी तपाशी राहून मुला-मुलींना त्यांनी मदत केली आहे. चार घास सुखाचे,आनंदाचे मिळतील. म्हणून आपापली शैक्षणिक पात्रता पूर्ण करून नोकरी कधी लागेल या प्रतीक्षेत अनेक तरूण चातक पक्षाप्रमाणे वाट बघत आहेत. या सरकारच्या जीआर ने मात्र त्यांचा म्हणजे तरुणांचा प्रचंड भ्रमनिराश झाला आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षापासून मोठ्या प्रमाणावर कुठेही नोकर भरती झालेली दिसत नाही. त्यामध्येही वय झाल्याने ही अनेक तरुण नोकरीपासूनही दूर गेले आहेत. अनेक जणांनी आत्महत्याही केल्या आहेत. अनेक जणांची लग्नही जमत नाहीत. त्यांना कुणी मुलीही देत नाहीत. अशी सारी परिस्थिती तरुणांची असताना सरकारने मात्र याकडे आर्थिक परिस्थितीचे कारण सांगून जाणून बुजून दुर्लक्ष केल्याचे दिसून येते आहे. प्रत्येक तरुण आपल्या या करिअरच्या संदर्भात साशंक आहे. आपल्या भवितव्याचे काय होईल या चिंतेत आहे. कुठे पोलीस शिपाई, तलाठी, ग्रामसेवक पदाची जागा असेल तर तिथे अनेक उच्च पदवीधर म्हणजेच पीएच्.डी झालेले, नेट सेट पास असलेले, इंजीनियरिंग झालेले व वेगवेगळे डिप्लोमे केलेले विद्यार्थी तिथे येतात. या सगळ्या गोष्टींचा परिणाम शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येवरही होताना दिसतो आहे. विद्यार्थी उदासीन झाला आहे. अनेक तरुण गुन्हेगारीकडेही वळताना दिसत आहेत. पण सध्या सरकारमध्ये असणाऱ्या मंत्र्यांना, आमदार,खासदारांना या तरुणांच्या जीवनाची अजिबात जाणीव असल्याचे दिसत नाही. फक्त गोरगरिबांचा विकास, हिंदुत्वाचा विकास या नावाखाली भावनिक केले जाते. मतासाठी अनेक अमिषं दाखवली जातात. वस्तुस्थिती मात्र फार वेगळी आहे. खरे तर भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५० पासून भारतीय संविधान अमलात आले. अनेक जण शिक्षणाकडे वळू लागले. शिक्षण घेऊन नाना क्षेत्रात चमकू लागले. अधिकारी होऊ लागले. बंगल्यात राहून गाडीत फिरू लागले. फुले,शाहू, आंबेडकरांचा नवा विचार ते स्वीकारू लागले. त्याच विचाराने समाजात झपाटल्याप्रमाणे क्रांती करू लागले. हीच गोष्ट मात्र अनेकांच्या डोळ्यात खूपू लागली. त्यांचा विकास केवळ आरक्षणानेच झाला आहे. ते सरकारचे जावई आहेत. त्यांना कमी टक्केवारी असली तरीही त्यांचे भागून जाते आहे असे काही बोलून त्यांचे खच्चीकरण केले जात आहे. त्यांची प्रगतीही इथल्या व्यवस्थेला पाहू वाटत नाही. त्यामुळे त्यांना आता कुठेतरी ब्रेक लावायला हवा. आरक्षण हे जातीमुळे दिले नाही याबाबत आरक्षण सत्य व विपर्यास या ग्रंथातील ' आरक्षण विरोधी भूमिकेची चिकित्सा'या लेखात डॉ.नागोराव कुंभार म्हणतात की, भारतात चातुर्वर्णव्यवस्थेमुळे मागासवर्गीयांना राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात पुरेशी प्रतिनिधित्व व सहभाग मिळालेला नाही. उलट त्यांना भेदभाव करून वागविले गेले. त्यामुळे त्यांच्या विकासात विविध अडथळे निर्माण झाले. म्हणून त्यांना औपचारिकरित्या समान वागणूक देऊन भागणार नाही तर त्यांना विशेष संधी व सवलती दिल्याशिवाय समाजात खरी समता निर्माण करता येणार नाही". खरे पाहिले गेले तर विद्यापीठ, न्यायालय, सर्वोच्च न्यायालय व विविध महत्त्वाच्या ठिकाणी अजूनही आरक्षण दिले गेले नाही. याविषयी डॉ. सतीश मस्के आपल्या कवितेत म्हणतात की, '**आरक्षण असले तरी दारिद्र्य अजून संपले नाही कायदा कितीही कडक केला**
**अजूनही त्याची अंमलबजावणी नाही**' आरक्षणाची संपूर्णपणे अंमलबजावणी अजूनही केलेली नाही तरीही आरक्षणाच्या बाबतीत अशी वाईट चर्चा केली जाते आणि तरुणांची मने भडकवली जातात. त्यात सरकारही त्याच दृष्टीने पावले उचलताना दिसत आहे. त्याचेच एक पाऊल म्हणजे आत्ताचा जी.आर कंत्राटी पद्धतीचा व आरक्षण नसलेला. आरक्षणामुळे अनेकांची झालेली थोडीफार प्रगती ही अनेकांना पाहवत नाही. अनेकांची पोटदुखी त्यामुळे वाढली आहे. मराठा समाज म्हणतो आम्हाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र द्या, धनगर समाज म्हणतो आम्हाला एस.टी प्रवर्गामध्ये टाका. नाभिक समाज म्हणतो आम्हाला एस.सी.मध्ये टाका. काहीजण म्हणतात अ‍ॅट्रॉसिटी कायदा रद्द करा. काहीजण तर कोंबडा कोंबडीला दाणे टाकून भांडणे लावावीत तशीच जाती-जातीमध्ये,धर्माधर्मामध्ये भांडणे लावण्याचे काम सरकारमधील काही राजकारणी मंडळी करताना दिसतात. त्यामुळेच सरकार हे अस्वस्थ होऊन अशा गोरगरिबांचे, दलित,आदिवासींचे, इतर मागासवर्गीयांचे, भटक्या विमुक्तांचे व संबंध बहुजनांचे खच्चीकरण करताना दिसत आहेत.हल्ली तर दलित, आदिवासी, भटके व इतर मागासवर्गीयावर विविध क्षेत्रात विविध प्रकारच्या माध्यमातून अन्याय,अत्याचार केले जातात. त्यांचे प्रचंड शोषण केले जाते. त्यांचे जगणे मुश्किल करून टाकले जाते. अनेक जण निमूटपणे सहनही करतात. आदिवासी, दलित समूहावर अन्याय अत्याचार झाले तरीही सरकारमधला एकही माणूस, आमदार, खासदार किंवा मंत्री त्यांच्यासाठी धावून जाताना दिसत नाही. त्यांची बाजू खरी असूनही कोणी मांडत नाही किंवा कोणी न्याय त्यांना देत नाही ही वस्तुस्थिती आहे. अनेक वेळा कायदा आणि सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होताना दिसतो आहे. बऱ्याच वेळेला त्यामध्ये न्यायालयही हस्तक्षेप करून शांततेचे आव्हान करताना दिसत आहे. बऱ्याच वेळेला न्यायालयाकडूनही योग्यवेळी योग्य न्याय मिळताना दिसत नाही. म्हणूनही अशी काही प्रकरणे वाढताना दिसत आहेत. म्हणूनच सरकार लोकशाहीवरही हल्ला करताना दिसत आहे. लोकशाहीमुळेच यांचे जीवन उंचावले आहे. त्यामुळे ती लोकशाही म्हणजेच संविधान बदलण्याची भाषाही केली जाते आहे. ती सबंध बहुजन समाजाला न परवडणारी आहे हे अगोदर बहुजन समाजाने लक्षात घ्यायला हवे. नाहीतर प्रत्येकाचे जीवन किड्या मुंग्याप्रमाणे आणि कुत्र्याप्रमाणे लाचार जगायला लावण्यास हे भाग पाडणारे आहेत.त्यामधीलच एक भाग म्हणजे कंत्राटी पद्धतीवर नोकर भरती करणे व तीही आरक्षणाविना. म्हणजेच सर्व दिन,दलित,गोरगरीब,आदिवासी भटक्यांना यापासून वंचित ठेवणे. इतक्या दिवस नोकर भरती न करता तरुणांना कंत्राटी नोकरी देणे हे भयानक आहे. जे मंत्री,आमदार,खासदार जनतेच्या कल्याणासाठी निवडून आलेले असतात ते मात्र जनतेचा आणि तरुणांचा विध्वंस करायला निघाले आहेत. या आरक्षण नसलेल्या कंत्राट नोकर भरतीच्या विरोधात आज सर्व जातीत धर्मातील तरुणांनी उभे टाकायला हवे. एल्गार पुकारायला हवा. अन्यथा हे सरकार तरुणांच्या आशा,आकांक्षा चुरगळून टाकल्याशिवाय राहणार नाही. जनतेच्या, तरुणांच्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे सरकारलाही काही देणे घेणे दिसत नाही. म्हणून ते अनेक आंदोलने चिरडून टाकतात. त्यांच्याकडे मानवता राहिलेली दिसत नाही.त्यांना फक्त हवी आहे सत्ता आणि स्वार्थ.म्हणून वेळीच जागे आणि सावध व्हा. आरक्षण संपविणाऱ्या षड्यंत्राला वेळीच ओळखा आणि ते षडयंत्र हाणून पाडा. हे भयानक षडयंत्र ओळखायला हवे.नाहीतर येणारा काळ भयंकर आणि भयानक असेल.

संदर्भः १) डॉ. नागोराव कुंभार, आरक्षण विरोधी भूमिकेची चिकित्सा (लेख), आरक्षण सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद, प्रथम आवृत्ती,ऑगस्ट २००८.

# तुळस



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**तुलसी मी अभेद्य दोनी । जे हरि कथा करिती याची नेमी । त्यांची चुकेल यमजाचणी । ते होती वैकुंठ वासी ४६॥ तुलसीस जे करिती प्रदक्षिणा । त्यांच्या चुकती यम यातना । बळे नेती वैकुंठभुवना । त्या प्राणियांसी ॥४७॥ तुलसीस घालती लोटांगण । ते माझे प्रेमळ भक्त जाण । कृष्ण म्हणे इच्छाभक्तीकरून । उद्धरती प्राणी ॥४८॥  एवढे महत्त्व तुळशीला का दिले गेले असावे हो ....?आपल्या हिंदू संस्कृतीत असंख्य उत्तम गोष्टी आहेत. पूर्वीच्या काळी लोकांना एखादी गोष्ट पटवून देण्यासाठी त्याला वैदिक महत्त्व दिले जायचे. धार्मिक महत्त्व दिले जायचे की ज्यायोगे त्या गोष्टीचा लोक पाठपुरावा करतील. आज विज्ञानाने  सिद्ध झालेली तुळस, कोरोना मधे आरोग्याचा कळस झालेली तुळस लाखोंचे प्राण वाचवणारे तुळशी अर्क काय सांगते हो... हेच की तुळशीचे सेवन, तुळशीचा सहवास याने यमजाचणी होणार नाही.**

म्हणजेच यमाचे घर तुळशी पासून लांब राहते. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे तुळस जास्तीत जास्त ऑक्सिजन उत्सर्जित करते असं शास्त्राने पण सिद्ध झाले आहे. फक्त पूर्वीच्या काळी त्याला धार्मिक महत्त्व दिल्यामुळे आपल्याला तुळशीला पाणी घालणे, तुळशीचे लग्न लावणे, देवाला तुळस वाहणे ह्या गोष्टी धार्मिकतेने सांगितल्या गेल्या. परंतु त्या मागचा खरा उद्देश होता तुळशीचा सहवास मिळणे.

**नामदेव महाराजांनी पण सांगितलेच आहे,**

**तुळसीविण ज्याचे घर**
**ते तंव जाणावे अघोर**
**तेथें वसती यम किंकर**
**आज्ञा आहे म्हणोनी**
**तुळसीवृंदावन ज्याचे घरी**
**त्यासी प्रसन्न श्रीहरी**
**तुळसीवृंदावना**
**जे करिती प्रदक्षिणा**
**अंत:काळा होता स्मरण**
**जन्म मरण नाही नामा म्हणे**

अर्थात ज्यांच्या घरात तुळस नाही ते घरच मुळी चांगले नाही. म्हणजे पुण्यवान नाही. ते पिशाच्यांचे घर मानले जाते. तिथे यमकिंकराची वस्ती असते. पण ज्याच्या घरी तुळशी वृंदावन आहे त्याला मात्र श्रीहरी प्रसन्न होत असतो. यमकिंकर तेथे येत नाहीत कारण तशी आज्ञा आहे. संतश्री नामदेव महाराज म्हणतात, तुळशी वृंदावनाला जे प्रदक्षिणा घालतात, अंतःकाळी तिचे स्मरण करतात ते जन्ममरणाच्या चक्रातून सुटतात.

शांतीब्रह्म श्री एकनाथ महाराज देखील म्हणतात,

**तुळशींचे पान**
**एक त्रैलोक्या समान**
**उठोनीया प्रातःकाळी**
**वंदी तुळशी माऊली**
**मनींचे मनोरथ**
**पुरती हेचि सत्य**
**तुळशीचे चरणी**
**शरण एकाजनार्दनी**

तुळशीच्या पौराणिक कथा जरी बाजूला ठेवल्या तरी तुळशीचे औषधी महत्त्व आपण दुर्लक्षित करू शकत नाही. कारण ऑक्सिजन प्रमाणेच ती जंतुनाशक देखील आहे. तिच्या सेवनाने असंख्य आरोग्यकारी गुण मिळतात. आणि म्हणूनच नित्य तुळशीचे सेवन करणाऱ्याला वैकुंठाची प्राप्ती होते असे म्हटले जात असावे.  तुळशीची माळ जो कोणी गळ्यात घालतो त्याला लक्ष्मी आणि केशव यांची प्रत्यक्ष भेट होते. याच कथांमध्ये असे सांगितले गेले आहे की समुद्रमंथनाच्या वेळी जे अमृत निघाले त्या अमृताचे काही थेंब जमिनीवर पडले आणि त्यातून तुळस निघाली. ती तुळस ब्रह्मदेवांनी भगवान श्री विष्णूला



दिली. असेच स्कंद पुराणात सांगण्यात आलेले आहे. पद्मपुराणात देखील तुळशीचा उल्लेख सापडतो. अर्थात तिच्या औषधी गुणांमुळेच तिला अमृताची उपमा दिली गेली असावी.

नामदेव महाराज म्हणतात देवाला तुळशी अत्यंत प्रिय आहे. दुसऱ्या फुलांची त्याला आवश्यकता लागतच नाही. हे श्रीपती मला तू हीच भक्ती द्यावी. वैष्णवांमध्ये तुळशीला अत्यंतिक महत्त्व दिले गेले आहे. कारण तुळशीजवळ नित्याने वनमाळी राहत असतो आणि म्हणून भूमीवर पडलेले तुळशीचे पान जरी मस्तकी लावले तरी कोट्यावधी तीर्थांच्या स्नानाचे फळ प्राप्त होते.

**नामदेव महाराज म्हणतात,**

**फुकाचीया तुळशी वहारे**
**ध्रुवासारिखे पद मागारे**
**एका विठ्ठला शरण जा रे**
**जन्म वांयां कां दवडारे**
**नामा म्हणे हा देवो पहा रे**

**विठ्ठल भक्तांचा ऋणीयारे**

म्हणजे सहज प्राप्त होणारी तुळशी देवाला अर्पण करावी आणि ध्रुवासारखे अढळपद  मागून घ्यावे. विठ्ठलाला मनोभावे शरण जावे. अलौकिक नरदेह कशाला वाया घालवायचा...? विश्वसंत नामदेव महाराज म्हणतात देव हा भक्तांचा ऋणी आहे कारण तो त्याला तुळशी वाहत असतो. इतकी भगवंताला तुळशी प्रिय आहे.

तुळशीला हरिप्रिया ,कृष्ण सखी म्हटले गेले आहे आणि त्यामुळेच वारीमध्ये तुळशी डोक्यावर मिरवताना दिसून येते.  कारण जे भगवंताला आवडते तेच भक्ताला आवडते....

आजच्या वैज्ञानिक युगात सिद्ध झाले आहे की तुळस नैराश्य कमी करते आणि म्हणून तुळशीचे अत्यंतिक महत्त्व आहे. म्हणूनच तुळशीच्या सहवासात असताना चित्तातले सारे दोष नाहीसे होतात असे श्री नामदेव महाराज म्हणतात. जेथे तुळस असते त्या रोपाच्या आजूबाजूच्या परिघात हवा अत्यंत शुद्ध राहते. सर्दी खोकला घशाचे विकार यावर तुळस अत्यंतीक काम करते. तुळशीजवळ दिवा लावताना तुलसि श्रीसखी शुभे  पापहारिणि पुण्यदे नमस्ते नारदनुते नारायणमनःप्रिये  अशी प्रार्थना केली जाते. अशा या चैतन्यदायी तुळशीचे महत्त्व जाणून तुळशीची भक्ती करताना एक तरी तुळशीचे रोप प्रत्येकाने लावू असा  आपण वसा घेऊ.

# हैदराबाद मुक्तिसंग्रामात समाज घटकांचे योगदान आणि परिवर्तन



डॉ. ज्योती रा. रामोड
संपर्क क्र. 9673774269

आधुनिक केसरी

**इतिहासात आणि लढाया अजराअमर झालेल्या आहे आणि त्याची इतिहासाने सुवर्णाक्षरात नोंद केलेली दिसून येते. त्यातीलच एक महत्त्वपूर्ण लढा म्हणजे हैदराबाद मुक्तिसंग्राम होय. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एक वेगळा लढा म्हणून ओळखला जातो. याचे कारण म्हणजे, ब्रिटिशांच्या अंमलाखालील भारत स्वतंत्र झाल्यानंतर निजामाच्या राजवटीतून मराठवाडा, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश मुक्त झाला. हा मराठवाडा मुक्तिसंग्राम हा मूळ हैदराबाद मुक्तिसंग्राम म्हणून ओळखला जातो, १७१९ पासून हैदराबाद संस्थानाचे प्रशासन निजामाच्या हाती होते. आसफजाशाही राजघराण्याचे वंशज असलेल्या या निजामांनी १९४८ पर्यंत या संस्थानावर राज्य केले. आसफजारी राजघराण्याची स्थापना मोर कमी-उद-दीन सिद्दीकी याने केली. या राजेशाहीचा विस्तार सध्याच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, कर्नाटकातील काही भाग आणि आंध्र प्रदेश असा होता.**

मुघलांच्या राजवटीत मीर कमर-उद-दीन १७१३ ते १७२१ या काळात दख्खनचा सुभेदार होता. याच काळात त्याने निजामशाहीची स्थापना केली आणि निजाम-उल-मुल्क सत्तेत आले. उर्दू भाषेत निजाम या शब्दाचा अर्थ प्रशासक असा होतो. इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्युनंतर मुघल साम्राज्याला उतरती कळा लागली. याच काळात मीर कमर-उद-दीन याने स्वतःच्या अखत्यारितील प्रदेशाला स्वतंत्र घोषित केले आणि निजामी राजवटीची स्थापना झाली. यानंतरच्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत दोन शतकांहून अधिक काळ सात निझामांनी सुमारे २ लाख २३ हजार वर्ग किमी व्याप्ती असलेल्या या प्रदेशावर राज्य केले. या निजामी राजवटीत प्रामुख्याने मराठवाडा विभागाचा हैदराबाद संस्थानात समावेश असल्याने निजामाविरुद्ध प्रामुख्याने याच भागात चळवळी आणि आंदोलने झाली. याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ यांच्याकडे होते.

मराठवाडा मुक्तिसंग्रामात लढलेले बहुतांश स्वातंत्र्यसैनिक हे याच भागातील होते. देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ सुरू असताना मराठवाड्याला दुहेरी लढा लढावा लागला. ब्रिटिशांविरुद्ध सुरू असलेल्या राष्ट्रीय लढ्यासोबत निजामाविरुद्ध हा लढा लढला गेला. प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील या लढ्याचा सविस्तर आढावा प्रस्तुत संशोधन निबंधात घेण्यात आला असून यात तत्कालीन सामाजिक व्यवस्थेत झालेले परिवर्तने अभ्यासण्यात आलेली आहेत. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा इतिहासातील एक वेगळा ला म्हणून ओळखला जातो. कारण ज्या काळात भारतात ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी तीव्र आंदोलने सुरू होती. महात्मा गांधींसारख्या नेतृत्वाखाली संपूर्ण देश पेटून उठलेले होता.

त्या काळात निजामाची राजवट असलेल्या प्रदेशात मात्र हैदराबाद संस्थाना - विरुद्ध तीव्र हे सुरू होते. म्हणजेच या भागात राहणाऱ्या लोकांना अगोदर निजामविरुद्ध आणि नंतर ब्रिटिशांविरुद्ध अशा दुहेरी आघाडीवर लढायचे होते. म्हणूनच प्रारंभी निजामाच्या राजवटीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठीच्या लढ्यांची पार्श्वभूमी निर्माण झाली आणि त्यातून समाजात वेगवेगळे परिवर्तन घडून आलेले होते.

आर्य समाजाचे योगदान

हिंदू समाजाच्या दौर्बल्याबद्दल दयानंद सरस्वती फार अस्वस्थ असत. हिंदुंची हीन-दीन अवस्था पाहून त्यांचे मन बेचैन होई. सत्याचा प्रभावी प्रकाश देणारे वैदिक तत्त्वज्ञान आचरण्यात आणल्याशिवाय या देशाला तरणोपाय नाही या श्रद्धेने त्यांनी आपल्या कार्याचा आरंभ केला. आर्य समाजाचे अनेक अनुयायी, कार्यकर्ते तयार केले. वैदिक धर्माच्या प्रसारासाठी हिंदूंच्या मरगळलेल्या मनाला चालना देऊन, त्यांच्यात तेज निर्माण करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग करून अपार कष्ट भोगण्यास सिद्ध असणारे बुद्धिमान विचारवंत व प्रभावी वक्ते भारतभर निर्माण केले.

पुढे त्यांच्या या तेजस्वी अनुयायांनी गुरूकुल या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या शाळांमधून सर्व दृष्टीने आदर्श अशी तरुण पिढी तयार झाली. गुरुकुलात शिक्षण घेतलेला विद्यार्थी पाच-दहा हजार लोकांतही वेगळा व उठावदार दिसायचा. वैदिक संदेश नावाचे वृत्तपत्र सोलापूर येथून प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. निझाम स्टेटमध्ये सर्वत्र सत्याग्रहात भाग घेण्यासाठी ते हैदराबाद स्टेटमध्ये रवाना झाले. वैदिक संदेश निझाम स्टेटमध्ये सर्वत्र पोचावे अशी व्यवस्था केली. अत्यंत शिस्तबद्ध व ध्येयवादी अशी ती संघटना होती. हैदराबाद राज्यातील बहुसंख्य समाजाला कोणी वाली नव्हता. उलट हिंदूंचा नायनाट करण्यासाठी निघालेली खाकसार पार्टी, निझाम सेना, इत्तेहादूल संघटना, दीनदार सिद्दीक याचे धर्मप्रचारक अनुयायी यांचा सर्वत्र थैमान चालू होता.

रेडिओ केंद्राचे योगदान


भारताला मिळालेल्या स्वातंत्र्यातही रेडिओ चालवणाऱ्या संघटनेचे योगदान किती महत्त्वपूर्ण आहे याची माहिती आपल्या सर्वांनाच आहे. त्याचबरोबर हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या अंतर्गत रेडिओ केंद्राचे योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनशील आहे. अत्यंत गुप्त पद्धतीने चालवणे जाणारी रेडिओ यंत्रणा ही स्वातंत्र्य सैनिकांना एकत्र करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रत्येक लढाई अंतर्गत करताना दिसून येते. गुप्त रीतीने सुरु असलेल्या 'हैद्राबाद आझाद रेडीओ केंद्रावरून विविध असे कार्यक्रम प्रसारित केले जात होते. आणि त्या कार्यक्रमाच्या माध्यमातून संस्थानातील सर्व जनतेला आंदोलनाबाबत जागृत करण्याचे कार्य है रेडिओ केंद्र करत होते. या रेडिओ केंद्रावरून मराठी, हिंदी, तेलगु, काड, इंग्रजी भाषातून कार्यक्रम प्रसारित केले जात होते त्याम या नाटक, हैद्राबाद लक्ष्यातील प्रसंग, देशभक्तीपर गीत, कविता, क्रांतिकारक गीते.

कार्यक्रम होता कार्यक्रमाचे प्रसारण सुमारे पाऊन तास नियमित चालत असे. मराठवाडा आणि कर्नाटकच्या काही भागात केंद्र ऐकू येत असे. ६ या केंद्रावरून प्रसारित होणारे कार्यक्रम ऐकून सर्व जनता भारावून जात असे. आणि म आंदोलनात आपला सहभाग नोंदवत असत. अशा या आंदोलनाला प्रेरणा देणाऱ्या कार्यक्रमाचे प्रसारण या रेडिओ केंद्रावरून हे केले जात होते. हे विशेष उल्लेखनीय आहे. मुंबई येथे रेडीओ केंद्राची सुरुवात करण्याच्या कार्यामध्ये धीरूभाई दोशी, रमेश गांधी, डॉ. गांधी, साहेब वैपायन, यांचे योगदान लाभलेले आहे. अशा खूप प्रयत्नाने आणि परिश्रमातून रेडिओ केंद्राची सुरुवात करण्यात आली आणि त्यातून त्याचा मोलाचा वाटा मराठवाडा मुक्ती संग्रामात मिळालेला दिसून येतो.

महिलांच्या योगदानातुन समाज परिवर्तन

हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये केवळ स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान नसून महिलांचे योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यात प्रामुख्याने काही महिलांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. संपूर्ण मराठवाडा हैदराबाद मुक्ती आंदोलनाने पेटून उठला होता. अनेक महिला सेलू परभणी औरंगाबाद नांदेड धर्माबाद बीड उस्मानाबाद लातूर इत्यादी ठिकाणच्या अनेक महिला भूमिगत राहूनही व पूर्णवेळ राजकीय काम करत होत्या. प्रत्येक खेड्यातून व घराघरातून हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे साद पडसाद उमटत होते. अन्यायाचा सर्व नाश करण्यासाठी निर्धाराने पुढे आलेल्या या तप्त शलाकाच होत्या.

शांताबाई कुठे, गीताबाई चारठाणकर, प्रतिभाताई वैशंपायन, आशाताई वाघमारे, सुशीला दिवाण याशिवाय अजून कितीतरी स्त्रीयांची नावे या आंदोलनाशी जोडता येतील त्यांच्या कार्याचा आढावाही घेता येईल परंतु आतापर्यंत केवळ पारंपरिक पद्धतीने




गौरविण्यात चौकटीमध्ये या विषयाचा इतिहास मांडला गेला आहे. मुक्तिसंग्राम निर्मितीमागे अनेक क्रांतिकारक स्त्रियांचा समावेश होता हे इतिहास लेखनाचे पुनर्लेखन करून त्यात वैचारिक इतिहास लेखन लढ्याची तोंडओळख व्हावी म्हणून करून दिलेला हया निवडक क्रांतिकारी स्त्रियांचा कामगिरी लढयाची दिशा समजून सांगण्यास उपयुक्त ठरेल.

स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान

कोणत्याही लढाईला स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाशिवाय पूर्णत्व येत नाही. अशाच प्रकारे हैदराबाद मुक्तिसंग्रामात हे अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेले योगदान बहुमोल आहे त्यात प्रामुख्याने लातूर येथील बाबासाहेब परांजपे, तत्कालीन उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथील कुलकर्णी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ, गोपाळ शास्त्री देव, दिगंबर बिंदु, शामराव बोधनकर, औरंगाबाद येथील गोविंदभाई श्रॉफ, चंद्रगुप्त चौधरी, विनायकराव चारठाणकर, पुरुषोत्तम पिपळगावकर, मुकुंदराव पेडगावकर, लातूर येथील विसिंग चव्हाण अशा शेकडो कार्यकत्यांचा सहभाग होता. या कार्यकांतून नंतरच्या काळात हैदराबाद मुक्तिसंग्रामातील राजकीय नेतृत्वाचा उदय झाला.

याव्यतिरिक्तही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे स्वातंत्र्य सैनिकाची भूमिका अनेक लोकांनी या लढ्यात पार पाडलेली दिसून येते. हैदराबाद संस्थानात त्या काळात मराठवाड्यातील औरंगाबाद बीड नांदेड परभणी आणि उस्मानाबाद या पाच जिल्ह्यांचा प्रामुख्याने सहभाग होता त्यामुळे या पाचही जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्य सैनिक या लढ्यांमध्ये सहभागी झालेले दिसून येतात स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैदराबाद मुक्तीचा घेतलेला ध्यास परिवर्तनाचा मूळ गाभा आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या बरोबरीनेच मराठवाडा मुक्तीसंग्राम लढला गेला. मराठवाडा मुक्तीसंग्रामचे हे आंदोलन सतत 13 महिने लढले गेले. निजामाच्या हुकूमशाहीतून मराठवाडा मुक्त होऊन तेथे भारतीय तिरंगा फडकला ज्या-ज्या घटकांनी या मुक्तीसंग्रामात सहभाग घेतला त्या सर्वांची भूमीका महत्त्वाची आहे. मग ते आर्य समाजाचे स्वामी रामानंद तीर्थ असतील. राष्ट्रीय शाळा असतील, साहित्यिक संस्था, साहित्यिक परिषदा, हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शेड्युल कास्ट फेडरेशन, वंदे मातरम विद्यार्थ्यांची चळवळ या सर्वांचे मराठवाडा मुक्ती संग्रामात मोलाचे योगदान आहे.

स्वातंत्र्यसेनानी आपले आयुष्य ज्या कारणांसाठी वेचले त्या हुतात्म्यांची जाणीव ठेवून त्यांच्या कार्याचा दिव्य लढा जाणून घेणे गरजेच आहे. त्याचे पुढील पिढीला विसर पडू नये म्हणून मराठवाड्यात औरंगाबाद येथे या न्यायिक लढ्याचा इतिहास चिरंतन राहावा या उद्देशाने मुक्ती स्तंभ उभा केला आहे. 17 सप्टेंबरला हा दिवस मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा करतात. मराठवाडा मुक्तिसंग्राम हा मराठवाडयातील प्रत्येक माणसाने लढलेला संग्राम होता.

या लोकांनी लक्ष्यामध्ये सक्रियरीत्याउन निजामाला सळो की पळो करून सोडणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना प्रत्यक्ष किया अप्रत्यक्ष - रीत्या जी मदत केली तो मराठवाड्यातील या लोकांच्या धाडसाची साक्ष देणारी आहे. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या लढ्यामध्ये घेतलेला पढाकार आणि त्यांनी दिलेली प्रेरणा या लढयात सहभागी झालेल्या सर्वच स्वातंत्र्यसैनिकासाठी त्यांच्या ध्येयपुतीकडे वाटचाल करण्यास मदतीथी ठरली.

या राजकीय नेतृत्वामुळेच नंतरच्या काळात मराठवाड्यात सर्वच क्षेत्रात खऱ्या अवनि प्रांती झाल्याचे दिसून येते. या लढ्याच्या पूर्वी आणि लढायच्या नंतर जी काही सामाजिक परिवर्तने घडून गेली त्याचा आढावा वरील विविध मुद्द्यांच्या आधारावर स्पष्ट होतो. विशेष रूपाने हैदराबाद मुक्ती संग्रामाच्या नंतर घरात मग असे सामाजिक परिवर्तन दिसून आले. म्हणूनच मराठवाडा मुक्तिसंग्राम हा लढा देशाच्या इतिहासात एक महत्त्वाचा आणि अस्मितेचा लढा म्हणून ओळखला जातो.

# पुढाऱ्यांनो जातीसाठी होत नसाल, तर इतरांसाठी काय व्हाल



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**राजकीय नेत्यांपुढे जात एक टारगेट नसते, आपल्या हाती सत्ता आली म्हणजे आपल्याच जातीला झुकतं माप द्यायचं नसतं, हे अगदी खरे जरी असले तरी, जेव्हा समाजाचा सामूहिक समाजहित उपयोगी प्रश्न पुढे येतो तेव्हा मात्र नेत्यांनी तरी मौन का पाळायचं, मराठा समाजाला आरक्षणाची गरज का वाटली ? हजारोंच्या संख्येने रस्त्यावर येऊन आरक्षणाची ललकारी का दिली. हा चार दिवसांपूर्वीचा हा लढा नसून अनेक वर्षांपासून चालत आलेल्या या संघर्षावर सत्तेतील पुढारी मार्ग काढतील, असे सध्या तरी वाटत नाही. मग हे जातीसाठी होत नसतील तर इतरांसाठी आजवर किती दिवे लावतील आणि पुढे काय करणार असा प्रश्न इतर समाजापुढे येत आहे. मराठा समाज आरक्षणासाठी का एकवटला आहे. बोटावर मोजण्याइतके प्रस्थापित मराठा हे आमदारपासून ते मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्र्यांपर्यंत देश स्वातंत्र्य झाल्यापासून सत्तेत आहेत.**

त्यांच्या 17 पिढ्या ऐश आरामात राहतील एवढे भांडवल त्यांच्याकडे आहे. कदाचित ते उद्या विदेशात देखील जाऊन राहतील, पण ग्रामीण भागातील बहुतांश कुणबी मराठा हा पिढ्यानंपिढ्या शेतात राबराब राबणारा, घामाच्या धारा सतत वाहणारा, त्यांच्या पोरासाठी आरक्षणाची नितांत गरज भासते, समाजाचे मुख्यमंत्री असताना आरक्षणाविषयी ब्रशब्दही आजवर काढला नाही. देवेंद्र फडणवीस हे माझ्या हाती सत्ता, द्या एका महिन्यात तुम्हाला आरक्षण मिळवून देतो असे बोलले होते. तर धनगर समाजाला देखील बारामतीच्या उपोषणस्थळी चार महिन्यात आरक्षण देण्याचे आश्वासन दिले. फडणवीस यांचे सरकार बनले. चार महिन्याचे चार वर्षे उलटून गेले तरी देवेंद्र फडवणीस हे देखील मराठा आरक्षणाबाबत तोंडावर बोट ठेवल्याने महाराष्ट्रात मराठा बांधवांनी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी हजारोच्या संख्येने मूक मोर्चा काढले, पण कुठलाच अनुचित प्रकार घडू दिला नाही. मोर्चा झालेल्या दुसऱ्या दिवशी रस्ते देखील स्वच्छ करण्यात आले. पण सरकारने स्वच्छ कारभार केला नसल्याने एकूण 47 जणांनी आपले प्राण या लढ्यात गमावले. त्यांच्या कुटुंबातील कर्ता गेल्याने कुंटूबीयांनी आजवर अश्रू वाहिले पण सरकारला याचे दुःख समजून घेता आले नाही. आज आरक्षणासाठी मनोज पाटील जरांगे हे देखील मरणाच्या दाढेत उभे आहेत. त्यांचे समाजावरील प्रेम पाहून महाराष्ट्रातल्या सकल मराठा बांधवांच्या हृदयाला पाझर फुटतो पण जातीच्या नेत्यांना याचे काहीही दुःख वाटत नाही ही केवढी शोकांतिका म्हणावी लागेल. जसे की मोठा मासा छोट्या माशांना गिळंकृत करतो तसेच आजवर प्रस्थापित मराठ्यांकडून गरीब मराठा बांधवांचे झाले आहे. ग्रामीण भागातील मराठा बांधवांपुढे मागे आड पुढे विहीर असे झाले आहे. कारण गावातील निवारा आणि दहा पाच एकर



जमीन सोडून आपण जायचं तरी कुठे आणि काय करायचे, मजूरदार मात्र बाहेर कोठेही जाऊन पोट भरून समाधानी राहतात. परंतु कुणबी मराठ्यांना शेतातील नापिकीमुळे, सावकार व बँकेच्या कर्जामुळे कित्येकांना गळफास घेऊन आत्महत्या करावी लागत आहे, असे आजवरचे हजारो आकडे आहेत. मग आमचा विकास करतो म्हणून निवडून गेलेला पुढारी अजून किती मराठा बांधवांचा बळी घेणार आहे. सद्यस्थितीत मराठा आरक्षणासाठी आणि मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यासाठी विविध गावांतील ग्रामपंचायत, तहसील व जिल्हा ठिकाणी चालू असलेले आरक्षण, आंदोलन आणि सरकारची उदासीनता पाहून मराठा सोडून इतर बहुजन लोकांत एक मोठा संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो. हे पुढारी जातीच्या प्रश्नासाठी होत नसतील तर आमच्यासाठी काय होतील हे आज बोलत आहेत. पण उद्या यांचाही उद्रेक होईल, भारत देशात सहा हजार जाती आहेत, तर 55 हजार पोट जाती आहेत. प्रत्येक जातीसाठी कोणत्या सुविधा महत्त्वाच्या ठरतात हे भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नमूद केलेले आहे. या संविधानातील लोकशाही मूल्यावर सत्तेत असलेल्या पुढाऱ्यांना आपल्या एका जातीच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावता येत नसेल तर आजवर कोणतीही क्रांती पुढाऱ्यांकडून झाली नाही तर पेटलेल्या माणसांकडूनच झालेली आहे. तेव्हा आगामी काळ पुढाऱ्यांनो तुमचा नसेल एवढे मात्र निश्चित.

# मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कला महत्त्वाची



भाग्यश्री लाठकर
संपर्क क्र. 96731 06653

आधुनिक केसरी

**कला ही संस्कृती, संस्कार यांची जोपासना करते. समाजाचा, देशाचा विकास होईल. कारण कलेतून आपण आपली जीवनशैली मूल्ये दर्शवत असतो. तीच मूल्ये व्यावसायातून दाखवली तर प्रत्येकाचा जीवनावरचा व कलेवरचा विश्वास वृध्दींगत होईल. त्यायोगे समाजाचा विकास होईल. समाज विघातक घटना घडणार नाहीत. उत्साहपूर्ण, सौंदर्यपूर्ण वातावरण निर्मिती होईल. विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्य प्राप्त केले तर अनेकांना रोजगार मिळेल. आपल्या आवडीतून प्रगती होईल. शालेय स्तरावर कला ही अत्यंत मोलाचे कार्य करत असून विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. त्यांच्या विकासाला, प्रगतीला पोषक वातावरण तयार करते. चांगले भाव कलाच निर्माण करू शकते.**

ज्या वयात काय करावं वा काय करू नये हे जेव्हा समजत नाही त्यावेळेस कला ही महत्वाची ठरते. मुलांमध्ये नैतिक मूल्ये व सकारात्मक दृष्टी निर्माण करण्याचे काम घर व समाज यांच्या आचरणाच पोषक वातावरण निर्माण करणे अशा सामाजिक मूल्याची जोपासना व संस्कार कलेतूनच होत असतात. कलेतून आपल्या संस्कृतीचा परिचय होतो व त्यावेळेस आपुलकीच नात निर्माण होत, भावना ऐक्य निर्माण होऊन यातूनच राष्ट्रीय ऐक्य निर्माण होते. शालेय जीवनातच विद्यार्थ्याच्या मनाला, शरीराला, सुंदर वळण लागून भावी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिक कलात्मक व सौंदर्यपूर्ण होतो. कलेचा आस्वाद घेण्याची सवय मुलांना लागेल. मनातील भाव भावनाचे प्रकटीकरण कलेतून होत गेले तर त्यांना जीवनातील आनंद घेता येईल. शालेय स्तरावर असतानाच सौंदर्य अभिरुचीचा विकास कलेतून होतो. बालवयात असणाऱ्या सहजप्रवृतीना चांगले वळण कलाच देऊ शकते. विविध कलेद्वारे त्यांची रचना प्रवृत्ती, कल्पनाशक्ती, सौंदर्य अभिरुचीचा व आस्वादक वृत्तीचा विकास होत असतो. तो शालेय स्तरावर व्हावा त्यासाठी कला ही महत्वाची ठरते. संघटित होऊन काम करण्याची सवय लागते. आपल्या जवळचे कौशल्य समाजासाठी, संघासठी वापरणे यातून निःस्वार्थी पणे काम करण्याची वृत्ती वाढते. हे सर्व कलेद्वारेच होऊ शकते. २१ व्या शतकात विविध व्यावसायिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी कलेचे महत्व अनन्यसाधारण आहे. संस्कार व कलेतूनच विद्यार्थी घडत असतो. विद्यार्थ्याला अवगत असलेल्या कलेतूनच त्याला व्यवसायिक शिक्षण दिले गेले तर तो परिपूर्ण व समाधानी जीवन जगेल. कारण आपल्याला आवडणाऱ्या कलेतून आवड अन् अर्थार्जन दोन्ही गोष्टी साध्य होत असतील तर तो प्रगती करू शकेल. कलेवरील त्याचा विश्वास वाढेल आणि चांगल्या पद्धतीने जीवन जगू शकेल. आणि इतर कलाकारांनाही तो प्रोत्साहन देऊन त्यातूनच कलेची अन् स्वतःची प्रगती होईल.कला ही संस्कृती, संस्कार यांची जोपासना करते. समाजाचा, देशाचा विकास होईल. कारण कलेतून आपण आपली जीवनशैली मूल्ये दर्शवत असतो. तीच मूल्ये व्यावसायातून दाखवली तर प्रत्येकाचा जीवनावरचा व कलेवरचा विश्वास वृध्दींगत होईल. त्यायोगे समाजाचा विकास होईल. समाज विघातक घटना घडणार नाहीत. उत्साहपूर्ण, सौंदर्यपूर्ण वातावरण निर्मिती होईल. विद्यार्थ्यांनी व्यावसायिक कौशल्य प्राप्त केले तर अनेकांना रोजगार मिळेल. आपल्या आवडीतून प्रगती होईल. शालेय स्तरावर ग्रेड परीक्षेचे नियोजन असते कारण विद्यार्थ्यांमधील कलागुणांचे मूल्यमापन व्हावे व त्यांच्या कला गुणांना योग्य वाव मिळावा त्यातूनच त्या कलेत प्रगती करता येईल हा उद्देश त्यासाठी कलाशिक्षणाची गरज आहे. कला शिक्षक असणे आवश्यक आहे.

योग्य व्यक्तीकडून मार्गदर्शन, परीक्षण झाले तर भविष्याच्या दृष्टीने ते जास्त हितकारक होईल. शालेय शिक्षणात कलेचा अंतर्भाव केला तर विद्यार्थी बाकी विषयातही आवड निर्माण करून स्वतःची प्रगती करू शकतील. कारण कलेमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह, एकाग्रता, आनंद या गोष्टी वसत असतात नवनिर्मितीचा आनंद एक वेगळी शिकण्याची ऊर्मी देऊन जात असते. म्हणून शालेय जीवनात कला अन् कलाशिक्षण महत्वाची आहेत. शालेय जीवनात कलेतून अनेक उपक्रम घेतले जातात. या उपक्रमातून मुलांमध्ये सहकार्याची भावना निर्माण होते. सकारात्मक दृष्टी, नवनिर्मितीचा आनंद फक्त कलेच्या उपक्रमातूनच मिळतो. प्राथमिक स्तरापासूनच जर कलेतील उपक्रम घेतले तर विद्यार्थ्याच्या जीवनाला सकारात्मक वळण मिळेल. आणि ते तेवढयाच उत्साहाने शिकण्यास तत्पर राहतील त्यासाठी कलाशिक्षकाची अत्यंत महत्वाची भूमिका आहे. तो त्या मुलांना कलेतून घडवत असतो. मुलांच्या अंगी विविध गुण कौशल्ये, मूल्य शिक्षण यांची रुजवणुक व तणावमुक्त शिक्षण यासाठी कलाशिक्षण महत्वाचे आहे. कारण जीवनमूल्ये जपण्यासाठी अंगी असलेले कलागुण त्याला जीवन जगण्याचा दृष्टीकोन अधिक कलात्मक, सौंदर्यपूर्ण बनेल. कलेमुळे आस्वाद घेण्याच्या वृत्तीचा विकास होईल त्यामुळे जीवन समृध्द, सुखी बनवण्याची धडपड कले मुळे सहजतेने होईल. मन, मनाचा व्यापार, कृती मनाचे प्रकटीकरण चांगल्या तऱ्हेने होईल व जीवनाचा आनंद लुटता येईल. उपजत असलेल्या सहजप्रवृतीला एक चांगले वळण कलेतून च मिळते. सहजप्रवृतीतून उन्न यन करणे हा चरित्र घडणीतील महत्वाचा टप्पा आहे. रंग, आकार मांडणीतून मुलाच्या प्रतिभेचा जन्म होत असतो. हे कला कौशल्य संघासाठी, समाजासाठी वापरतो. निःस्वार्थी पने काम करण्याची वृत्ती वाढते. कलात्मक उपक्रमातून शिस्तशीर संयोजन करण्याचे कौशल्य निर्माण होते. कलेतून सुसंस्कृत मन तयार होते. कलेतूनच संस्कार घडतात. कला आणि संस्कार एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जी कौशल्ये, नैपुण्य विद्यार्थी हस्तगत करतो त्यातूनच त्याचा दृष्टीकोन तयार होतो. काही ध्येये बाळगली जातात, रुजतात. आस्वाद, मनोरंजन जाणिवांच्या बरोबर नैतिक, सामाजिक, बौद्धिक जाणीवा विकसित व्हाव्यात आणि व्यक्तीच्या चिरस्थायी सांस्कृतिक मुल्याचे पुनरुत्थान व्हावे हे सर्व कलेच्या माध्यमातून होते. विद्यार्थ्यांमध्ये अभिवृत्ती घडवणे, त्यांच्यात आवश्यक ती मूल्ये रुजवणे, संस्कार करणे इत्यादीसाठी कलाशिक्षक कायम तत्पर असावा त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे शक्य होईल. कलेतून तणाव मुक्त जीवन मिळते कारण आवडलेली कला त्यात तो ऐवढा रमतो की तो स्वतःलाच विसरतो. मनावर आलेला ताण तो विसरून जाऊन तो पुन्हा नव्याने उत्साहाने जगतो. नवनिर्मितीचा आनंद त्याला का जगायचे ते शिकवून जाईल म्हणून कला ही आपल्या जीवनात फार महत्वाची आहे.



मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कला फार मोलाचे कार्य करत असते कारण कलेतून मनाला व शरीराला वळण लागत असते. वळण हे ठराविक वयातच अंगी बाणता येते आणि असे लागलेले चांगले वळण आयुष्यभर पाठ सोडत नाही. त्या कलात्मक अविष्करातून तो स्वतःचे असे वेगळे अस्तित्व शोधत असतो आणि ते सापडल्यावर त्याला आनंद मिळतो. असा सृजनशील आनंद घेण्याची सवय मुलांना लागली की विध्वंसक वृत्तीचा विचार त्याच्या मनाला शिवणार सुद्धा नाही. कले मुळे मुलांमधील सुप्त गुण शक्ती विशिष्ट पद्धतीने पण सकारात्मक वाटेने व्यक्त होते. विविध ललित कलाद्वारे स्नायू,मन यावर ताबा मिळवणे हे कलेतूनच शक्य होत, मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास होण्यास मदत होते. मनातील दडून बसलेल्या त्यांच्या भावनेला सुप्त सृजनशीलता वाव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे, मुलांच्या ठिकाणी असणाऱ्या सौंदर्य अभिरुचीचा विकास करणे. अन् मित्र मैत्रिणीसोबत सहकार्याची भावना निर्माण केल्या जाते. या सर्व गोष्टींसाठी कलाशिक्षण महत्वाचे. कलेचं महत्त्व आपल्या जीवनात फार मोठं स्थान आहे. आतापर्यंत आपण मुलांच्या शिक्षणात कलेचं महत्त्व का आहे ते पाहिलं. पण आज सर्वांना च आपल्या तील असलेले कलागुण बाहेर काढण्या ची गरज आहे. त्यामुळे आपल्यावर घरात बसल्यावर मनावर आलेली मरगळ दूर होईल. पुन्हा तेवढ्याच उत्साहाने कामाला सुरुवात करू शकतो. कारण कला हे एक जीवन समृध्द व समर्थ करणारे माध्यम आहे. जीवनात एक क्षण रडवून जाई, दुसरा क्षण हसवून जाई पण जीवन प्रवासात जीवन जगण्याची कला शिकवून जाईल. कलाकार आणि कला यांच्यातलं नातं फार सुंदर आहे.तेव्हा कला आणि कलाकार यांच्यात एक मुक्त संवाद साधला जातो.त्यात लेखनकला, चित्रकला, संगीत, नृत्य, वादन अशा कितीतरी कलाद्वारे प्रकृतीला व्यक्त करायचं असत तेव्हा कलाकार आणि कला यांच्यातलं गुज म्हणजे प्रतिभा बहराला येणं. हा संवाद बाहेर च्या न साठी अव्यक्त असतो. म्हणून पू.ल. देशपांडेंनी म्हटले आहे उपजिविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचं शिक्षण जरूर घ्या. पोटापाण्याचा उद्योग जिद्दीनं करा पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाट्य, शिल्प, खेळ ह्यातील एखाद्या कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं हे सांगून जाईल. हे खरंच आहे. दररोज च्या कंटाळवाण्या रहाट गाडग्यातून एक हवाहवासा वाटणारा विरंगुळा म्हणजे कला. आज त्याची खूप आवश्यक ता आहे.. आज जागतिक कला दिन आहे. पण रोजच कलेची आराधना केली तर नक्कीच सकारात्मक विचारांना योग्य दिशा मिळेल. नक्कीच सगळेजण ह्या गोष्टीचा विचार करतील अशी आशा आहे.

# भंडारा जिल्ह्यात पूरस्थिती, आंतरराज्यीय मार्गासह १८ मार्ग वाहतुकीसाठी बंद

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** जिल्ह्यात सध्या पूरस्थिती निर्माण झाली असून नद्या, नाले, तलाव ओसंडून वाहत आहेत. त्यामुळे आज सकाळी महाराष्ट्र- मध्यप्रदेश ला जोडणाऱ्या आंतरराज्यीय मार्गासह १८ मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. महाराष्ट्र – मध्यप्रदेश या दोन राज्यांना जोडणाऱ्या आतंरराज्यीय पुलावरून बावनथडी नदीचे पाणी वाहत असल्याने महाराष्ट्र – मध्यप्रदेश राज्याचा संपर्क तुटला आहे.याशिवाय पवनी तालुक्यातील गुडेगाव, उमरी, जुनोना , माहुली, रेवनी ते कोदुली मार्ग, भंडारा शहरातील लहान पुल वैनगंगा, बीटीबी मार्केट, भोजापुर नाला, मोहाडी तालुक्यात रोहा सुकळी, मांढळ ते सुकळी, महालगाव ते मोरगाव, तुमसर तालुक्यातील तुमसर ते येरली, तुमसर ते पीपरा, तामसवाडी ते उमरवाडा, सिहोरा क्षेत्रातील बपेरा पुल, सिलेगाव पुल, कारधा लहान पुल वैनगंगा खमारी नाला, वरठी, करडी, दाभा ते कोथूर्णा असे मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.





## बाप्पाचे आगमन

भाद्रपद चतुर्थीला
गणरायाचे आगमण
ढोल-ताशे स्वागताला
मनी चैतण्याची उधळण
शोभिवंत मखरात
बाप्पाचा किती थाट
प्रसाद मोदकांचा
आरतीला सजले ताट
दहा दिवसाचा पाहूणा
आला आमच्या घरी
भक्तीमय वातावरनात
हात जोडूया सारी
बाप्पाला शोभून दिसे
दुर्वा, फुलांची माळ
आरतीत मग्न होवूया
सकाळ-सायंकाळ
सद्‌बुद्धी दे बाप्पा
दुःखाचा कर नायनाट
सुख-शांती लाभू दे
दाखव समृद्धीची वाट
रवींद्र व्ही. चालीकवार
जि. यवतमाळ
मो.9011559106

## श्रावण सरताना

अस्वस्थ मनाच्या भिंती
काजळी रात्र ओलेती
हुरहुर जीवाला लावी
क्षण तिरप्या चालीवरती !

हे प्राक्तन रिते करूनी
लेखणीत जागा उरते
ती कविता ओठी येता
शब्दांनी ओंजळ भरते !

मधु चाफा पिवळा ओला
तव गंधित झाल्या वेली
हे कृष्णधवल घट भरता
अरुणाचे सावट झेली !

सुख हिरव्या फांदीवरले
मन गाभारा भ्रमराचा
हळवा श्रावण सरताना
दुःखाला कळते वाचा !
प्रदीप बडदे, नवी मुंबई
*मो. ९५९४०२७९९५

## मुक्तीदिन मायभूचा

मुक्तीदिन मायभूचा
आज करतो साजरा
मराठवाडयाच्या भूमीपुत्रांनो
तुम्हास मानाचा मुजरा.

मातीतुनी आज इथल्या
सुगंध दरवळे कीर्तीचा
करा जयजयकार पुन्हा एकदा
मातृभूमीच्या स्वातंत्र्यवीरांचा.

पुन्हा एकदा करुनी स्मरण
स्वामी रामानंदांचे
अन या मातीसाठी लढणाऱ्या
साऱ्या भूमीपुत्रांचे.


अन त्यांचे अगणित भाई
यज्ञकुंडातील हुतात्म्यांचे
त्या दिव्य बलिदानातून
फळ मिळाले स्वातंत्र्याचे.

मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी
नद्या वाहिल्या रक्ताच्या
सोडविण्यासाठी तुजला आई
गुलामीतून निझामाच्या.

तव पुत्रांच्या बलिदानाची
तुरुंग गाई गाथा
त्यांच्या चरणी आज ठेविते
गोदामाई माथा..
ज्ञानेश्वर गायके कन्नड

## कृष्ण तुझा...

कृष्ण तुझा कृष्ण माझा
गोकुळात तर सर्व सखा
गोपिकेच्या तो ध्यानी मनी
रधिकेच्या मात्र स्वप्नी
काय लागतं कृष्णाला माग
काहीं घडलं कृष्णाला सांग
दही दुध लोणी त्याला खाऊ दे
प्रसाद अर्पण श्रीहरी ला होऊ दे
बलराज संघई
9420015108



## बापू

बापू तुमच्या खेड्याकडे
जरा जाऊन एकदा बघा,
कणा मोडला देशाचा
रडतो इथे देश अवघा.
तुम्ही म्हणाले बापू आम्हा
खेड्याकडे चला,
पोटासाठी बापू आज
आम्ही सोडले खेड्याला.
बापू इथे गावाकडे
हाताला नाही काम,
तरुण लागले भरकटू
खिशात नाही दाम.
बेकाराचे लोंढे बापू
रोज येती शहरात,
शहरे देऊ लागली हुंदका
इथे आतल्याआत.
बेकारांचे लोंढे बापू
रोज येती शहरात,
शहरे देऊ लागली हुंदका
इथे आतल्याआत.
गावात बापू नाही राहिले
पूर्वीसारखे काम,
इथे प्रत्येकास दिसतो
बापू तुमच्यात राम.
बापू इथली कृषिसंस्कृती
आज चालली लयास,
विष बनली माती सारी
पीक येईना खास.
येणाऱ्या पिकास बापू
फुकट खाणाऱ्यांची रांग
अन्नदाता झोपतो उपाशी
त्याच्या पोटात पडली आग.
सांगा बापू खेड्यात कधी
वीज येईल बारा तास?
खेड्यातील मुलांचा रात्री
कसा होईल अभ्यास?
सांगा बापू खेड्यामध्ये
येईल केव्हा डॉक्टर?
का इथल्या माणसाला
कधी होत नाही आजार ?
सांगा बापू खेड्याकडे
येतील रस्ते केव्हा?
भारत माझा खेडयाचा
नको इंडिया आम्हा.
बापू तुम्ही सांगा आता
आम्ही काय करायचं?
गावातील गरीब शाळेत
आता कोणी जायचं?
चार वर्ग एक गुरुजी
सारे विषय एक होती,
शाळा बंद करण्याची
चाल सरकार खेळती.
तुम्हीच सांगा बापूजी
मुलं कुठे शिकवायची,
का आमच्या मुलांनी
शाळाच नाही शिकायची.
एकशिक्षकी शाळेत का
मास्तरांनी जीव द्यावा,
तुम्हीच सांगा बापूजी
गुरुजींचा काय गुन्हा?
असे आमचे खेडे बापू
अजून खूप मागासलेले,
जग गेले चंद्रावर अन्
हे जाती पातीत वाटले.
बापू तुम्ही सत्य अहिंसा
मंत्र दिला महान,
इथं बांधावरल्या गवताला
लागे रक्ताचीच तहान.
बापू इथं सडकी कांदे
अन् खेकड्याचे चेले खूप,
कसे बघवते बापू तुम्हा
गावाचे हे जीर्ण रूप.
ज्ञानेश्वर गायके कन्नड
मो.९४०३३८४८८९

## अमुल्य ठेवा

आई! तू असताना जीवनी सदैव असे दिवाळी
रोज वाटे मजला जीवनाची रोज नवी नव्हाळी
हा मऊ हात मोरपिसाचा आईचा माझ्या माथा
ना फिरेल मम जीवनी निरंतर कधिही आता
आई ! तू असताना मज क्षणाची नव्हती उसंत !
तू सांगशील जे जे सारे, जीवनी मज असे पसंत
तुजसवे जगाया सदैव आतुर असे मन हे माझे
न वाटले कधिही जीवनी कुठल्या गोष्टींचे ओझे
तू पाहता प्रेमळ दृष्टी, सुदृढ होत असे देहयष्टी
कुटुंबे कोणिही होत नसे जीवनी कधिही कष्टी
तुज पाहता सन्मुख उपभोगिले मी स्वर्गसुख !
तव घरातूनी याचक कधिही ना गेला विन्मुख !
तव महिमा काय वर्णावा ! संकलांसी वाटे हेवा
दिलास आम्हा सकलां आचरणाचा अमुल्य ठेवा
मधुकर ए. निलेगावकर

## आई

रक्त, हाड, मांस गोळा पोटी जपते आई
दिनरात कष्ट करून पोषण करते आई

न दिवा-पणती भेदभाव ना करते आई
कूस उजवली धन्य झाले म्हणते आई

न्हाऊ-माखू, झबले-टोपरे घालते आई
नजरबाधा टाळण्यास काळी तीट लावते आई

संस्कार, नीती, वागणूक शिकवते आई
उद्धार करण्या सासरी अंती सापडते आई

पोरांसाठी चढते, पडते, धडपडते आई
जिंकवण्यासाठी स्वतः रोजच हरते आई

परीक्षेस निघता तोंडात दही चारते आई
आशिर्वादाचे शब्द दोन पुटपुटते आई

आनंदाच्या गोड क्षणी हसते आई
वेदनेने विव्हळत असता रडते आई

डोळ्यामधले दुखरे पाणी पुसते आई
चूक वाटेवर पाऊल पडता रुसते आई

पिलांसाठी हळवी ती आता स्मरते आई
भेटीच्या अलवार ओढीने गुदमरते आई

सुनेलाही लेक मानून जरा बघते आई
वृद्धाश्रमच्या पायऱ्या अखेर चढते आई

कल्पना मापूसकर
मीरारोड, ठाणे, 90826 46494

## बोतरी (गोधडी)


पालवा, चिलवा, फाटले,
फुटले कपडं येक्यावजी जमा केलू
निकाल दानकड पावून सऱ्यान
त्याचा गलप सिवलू....
दवामंदी बोतरी पागंरावलं बेस लागते
अना तिनाचं दव परुन जाते....
अज बोतरी सिवून पायता मनलू
मोट्या आवडीना कामालं लागलू...
बुहू दिवसाचा गट्टा बांदलाच राये
अना माज्याकडं तो रोजाना पायेत राये..
अजकाल बिल्यांकिट, हातरूना आलं
अना ईचारत नाई कोनीच तिलं....
बोतरीत मोटी मया असते बाई
तिच्यामंदी सुक, दुक ईनता बाई...
बोतऱ्याईपायी घोडस्नीचा येक पाय टुटला
येवड्यान बोतऱ्याईचा तिच्यावर वजा झाला...
दरसाली मी येकतरी बोतरी सिवता
अना धुवून, धुवून घड्या करून ठेवता...
लाहानपनापासून मी बोतऱ्या सिवता
अना बाराई मयने मी बोतऱ्या पांगरता...
येवड्या बोतऱ्या झाल्या माज्या सिवून
मरीन तरी नाई जात फाटून ...
दाहा पावने येतील तरी बोतऱ्या नाई सरतं
अना कितीई आपटून धुता तरी नाई फाटतं...
अज गुत्याना भिल्लू बोतरी सिवालं
तईच सकार, सुकार सिवून होयेल.

सौ.संगीता संतोष ठलाल
मु.कुरखेडा जि.गडचिरोली
७८२१८१६४८५



## मराठवाडा

अद्यापही सुखाला मुकतो मराठवाडा
घेऊन दुःख माथी जगतो मराठवाडा
दुष्काळ पाचवीला पुजला सदैव भाळी
कंबर तरी नव्याने कसतो मराठवाडा
ठोकून भाषणाला ' भूमी महान म्हणतो '
पण ,योजनेत त्यांच्या नसतो मराठवाडा
आरोग्य, वीज, पाणी, शोषण, उपासमारी
कित्येक संकटांशी लढतो मराठवाडा
झगडून दुष्मनांशी हे राष्ट्र मुक्त केले
स्वातंत्र्य सैनिकांना स्मरतो मराठवाडा
दुथडी भरून येथे वाहो विकासगंगा
इतकीच एक इच्छा करतो मराठवाडा
गिरीश जोशी




## मराठवाड्याची भूमि

क्रांतीच्या असे हेचि उगमस्थान क्रांतिवीरांचे धरती आमुची महान
अन्यायाविरुद्ध सदैव उठवी रान मराठवाड्याची भूमि ही महान
परळी नगरी वसे प्रभू वैजनाथ वेरूळ नगरी घृष्णेश्वर तीर्थक्षेत्र पावन
गोदातीरी भगवी पताका फडकवी संत एकनाथ
जगणे शिकवी मानवास जनार्दन बाबांची शिकवण
जगप्रसिद्ध वेरूळ अजिंठा आमची शान
नाथसागर भागवी अनेकांची तहान दक्षिणगंगा गोदामाई संथ वाही
अनेक जाती धर्म येथे गुण्यागोविंदाने राही निसर्गाचा अन्याय आम्हावरी सदैव
होत गेला शासकीय अनुशेष आमचा कधीन भरून निघाला
एक होउनि काम करून राज्य देवगिरीची वाढवू शान
विकासलेला मराठवाडा हीच असेल क्रांतिवीरांना खरी श्रद्धांजली आज
काव्यसंदीप संदीप वाकडे पाटील
आठेगाव कन्नड 9284212556

## त्या..तिथे...दूर...

विसावल्या निवांतपणाला चढलेली लाली, दूर दूरच्या त्या नभांगणाला आली.
धुक्यात हरवलेली सांज ती ओली! नभीचा चंद्रमा पाहून खळी उमटली गाली.
हरवलेल्या खळीत पापणी ती मिटलेली..१..
कुठे कशी? काय माहित रात्र एक ती न्हाऊन सुखावलेली.
कुठेतरी काहीतरी अवचित ती अलबेली. अहाहा! काय सुंदर नजारा! शुभ्र
चांदणे स्मित खळखळ सरीता ती भारावलेली.
हिरवागार तृण, काठावरी वृक्ष वेल त्यावर एक विसवलेली..२..
आशा, सकारात्मक, प्रकाश जणू शुभ्र, धवल, गुलाबी
सप्तरंगी फुले जणू फुललेली. मंद दरवळ त्याचा हर्ष मनाला
अन वाट ती दूरात धावलेली. निसर्ग, नजारा, गुड नाईट शब्बा खैर, वडककम,
वेळ शब्दांनी सजलेली..३.. चोवीस, अठ्ठेचाळीस, बहात्तर, दोनशे चाळीस
तास रात्र ही थकून गेली. अरे बापरे? चेहऱ्यावर लकेर रडवेली. अरे देवा! अन्
एवढ्यात कूहु.. चिवचिवाटात रविराजाची कृपा झाली.
अंधाराची जागा प्रकाशानेघेतली. उठा उठा खूप सफर झाली.
खिडकीत डोकावता, नभांगनीची चंद्रकोर स्मित हास्यात सुखावलेली..४..
©सौ. वैशाली इंदुमती जाधव- महाडिक.
संपर्क -९७६७४३७९२३

# स्वातंत्र्यपूर्व निझाम काळातील मराठवाड्यातील दलितांची स्थिती



आर. टी. घोडके
संपर्क क्र. 94204 23119

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा - निझाम राजवटीखाली होता. निझामाचे राज्य 16 जिल्ह्यांवर होते. त्यापैकी मराठवाड्यातील पाच जिल्हे होते. औरंगाबाद हा निझामाचा सुभा होता. भारतामध्ये तेव्हा जवळपास 699 संस्थाने होती. हैद्राबाद संस्थानाची पर्यायाने निझामाची चलन व्यवस्था स्वतंत्र्य होती तसेच सैन्य दल होते. या संस्थानात 1167 जाहागीरदार होते. यात बरेच जन हिंदू होते. त्याना बहादुर संबोधले जात होते. या राज्यात तेंव्हा 2 लाख मुसलमान होते. आणि अनुसूचीत जातीची संख्या 35 लाख होती. स्वातंत्र्यापूर्वी हैद्राबादचा निझाम मीर उस्मान अली खान होता. हैद्राबाद हे संस्थान 'इस्लामी राष्ट्र, म्हणून स्थापन करावे ही त्यांची प्रबळ इच्छा होती पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर त्याचे स्वप्न भंगले, निझाम हा कडवा धर्मभिमानी होता. त्यानी धर्म वाढविण्या करिता धर्म खति (उमरे मजहबी) स्थापन केले होते.**

अस्पृशाना बाटविण्याकरिता व धर्मांतर करण्या करिता जवळपास 300 मौलवी नेमले होते. त्यांनी बऱ्याच ठिकाणी धर्मांतर घडवून आणले गेवराई - धोंडराई भागांत बळजबरीने एक हजार लोकाना मुसलमान केले असे म्हटले जाते. मराठवाडयातील दलित वर्ग अतिशय मागासलेला होता. शिक्षणापासून कोसो दूर होता. अस्पृश्यामध्ये अनेक पोट जाती होत्या. यांच्यात रोटी व्यवहार होत पण बेटी व्यवहार होत नव्हता, अस्पृश्याना विशेषतः महार-मांग याना गावकीची कामे कराची लागत. जातीयता खूपच होती. गावकीची कामे खुप होती आणि कोणताही मोबदला नव्हताः मात्र रात्री भिक मागण्याचा अधिकार त्याना होता. कपडयाच्या विनखात्यात त्याना नौकरी नव्हती कारण बाबीनला थुंकी जागत होती त्यामुळे बाट होत होता. सरकारी कार्यालयात हिंदू- मुसलमाना करिता पिण्याच्या पाण्याचे भांडे स्वतंत्र्य ठेवले जात होते. मात्र अस्पृश्याना कांहीच ठेवले जात नसे. अस्पृश्याची घरे पूर्व दिशेला गावाच्या बाहेर होती. आमीन साहेब (PSI) तसेच तहसिलदार इतर अधिकारी यांच्याकडे अस्पृष्य फुकट राबत होते. काम ऐकले नाही तर मारझोड करीत. बऱ्याच वेळा दिलेल्या इनामी जमीनी हिसकावून घेतल्या गेल्या आहेत- अस्मृश्यामध्ये एकही जन शिकलेला नव्हता फक्त ब्राम्हण वर्ग शिकलेला होता ते अस्पृश्यांना पशु पेक्षा हिन समजत त्यावेळी अस्पृश्या मध्ये सुंदरनाथ किशन गायकवाड हे पहिले पदवीधर 1939 साली बी ए झाले होते त्यानी आपल्या दोन मुलीना यशोदा व शकुंतला याना पुणे येथे हिंगने येथे स्त्री शिक्षण संस्थेत शिकविले त्या मॅट्रीक पर्यंत शिकल्याचा उल्लेख आहे. त्या काळात मॅट्रीक शिकलेल्या दोन मुली दिसतात. हैद्राबाद संस्थानात दोन प्रकारची पदे होती. ती अधिकार पदाची होती. एक ओहदे-कुलीया दुसरे ओहदे-गैर-कुलीया याचा अर्थ व दुय्यम अस्सल मध्ये 95% मुसलमान म्हनजे महत्वाच्या पदावर मुसलमान दुय्यम वर्गात शिक्षक, कारकून, चपरासी अशा कनीस्ट जागेवर होते. इकडे मुंबई प्रातांत तेव्हा १० कॉलेजेस होती मराठवाड्यात औरंगाबाद येथे एक इंटरमिजीअट कॉलेज होते व मराठवाड्यात आठ हायस्कुल होती. पुढील शिक्षणासाठी दारे बंद होती.

अस्पृश्याना फक्त "मदरसा-ए-अर्जल, म्हणजे निच लोकाची शाळा या शाळेत प्रवेश होता. पुढे काही वर्षानंतर बी. एस. व्यकंटरावांनी मदरसा-ए-पस्तअख्वाम म्हणजे दलीत लोकाची शाळा अशी सुधारणा केली होती यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी कडाडून टिका केली होती ते म्हणतात-अस्पृष्याच्या जिभा कापल्या होत्या, वेठबिगारी गावकी यानी अस्पृष्य वर्गाला बंदीस्त केले होते. मोगलाईमुळे महारखेडे, भांगवाडे हे सेल्यूलर जेल बनले होते. मराठवाड्यात अस्पृश्यता खुप होती त्याचा अनुभव डॉ. बाबासाहेबाना दौलताबादचा किल्ला पाहण्याकरिता आले होते तेथील हौदातील पाणी पिण्याकरिता घेतले तेंव्हा धेडांनी हौद बाटवला असे मुसलमान म्हणाले होते. यावरुन निझाम राज्यात पाण्याला स्पर्ष बंदी होती. मुस्लीम सुद्धा जातीयता करीत होते.

हैद्राबाद संस्थानात प्रथम दलीत चळवळ आणि सामाजिक जागृती निर्माण करण्याचे काम (एम. व्ही. भायेरेडी व अरिंगो रामस्वामी या दक्षित कार्यकर्त्यानी केले. पुढे जगन मित्र मंडळ स्थापन झाले. दारूबंदी, पशुहत्या, देवीला मुली सोडणे अशा प्रथांना विरोध केला, 1927 साली जातीयतीचे रूपांतर हिंदुमहासभेत केले या मधून पुढे सी. एस. व्यंकटराव, जे सुब्बया, बी. श्यामसुंदर, पी.आर. व्यंकट स्वामी यांचे नेतृत्व उदयास आले. 1937 साली पुणे येथे हैद्राबाद संस्थानातील अस्पृष्यांच्या नेत्याना पहिले निमंत्रण दिले. ते सर्वजन परिषदेला आले. ते जवळपास 28 प्रतिनिधी होते. ही परिषद आर. आर. भोळे, पि.टी. बोराके,



खंडेराव, सावंत, घाडगे, भरत जाधव यांनी आयोजीत - केती होती व परिषदेचे अध्यक्ष एन. शिवराज होते. आणि डॉ. आंबेडकर प्रमुख पाहुणे होते. या सर्व हैद्राबाद येथील मंडळी दिपून गेली. हैद्राबाद संस्थानातील बी.एस व्यकंटराव आणि बी. श्यामसुंदर यांचा उल्लेख प्रकर्षाने जानवतो. बी.एस. व्यंकटराव यांचा जन्म घासमंडी येथे झाला ते भोयीगुडाचे पदवीधर म्हणून परिचय देत. पुणे येथे गवंडी काम केले, पुढे ओव्हरसिअर, शासकिय कॉंट्रक्टर व नंतर निझामाचे रिक्रोटिंग ऑफीसर म्हणून काम केले ते दानाशूर होते, वसतीगृहाला मदत करणारे, गरिबाचे गॉडफादर होते निझामाने त्याना खुसरू-ए-दख्खन, ही पदवी बहाल केली होती. 1937 साली डॉ बाबासाहेब आंबेडकर असेंबतीत निवडून आले तेव्हा बी.एस. व्यंकटरावानी सिकंदराबाद येथे महार असोसिएशन स्थापन्या- च्या वेळी सत्कार करून गौरव केला होता. बी.एस. व्यंकटरावानी 13 आक्टोबर 1938 साली अंजुमन-ई-पस्त अरव्याम संघटनेची स्थापना केली ते स्वतः अध्यक्ष होते. त्यानी नगरपालिका, 'लोकल बोर्ड जिल्हा तालुका लोकसंख्याच्या आधारावर प्रतिनिधीत्व द्यावे अशी मागणी निजामाकडे केली. पुढे ही संघटना बरखास्त केली. पुढे त्यांनी शामसुंदर यांच्या मदतीने "शेयुल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना, केली यात मराठवाड्यातील बी. एस. मोरे, व्ही. एस. सूर्यवंशी, धन्ने, गाडे इत्यादी होते. माणुसकीचा दर्जा अस्पृश्याना मिळावा एवढी रास्त मागणी होती. पुढे संघटनेचे दोन गट पडले जहाल व मवाळ. बी. श्यामसुंदर जहाल गटात तर बी.एस. व्यंकटराव मवाळ गटात होते बी. श्यामसुंदर यानी परभणीत संघटनेचे पहिले अधिवेशन भरविले ते स्वतः अध्यक्ष होते. डॉ. तुकाराम गाडे जनरल सेक्रेटरी होते. यात एक ठराव मांडला "हिंदू धर्माचा त्याग करून अस्पृश्याना समान दर्जा देणारा धर्माचा स्वीकार करावा,, शेवटी मुस्लीम धर्म स्विकारावा काय? यावरुन ठराव बारगळला. बी. श्यामसुंदर मराठवाड्यातील, त्याचा जन्म औरंगाबाद येथे 18 डिसेंबर 1908 ला झाला त्यांचे वडील रेल्वे पोलीसात हेड कॉनीस्टेबल होते. माध्यमीक शिक्षण औरगाबाद, पदवीधर शिक्षण त्यानी हैद्राबाद व LL.B. शिक्षण पूर्ण केले. अस्पृश्य वर्गातील ते मराठवाड्यातील पहिले कायद्याचे पदवीधर होत, ते उत्तम लेखक, कादंबरीकार, उत्कृष्ट चित्रपट लेखक, उत्तम वक्ते व जहाल मतवादी होते. व ते आबेडकरवादी होते. निझाम रेल्वेचे कामगार नेते होते. ते आजन्म अविवाहीत होते त्यांचे कार्य वाखाणण्या सारखे आहे. त्यांचे निधन 19 मे 1975 ला त्याचे रेल्वे कॉलनी. सिकंदराबाद येथे झाले. थोडक्यात दोघेही सु समाजकारणाचा जुगार खेळले व दोघेही हरले मात्र एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे की त्यानी कासीम रझवीचा घोंगावणारा झंजावात रझाकार रोखाला हे मान्य करावे लागेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर 29 सप्टेंबर 1944 ला प्रथम हैद्राबादला गेले तेथील परिस्थिती पाहून मकरणपूर येथील सभेत ते म्हणाले. राजाची सत्ता काढून प्रजेकडे सोपवावी. येथील राजकारण्याची पद्धती सदोष आहे. म्हणून तुम्ही आतून काहीच करू शकत नाही पण मी मात्र बाहेरून नक्कीच करेन, ही डॉ. बाबासाहेबांची तळमळ दिसून येते 'हैद्राबाद संस्थान 17 सप्टेंबर 1948 ला भारतात विलीन झाले. गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल होते व जनरल चौधरी होते. पुढील कालात निझामाने डॉ. आंबेडकरांना ७०० एकर जमीन दिली तसेच शेड्युल कास्ट फंडातून १३ लाख रूपये दिले तेंव्हा काही मुस्लीम नेत्यानी विरोध केला होता परंतु निझामाचा पुढे कोणाचेही काहीच चालले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पी. ई. एस. सोसायटी स्थापन केली व औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेज काढले त्या कॉलेजच्या पाया भरणी समारंभाला डॉ राजेंद्र प्रसाद, राष्ट्रपती आले होते तसेच शेवटचे निझाम मिर उस्मान अली हजर होते याच कॉलेज मधून अनेक जातीचे लोक शिकलेले आहेत. शैक्षणिक दृष्ट्या मिलिंद कॉलेज औरगाबाद जिल्हयात प्रमुख होते हे मान्य करावे लागेल. डॉ. बाबासाहेबांमुळे मराठवाडा त्या वेळी शैक्षणिक हब बनला. वामनदादा म्हणतात "भिमा तुझ्या जन्मामुळे उद्धरली कोटी कुळे".

# ईशा अशी का वागते ?



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**आईच्या अती लाडाने वाया गेलेला बबड्या आपण या आधी एका मराठी मालिकेत पाहिला. ते घर, त्या घरातील माणसे संस्कारी, प्रेमळ होती. आता सध्या सुरू असलेल्या आई कुठे काय करते या मालिकेतील ईशा या मुलीने त्या आधीच्या बबड्याची जागा घेतली आहे असे दिसते. सतत काहीतरी घडत पुढे जाणारी ही मालिका त्यातील उत्तम संवाद, प्रवाही पटकथा, सोज्वळ कौटुंबिक वातावरण यामुळे मनाचा ठाव घेते. विचार करायला लावते. या मालिकेतील कुटुंब जुन्या नव्याचा छान संगम असलेले, एकमेकावर प्रेम करणारे, लळा जिव्हाळ्याच्या रेशमी बंधनात घट्ट बांधले गेलेले आहे. तरी यातले प्रत्येक पात्र संघर्ष ग्रस्त आहे. प्रत्येकाची वाटचाल चुका करीतच पुढे जाते.**

त्याचा घरातील इतरांना त्रास होतो. त्याची त्या त्या पात्राला तेव्हढ्या पूर्ती जाणीव देखील असते. घरातील मोठी माणसे त्या त्या वेळी सर्वांना सांभाळून घेतात. तरी चुका व्हायच्या थांबत नाहीत. कारण प्रत्येकाला वाटते, आपलेच खरे, आपणच बरोबर. असे वागणे हा आपला हक्क. हे आपले स्वातंत्र्य! आपण हवे तसे वागण्यास मोकळे. त्यात दुसऱ्याला काय वाटेल, आपल्या वागण्याचा कुटुंबावर, घरातील नात्यावर काय परिणाम होईल याची पर्वा नाही.फक्त स्वार्थ, स्वतः पुरता संकुचित विचार महत्वाचा. इथे कुणी दारूच्या आहारी जाऊन संसाराचा विचका करतो, कुणी मुलं चांगली मोठी झाल्यावरही विवाह बाह्य संबंध ठेवतो, घरी दुसरी बायको आणतो, अहंकारा पोटी तिलाही दुखवतो, घरचे वृद्ध आई वडील तर जणू उतारवयात हे सारे तमाशे बघण्याचे नशीब घेऊन आलेले!प्रत्येकाचे स्वतंत्र विचार, व्यक्तिमत्व बघितले तर त्या प्रसंगी तेव्हढ्या पुरते ते खरे वाटतात.. योग्य वाटतात.. जसे की ते स्वतःला जस्टीफाय करतात.. पण त्यांच्या वागण्याने इतरांना जखमा होतात. इतरांच्या अंगावर ओरखडे पडतात. पण ज्याच्यामुळे हे सारे घडते त्याचे त्या व्यक्तीला काहीच वाटत नाही. ही खरी याच नव्हे,तर प्रत्येक कुटुंबाची शोकांतिका असते.

आपण प्रत्येक जण आपल्या परीने योग्यच असतो. कारण आपण फक्त आपला स्व केंद्रित विचार करीत असतो.पण आपण घरात, बाहेर, समाजात एकटे नाही हे विसरतो. काळाच्या प्रवाहात पूर्वीचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाते एकेक बंध तुटत हलके होत गेले ही वस्तू स्थिती आहे.माणसे घरात एकत्र असली तरी ती परक्या सारखी वागतात. आपल्याच विश्वात रमलेली असतात. त्यामुळे मोठ्यांचे न ऐकणे, स्वतःचेच खरे या तोऱ्यात रमणे, अशा धुंदीत वावरतात.

आई कुठे काय करते या मालिकेतील घरच्या मुख्य गृहिणीची म्हणजे आईची परंपरागत होत चाललेली होरपळ तर दिसतेच.. त्यासोबत तिचे संस्कार, तिची शिकवण, तिची भाव विवशता, या साऱ्याची पायमल्ली होताना दिसते.तिचे कष्ट, तिचा त्याग,तिची मुस्कटदाबी,तिची घुसमट कुणाला दिसत नाही. किंवा दिसूनही दुर्लक्षित राहते.सध्या चालू असलेला ईशा विरूध्द आई हा कटू सामना म्हणजे कळस वाटतो आईच्या दुर्लक्षित मायेचा.. तिच्या घरासाठी केलेल्या विस्मृतीत गेलेल्या त्यागाचा.. ईशाला खरे तर ईशा चे घरात नको तितके लाड झाले आहेत. तिला साऱ्यांनी फुला सारखे जपले आहे.तिच्या चुका सांभाळून घेतल्या आहेत. पण आहेत. तिचा अल्लड पणा सहन केलाय. तिच्या चुका पोटात घातल्या. ती फक्त वयाने वाढली. विचाराने नाही.

आजच्या पिढीतील बहुतेकांना (प्रत्येक बाबतीत अपवाद असतातच) सगळे इन्स्टंट हवे असते. कष्ट न करता पदरी पाडून घ्यायचे असते.पायरी पायरीने चढणे यांना मान्य नसते. एकदम उडी मारत थेट शिखरावर पोहोचायचे असते. आपण म्हणू तेव्हा म्हणू ते सुख पायघड्या घालत आपसूक नशिबात यावे ही यांची अपेक्षा असते. हवे ते हवे तेव्हा मिळाले नाही तर यांचा त्रागा होतो. ते आकाश पाताळ एक करणार! ईशा या बेधुंद, बेजबाबदार तरुण पिढीचे प्रतिनिधित्व करते. तिच्याकडे पाहून अभ्यास न करता क्यारी ऑन मागणाऱ्या विद्यार्थ्यांची आठवण होते! कसातरी जुगाड करून पदवीचा कागद मिळविण्याची धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांची ईशा प्रतिनिधित्व करते की काय असे वाटते! त्यामुळे तिची फक्त कीव करावीशी वाटते. पालकांनी आपला हट्ट पुरविणे हा आमचा जन्म सिद्ध अधिकार आहे अन् तो आम्ही मिळविणारच ही यांची प्रतिज्ञा असते. या चंगळवादी विचार सरणी असलेल्या पिढीला इतराशी काही देणघेणे नसते.मला हवे ते,हवे तितके, हवे तेव्हा मिळालेच पाहिजे. हे त्यांचे घोषवाक्य. बाकी दुनिया जाये भाडमे,ही बेदरकार वृत्ती! ईशा मालिकेत आताशा तसेच वागते आहे. ती चक्क आपल्या आईशी स्पर्धा करते आहे. तिला नवे ठेवण्यात, तीच्यातले दोष शोधण्यात तिला धन्यता वाटते! आपली योग्यता, आपले वय,आपला जीवनाचा अनुभव, या कसल्याचाही विचार न करता ती तोंडाला येईल ते बोलत सुटते. आपल्या प्रियकराने, नुकत्याच लग्न झालेल्या नवऱ्याने आपल्या तालावर नाचावे ही तिची अपेक्षा.तुमची मनस्थिती, परिस्थिती कशीही असो, तुम्ही आमचे हवे ते लाड पूरविलेच पाहिजेत. कारण तुम्ही आम्हाला जन्म दिला आहे. तुमच्या गरजेतून आमचा जन्म झालाय.त्यामुळे आमचे पालन पोषण, आमच्या गरजा,इच्छा,आकांक्षा ही तुमचीच जबाबदारी! इथे ही पिढी फक्त स्वार्थाचा ,स्वतःचा विचार करतांना दिसते. स्वतःचे खरे करून घेण्यासाठी प्रसंगी घरच्यांना इमोषनली ब्ल्याकमेल करते. अश्रूंचा देखील बाजार करता येतो. रडून आपले म्हणणे खरे असे भासविता येते. ईशा तेच करते आहे. संसारात फक्त प्रेम पुरेसे नसते. परस्परावरील विश्वास महत्वाचा.फक्त प्रेमाने पोट भरत नाही.कुटुंब चालत नाही. त्यासाठी पैसा लागतो.कष्ट करावे लागतात. घाम गाळावा लागतो.केवळ घेण्याचा विचार करून चालत नाही. आपल्या कर्तव्याचा, जबाबदारीचा विचार तितकाच महत्वाचा. ईशा सारख्या स्वार्थी,अविचारी मुली फक्त स्वतःचा विचार करतात.त्यापैकी काही घरातून पळून लग्न करतात. आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतात. काही चांगला सुखाचा संसार मोडीत काढतात.वयात येणाऱ्या आपल्या मुला मुलींचा विचार न करता स्वतःचा इगो जपण्यासाठी, आपलाच हट्ट पुर्ण करून घेण्यासाठी,क्वचित पैशाच्या मोहापायी घटस्फोट घ्यायला देखील मागे पुढे पाहत नाहीत. इथे नाव इशाचे घेतले तरी दुसरी बाजू देखील तितकीच दोषी. एकाच नाण्याच्या दोन बाजू.एक चीत एक पट.. एव्हढेच!

खरे तर वयात आल्यावर समज यायला हवी.मागचा पुढचा विवेकी विचार हवा. मुख्य म्हणजे आपल्या बोलण्या वागण्याचा घरच्यावर,अवती भवती च्या नात्यावर काय परिणाम होऊ शकतो याचा विचारच नाही.तात्पुरते सुख, इन्स्टंट आनंद, तत्काळ इच्छा पूर्ती हाच एकमेव उद्देश. मग पुढे गेल्यावर,चूक उमजल्यावर पश्चाताप होतोही यांना.पण तेव्हा उपयोग नसतो.वेळ निघून गेलेली असते. घड्याळाचे काटे उलटे फिरवता येत नाहीत! हे या तरुण पिढीला ईशा आणि कंपनीला कळत नाही. खरे तर समजून उमजत नाही.अशा वेळी आपण ज्या संस्कार, चांगली शिकवण अशा आचाराचा गाजावाजा करतो, त्याचे नेमके अर्थ काय,महत्व काय असाही प्रश्न पडतो. कारण शिकल्या सावरलेल्या ,सो कॉल्ड संस्कारी घरात ही हे प्रकार घडतात. लहाना बरोबर मोठेही कधी कधी लहान होतात. चुका सावरण्या ऐवजी चुकीची बाजू घेतात. ईशा सारखीला दोन गोष्टी कडक भाषेत समजावण्याचा प्रयत्न करण्या ऐवजी तिची बाजू घेतात. तिला पदरात घेतात.तिच्या चुकांवर पांघरूण घालतात.हे अधिक वाईट.. ईशाचे वागणे ही घातक आधुनिक प्रवृत्ती झाली आहे. इथे फक्त ईशालाच दोष द्यायचा नाहीय. घरातला बंड्या, बबड्या हेही त्याच माळेचे मणी! ह्या माळेचे मणी वाढताहेत ही खरी चिंतेची बाब!!



# गॅस गोदाम वस्तीच्या बाहेर हलवा

## श्रीराम गॅस एजन्सीच्या मनमानी कारभाराविरोधात आमरण उपोषण

आधुनिक केसरी न्यूज





**जिंतूर :** श्रीराम इन्डियन गॅस एजन्सीच्या मनमानी कारभार ने गस ग्राहकांची आर्थिक लुट करीत आहे घरपोच डिल्हेवरी चे अधिकचे 20 रुपये उकळून आर्थिक लुट करीत आहे ते थांबवण्यासाठी व गॅस गोदाम भर वस्तीत असल्याने परिसरातील नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे ते गॅस गोदाम भर वस्तीतून हटविण्यात यावे या मागणीसाठी काल पासून सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रफिक तांबोळी हे तहसील कार्यालया समोर आमरण उपोषणास बसले आहेत सविस्तर माहिती अशी की शहरातील श्रीराम इंन्डियन गॅस एजन्सीचा गोदाम भर वस्ती आहे व गॅसची टाकी घरपोच डिल्हेवरी चे अधिकचे 20 रुपये घेऊन गॅस ग्राहकांची सर्रास आर्थिक लुट होत असुन गस चे वजनही ग्राहकास करुन दिले जात नाही. त्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रफिक तांबोळी यांनी प्रशासनास 17 ऑगस्ट रोजी निवेदन देऊन गॅस एजन्सीचा गैरप्रकार रोखण्यासाठी व भर वस्तीतील गोदाम हलविण्या साठी निवेदन दिले होते पण प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. \म्हणून नाईलाजास्तव त्यांना उपोषणाला बसावे लागतं आहे प्रशासनाने गोदाम परिसरातील नागरिकांच्या जिवाची काळजी घ्यायला हवी होती पण प्रशासन कुंभकर्ण झोपेत आहे त्यांनी गॅस एजन्सीच्या विरोधात कोणतीस कारवाई केली नाही त्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार रफिक तांबोळी हे आज दि 15 सप्टेंबर शुक्रवारी आमरण उपोषणाला बसले आहेत.

श्रीराम गॅस एजन्सी ही गॅस टाकी घरपोच डिल्हेवरी करण्याचे ग्राहका कडुन 20 रुपये अधिकचे घेत आहे ग्राहकांची आर्थिक लुट करीत असुन गॅस टाकीचे वजनही केंद्रात नाही ते नियमबाह्य आहे. घरपोच डिल्हेवरी चे पैसे घेऊ शकत नाही व गॅस ग्राहकांनी स्वतः जाऊन आणल्यास गॅस एजन्सी ने भाड्या चे पैसे द्यावे असे निर्देश आहे पण श्रीराम गॅस एजन्सी हे ग्राहाकाची आर्थिक लुट करीत आहे.

# ई-पीक पाहणी नोंदणीला दहा दिवसांची मुदतवाढ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** खरिप पिक हंगाम सन २०२३-२४ शेतकरी स्तरांवरील ई-पिक पाहणी व नोंदणी करण्याची मुदत दहा दिवसाने वाढवुन देण्यात आली असुण शेतकऱ्यांनी आपली नोंदणी मोबाईल ॲप द्वारे पिक पाहणी तथा नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.



केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यभरात खरिप पिक हंगाम सन २०२३ पासून डिजिटल क्रॉप सर्व्हे प्रायोगिक राबविण्यात येत आहे.त्यासाठी केंद्र शासनाचे सूचनेप्रमाणे सध्या वापरण्यात येत असलेल्या ई-पिक पाहणी मोबाईल ॲप मध्ये अत्यावश्यक बाबीचा समावेश करून राज्याचे ईपिक पाहणी मोबाईलद्वारे करण्यात येत आहे. तर आता पर्यंत क्रॉप सर्व्हे पायलट प्रकल्प शेतकरी सतरावर पिक पाहणी नोंदणी दिनांक एक ऑगस्ट २०२३ ते १५सप्टेंबर २०२३(४५ दिवसांचे होते) परंतु शासनाकडून दहा दिवसांची मुदत वाढ देण्यात आली असुण २५सप्टेंबर२०२३ पर्यंत करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना आस्मानी -सुलतानी ला तोंड द्यावे लागते.तर यंदा पावसाने सुरवातीपासूनच अखडता हात ठेवला आहे.व पावसाचे यंदा काही खरे वाटत नाही.अशात शेतकऱ्यांनी सतर्क राहून आपल्या खरिप पिक हंगामाचे शेतातून ई -पिक पाहणी व नोंदणी करावे अगत्याचे आहे परंतु शेतकरी हलगर्जीपणा करतांना दिसत आहे.तालुक्यातून अनेक शेतकऱ्यांनी अद्याप ईपिक पाहणी नोंदणी केली नाही की सतर्कता दाखवली नाही. मात्र शासनाने पुन्हा दहा दिवसांची मुदत वाढ देवून संधी दिलीआहे.नुकसानीचा लाभ घेण्यासाठी ईपिक पाहणी व नोंदणी सेतू केंद्रावर करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# सावखेडा -गोरडमळी रस्ता कामाच्या प्रतीक्षेत



आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे लोणी ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या सावखेडा -गोरडमळी या दुरक्षेत्र डोंगराळ भागा लगत जिल्हा परिषद अंतर्गत येत असलेल्या रस्ता व पुलांची दुरावस्था असून गत सहासात वर्षा पासुन सतत दरस्तीची मागणी करूनही रस्ता पुल दुरुस्त झाले नसल्याने ग्रामस्थांचे हाल सुरु आहे. खुलताबाद तालुक्यातील शेवटच्या टोकाला व डोंगराळ भागात असलेल्या मौजे लोणी ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या सावखेडा -गोरडमळी या गावासाठी रस्ता करण्यात आलेला आहे यात काही डांबरीकरण केलेले तर काही खडीकरण केलेला रस्ता आहे.मात्र तो फुटला आहे. तर जिल्हा परिषद बांधकाम विभाग अंतर्गत जिल्हा परिषद सदस्या यांच्या कार्यकाळात फरसी पुल करण्यात आले होते ते अधिक पुरपाण्यामुळे बाजुचे भराव वाहून गेला होता.त्यामुळे मांडी गळ्यापर्यंत पाण्यातून ग्रामस्थांना व शालेय विद्यार्थी व्यापारी नौकरदार आजारी नागरिक महिला मुले यांना ये जा करावी लागत होती.परंतु यंदा पाऊस नसल्याने नाला रस्ता कोरडा पडून आहे.परंतु गत सहासात वर्षा पासून नागरिकांना त्रास सहन करावे लागत आहे. याकडे लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषद बांधकाम विभाग, वरिष्ठाधिकारी दुर्लक्ष करून आहे.सततची मागणी असुणही कुणीच याकडे ग्रामस्थांकडे लक्ष देण्यास तयार नाही.यामुळे वाहतुक ये जा साठी मोठा त्रास सहन करावे लागत असल्याने संबंधितांनी लक्ष घालून रस्त पुल काम करावे असी मागणी आहे.



# नवीन शेवा तंटामुक्ती कमिटीच्या अध्यक्षपदी के. एम. घरत यांची बिनविरोध निवड

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** गुरुवार दिनांक 14 सप्टेंबर 2023 रोजी ग्रामपंचायत नवीन शेवा ग्रामस्थांची ग्राम सभा संपन्न झाली. या ग्रामसभेमध्ये शिवसेनेचे उरण उपतालुका संघटक के. एम. घरत यांची नवीन शेवा तंटामुक्ती कमिटीचे अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. निवड होताच के एम घरत यांनी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. ग्रामसभा सुरू झाल्यानंतर के. एम. घरत यांचे नाव तंटामुक्ती कमिटीचे अध्यक्ष पदासाठी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमळाकर पाटील यांनी सूचित केले. तर कामगार नेते गणेश घरत यांनी अनुमोदन दिले. दुसरा कुठलाही उमेदवार नसल्यामुळे सरपंच सोनल घरत व उपसरपंच कुंदन भोईर यांनी के एम घरत यांची तंटामुक्ती कमिटीच्या अध्यक्ष पदी निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर केले. सदर वेळी ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष व उपतालुकाप्रमुख कमलाकर पाटील व सरपंच सोनल घरत यांनी मनोगते व्यक्त केली तर के. एम. घरत यांनी आपली निवड बिनविरोध केल्याबद्दल सर्व ग्रामस्थांचे आभार मानले.

सदर ग्रामसभेस सरपंच सोनल निलेश घरत,उपसरपंच कुंदन भोईर, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख व ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष कमळाकर पाटील, द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर, उरण शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शाखाप्रमुख शैलेश भोईर, कामगार नेते गणेश घरत, दिनेश घरत, ग्रामपंचायत सदस्य अशोक दर्णे, भुपेंद्र पाटील, सतिश सुतार, मयुरी घरत, वैशाली म्हात्रे, रेखा म्हात्रे, भावना भोईर, शाखा संघटिका वैशाली सुतार, सुरेखा भोईर, जागृती घरत, शुभांगी भोईर, रंजना घरत, ललिता म्हात्रे, एल्. जी. म्हात्रे , शेखर पडते, पोलिस पाटील मनोहर सुतार, मनोज घरत, पी.डी. घरत , निलेश गो. घरत, अनंत घरत, सुरेश पाटील, निलेश द. घरत , सिध्देश म्हात्रे, नारायण घरत, सुशांत घरत, कुंदन घरत,जतीन घरत, निहाल घरत, व ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयाच्या वतीने जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** शहारातील पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने रिसोड शहरातून. मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली आहे. पद्धतशीर मतदार शिक्षण आणि निवडणूक सहभाग कार्यक्रम (SVEEP) अंतर्गत मतदार जनजागृती करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाचा राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने मतदार जन - जागृती रॅलीचे आयोजन करण्यात होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेतून प्रा.डॉ. अतुल एन. खोटे यांनी आधुनिक लोकशाहीमध्ये मतदानाचे महत्त्व विशद केले. रासेयोचे सहकार्यक्रम अधिकारी डॉ. अमोल आढाव यांनी सुदृढ लोकशाहीसाठी मतदानचा हक्क आणि त्याचे महत्व या बाबत सविस्तर माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . एम.एन. गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषणातून निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता, किंवा कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करण्याचे मार्गदर्शन उपस्थितांना केले. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने संपूर्ण रिसोड शहरांमधून मतदान जनजागृतीसाठी भव्य रॅली काढण्यात आली. संबंधित रॅलीला महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. त्यानंतर संबंधित रॅली पोस्ट ऑफिस, सिव्हिल लाईन, बस स्टॅन्ड या मार्गाने संपुर्ण शहरातून काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीचा संदेश देऊन नागरिकांमध्ये मतदान जनजागृती केली. सदर रॅलीमध्ये राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अतुल एन. खोटे, रा. से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. केशव कोकाटे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. आम्रपाली भगत, सह. कार्यक्रम अधिकारी डॉ. अमोल आढाव, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




# शिवाजी विद्यालयात आजी आजोबा दिन मोठ्या उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचालित छत्रपती शिवाजी माध्यम उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथे शासन परिपत्रकानुसार आजी आजोबा दिन साजरा करण्यात आला. यावेळेस भाऊराव कोलते हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते संस्था सचिव श्रीमती रत्नाबाई कोलते यांनी विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांना पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ देऊन त्यांचे स्वागत केले सदरील कार्यक्रमांमध्ये शाळेचे प्राचार्य नारायण कोलते यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आयुष्यामध्ये आजी आजोबाचे काय स्थान असते याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले ज्याप्रमाणे शेतामध्ये एकांत झाड आपल्या शेताला व कुटुंबाला आसरा देते त्याप्रमाणे परिवाराचा व कुटुंबाचा कणा म्हणून आजी आजोबांना आपल्या जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे आजी-आजोबा हे देवाचे आशीर्वाद आहेत जे कधीही बदलू शकत नाहीत. त्याच्या वेशातील देवदूत आहेत जे नेहमी त्यांच्या मुलांवर आणि नातवंडांवर लक्ष ठेवतात. आपल्या जीवनामध्ये आजी-आजोबांना जीव लावायला पाहिजे म्हातारपणाची काठी म्हणून नातवंडाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले आजी आजोबांना कुटुंबाची आगळ म्हणून पहिल्या जाते याविषयी सविस्तर माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भास्कर खामठ सर यांनी केले. तर आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे व आजी आजोबांचे विजय सिंग राजपूत यांनी आभार मानले भास्कर ससाने ,संजय जोशी मुकुंदा व्यवहारे श्रीकृष्ण सोनवणे सुदाम राठोड विनोद जाधव ज्ञानेश्वर राठोड पोपटराव सोनवणे भूषण देसले दीपक सिसोदे गणेश मोहने पंजाबराव शेळके संजय अमृतकर मोहन बोरे सुनील कुमार चव्हाण मनोहर पडोळ शिवाजी सत्रे गणेश सत्रे सतीश गावंडे हिरालाल सोनवणे सतीश खवले श्याम जाधव अजबराव चव्हाण संदीप कोलते बाबासाहेब कोलते इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील अनेक पालक आजी आजोबा पत्रकार बंधू गोकुळसिंग राजपूत रहीम पठाण सुनील चोरमले जब्बार, उपस्थित होते अशी माहिती प्रा. जीवन कोलते यांनी दिली.

# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**




सीमेन ॲनालिसिस :जेव्हा पुरुष वंध्यत्व किंवा मेल इनफर्टिलिटी या विषयावर आपण बोलतो, तेव्हा पहिली टेस्ट येते ती म्हणजे 'सीमेन ॲनालिसिस ' > सीमेन किंवा धातू म्हणजे काय? पुरुषांमध्ये समागम झालयानंतर जो पांढरा, पिवळसर द्रव पदार्थ बाहेर पडतो त्याला धातू किंवा सीमेन असे म्हणतात. सीमेन कशापासून बनते ? याचा वंध्यत्व किंवा मूल होण्याशी काय संबंध असतो ते आपण सविस्तर पाहूया > सीमेनमध्ये काय घटक असतात ? यामध्ये समायनल वेसीकल, अंडाशय, प्रोस्टेट या तिन्ही ठिकाणांहून जो स्राव येतो त्यामुळे धातू बनतो. हे एक अत्यंत पोषक असे द्रव्य असते. जे शुक्राणूंना वाहून नेण्यास व त्यांचे पालन-पोषण करण्यास मदत करते. यामध्ये २०० प्रकारचे प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, क्लोरिन, सायट्रिक ॲसिड, फ्रुक्टोज लॅक्टिक ॲसिड, मॅग्नेशियम नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, सोडियम व्हिटॅमिन बी12 आणि झिंक इ. घटक असतात. वीर्यस्खलन झाल्यावर २ ते ५ मिली सीमेन बाहेर येते. यात साधारणतः प्रति मिली १५ मिलियन ते २०० मिलियन शुक्राणूंची संख्या असते. रिपोर्टमध्ये फिजिकल एक्झामिनिशेन, केमिकल एक्झामिनेशन आणि मायक्रोस्कोपिक एक्झामिनेशन याबद्दल पूर्ण माहिती दिलेली असते. फिजिकल एक्झामिनेशन- यामध्ये त्यांचा रंग, पातळ होण्याची वेळ, त्याची घनता इ. पाहिले जाते. केमिकल एक्झामिनेशन - या टेस्टमध्ये फ्रुक्टोज व पी. एच. पाहिले जाते. मायक्रोस्कोपिक एक्झामिनेशन- या टेस्टमध्ये त्यांची संख्या व मोटिलिटी पाहिली जाते. नॉर्मल रिपोर्टमध्ये पी. एच. अल्कलाईन (७.२ किंवा जास्त), काऊंट १५ मिलियनपेक्षा जास्त, पूर्ण काऊंट ३९ मिलियन किंवा जास्त, आकार ४ टक्के नॉर्मल किंवा जास्त मोटिलिटी (फॉरवर्ड प्रोग्रेसिव्ह ) ३२% किंवा जास्त, पूर्ण मोटिलिटी ४०% किंवा जास्त या सर्व गोष्टी नॉर्मल समजल्या जातात. > अझूस्पर्मिया म्हणजे काय ? कोणत्याही प्रकारचा मृत किंवा जिवंत शुक्राणू जर धातूमध्ये नसेल तर त्याला अझूस्पर्मिया असे म्हणतात. > ओलिगोस्पर्मिया - नॉर्मलपेक्षा कमी उदा. १० मिलियनपेक्षा कमी संख्या असल्यास ओलिगोस्पर्मिया म्हणतात. > अस्थेनोस्पर्मिया- जेव्हा शुक्राणूंची गति अतिशय कमी असते तेव्हा अस्थेनोस्पर्मीया असे म्हणतात. > ओलिगो-अस्थेनोस्पर्मिया - जेव्हा शुक्राणूंची संख्या कमी असते, त्यांची गती कमी असते किंवा ते जागीच पडून असतात तेव्हा त्याला ओलिगो अस्थेनोस्पर्मिया म्हणतात. आता यांची कारणे काय असतात ? प्रीटेस्टिक्युलरः म्हणजे काही हार्मोन्स किंवा हायपोथॅलेमो पिट्युटरी गोन्याडल ॲक्सिसमध्ये असणारे प्रॉब्लेम्स उदा. टेस्टेस्टोरॉनची मात्रा कमी असणे इ. टेस्टिक्युलर म्हणजे जन्मतःच अंडाशय नसणे किंवा लहान असणे. पोस्ट टेस्टिक्युलर म्हणजे वीर्यवाहिनीला अडथळा असणे इ. व्हेरिकोसील - म्हणजे अंडाशयाची नस वाढल्याने अंडाशयाचे तापमान वाढणे आणि शुक्राणूंची संख्या गुणवत्ता कमी होणे म्हणजे मोटिलिटी कमी होणे. याला मायक्रोसर्जरीद्वारे ऑपरेशन केल्यास मूल होण्याची शक्यता वाढते. स्पर्म वाढण्यासाठी पूरक आहार- शिंपले (ऑईस्टर), मासे, व्हाईट फिश, केळी, आक्रोड, लसूण, आलं (अदरक), डार्क चॉकलेट, टरबूज, पाईनॅपल ज्यूस, मसाल्याचे पदार्थ इ. व्यसने - स्मोकिंग (धूम्रपान) यामुळे शुक्राणूंच्या संख्येत तसेच गुणवत्तेवर परिणाम होतो. मद्यपान, चीज, कपकेक, सॉसेज इ. मुळेही हा दुष्परिणाम होतो. लठ्ठपणामुळे स्पर्म काऊंट कमी होतो, वारंवार वीर्यस्खलन झाल्याने स्पर्म क्वालिटी वाढते. लॅपटॉप, मोबाईल यांच्या कंपनांमुळे स्पर्म गुणवत्तेवर परिणाम होतो. पुरुषांमध्ये स्पर्मची निर्मिती जिवंत असेपर्यंत होत राहते. योनी अंगात गेल्यावर शुक्राणू पाच दिवसांपर्यंत जिवंत राहतात. नॉर्मली २४ ते ४८ तास स्पर्म हा जिवंत राहू शकतो. स्पर्ममध्ये असलेल्या स्पर्मिनमुळे त्याचा वापर कॉस्मेटिकमध्येही होतो. स्पर्मची वाढ होण्यास ७५ दिवस लागतात आणि एका सेकंदाला १५०० स्पर्म तयार होतात. हे महत्वाचे आहे- पुरुष किंवा स्त्री वंध्यत्व असेल तरीही प्रथम पुरुषांनी धातूची तपासणी करावी. जेणेकरून पत्नीच्या विनाकारण तपासण्या होणार नाहीत.






डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड
सेक्सॉलॉजिस्ट
9822326248



# चंद्रपुरातील अमृत योजनेच्या कंत्राटदारास काळ्या यादीत टाका

## अमृत नळ योजनेच्या समीक्षा बैठकीत हंसराज अहीर यांचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अमृतजल नळ पाणी पुरवठा योजना ही मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या स्वप्नातील महत्वाकांक्षी योजना असतांनाही चंद्रपूर महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार व नियोजनशुन्यतेमुळे 2021 पर्यंत पुर्णत्वास जाणारी ही योजना अजुनही भरकटत असून लोकांना या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याने संबंधित दोषी कन्सट्रक्शन कंपनी व मालकाला संपूर्ण महाराष्ट्रातून काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याचे निर्देश राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी या संदर्भात घेतलेल्या समिक्षा बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना दिलेत.

सदर योजनेबाबत महानगरातील मागासवर्गीय, दलित नागरीकांच्या तसेच भाजप पदाधिकारी खुशाल बोन्डे , विनोद शेरकी यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेवून हंसराज अहीर यांनी दि. 15 सप्टें. 2023 रोजी शासकीय विश्रामगृहात मनपा व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकाऱ्यांची याप्रश्नी समिक्षा बैठक घेतली. बैठकीस मनपा आयुक्त विपीन पालीवाल, मजीप्रा चे कार्यकारी अभियंता संजय अष्टगी, मुख्य अभियंता महेश बारई, उपअभियंता बोरीकर, भाजप नेते खुशाल बोंडे, माजी महापौर अंजली घोटेकर, माजी उपमहापौर अनिल फुलझेले, राजु घरोटे, रविंद्र गुरनुले उपस्थित होते.

अमृतचे कार्य करणाऱ्या संतोष कन्सट्रक्शन कंपनीने या कामात प्रचंड घोळ करीत कामे पुर्ण न करता पैसे घेवून पळ काढल्याने या योजनेवर 240 करोड खर्ची घालुनही लोकांना पाणी मिळत नाही ही अत्यंत गंभीर बाब असून या महा. जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची अक्षम्य चूक व हलगर्जीपणा कारणीभूत असल्याचे अहीर यांनी म्हटले. कामाची प्रगती, गुणवत्ता तपासणी न करता मजीप्राच्या शिफारसीने तत्कालीन मनपा आयुक्तांनी अपूर्ण काम व योजना पुर्णत्वास न गेली असतांना कंत्राटदाराला अपूर्ण कामाचे व आगावू रक्कम दिल्याची बाब उघडकीस आली असून हा प्रकार अक्षम्य आहे. त्यामुळे सदर कंत्राटदारास त्वरीत काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करावी. या विषयी पुढील महिण्यात या योजनेसंदर्भात जनसुनावणी घेण्यात येणार असल्याचेही हंसराज अहीर यांनी सांगीतले. सुरूवातीला सदर योजना 2019 पर्यंत पुर्णत्वास जाण्याचा करार होता. मात्र शासनाने या करारास 2 वर्षे मुदतवाढ दिल्याने ही योजना 2021 पर्यंत पुर्णत्वास जाणे अपेक्षीत असतांना हे काम वेळेत पुर्ण करून घेण्यास असमर्थ ठरल्याचे अधिकाऱ्यांनी समिक्षा बैठकीत मान्य केले. त्यावेळी अहीर यांनी नाराजी व्यक्त करतांनाच अधिकाऱ्यांनी कंपनीला अप्रत्यक्षपणे सहकार्यच केल्याचे अहीर यांनी अधिकाऱ्यांवर ठपका ठेवला. त्यांनी योजनेविषयी गंभीर स्वरूपाच्या अनेक बाबींवर भाष्य करीत सदर कंपनीला तातडीने बोलावून काम पूर्ण करण्याच्या सुचना कराव्या अन्यथा पोलिस तक्रार करावी, अतिरिक्त दंडाची आकारणी करावी, आगावू अदा केलेली रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करावी असे निर्देश दिले. संतोष कन्सट्रक्शन कंपनीच्या विषयात अडकून न पडता सदर योजना कशी मार्गी लावता येईल याविषयी नियोजन करण्याची सुचनाही अहीर यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केली. उपस्थित नगरसेवकांनीही यावेळी त्यांच्या भागातील तक्रारींचा पाढा वाचला. बैठकिस नगरसेवक राजेंद्र अडपेवार, जयश्रीताई जुमडे, शाम कनकम, मायाताई उईके, प्रदिप किरमे, संजय कंचर्लावार, शितल आत्राम, रवी आसवाणी, कल्पनाताई बगुलकर, विठ्ठल डुकरे, रवी लोणकर, पूनम तिवारी, महेंद्र जुमडे, सुभाष आदमने, नकुल आचार्य उपस्थित होते.

# अंघोळीकरिता गेला अन् नदीत बुडाला; शोध सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा:** नदीवर आंघोळ करण्याकरिता गेलेला एक इसम तोल गेल्याने नदीपात्रात बुडाला. ही घटना लाखांदूर तालुक्यातील भागडी येथील चुलबंद नदीकाठवर शुक्रवारी दुपारी घडली. गजानन शेंडे (५२, रा. भागडी) असे या इसमाचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, अती मद्यप्राशन केलेले शेंडे गावातील तान्हा पोळ्याचा कार्यक्रम आटोपून चुलबंद नदीवर आंघोळ करण्याकरिता गेले होते. तोल गेल्याने ते चुलबंद नदीपात्रात बुडाले. नदी काठावर उपस्थित नागरिकांनी घटनेची माहिती लाखांदूर पोलिसांना दिली.

पोलिसांनी लगेच घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. मात्र, नदीतील पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने त्यांचा शोध लागला नाही. आज, शनिवारी सकाळपासून पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.



# बालकाला मिळाली समतोलची साथ

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** येथील केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्पाच्या वतीने नेहमी गरजू बालकांना मदतीचे कार्य सुरू असते ,असाच एक क्षण आज असा घडला की , एक १४ वर्षाचा बालक हावडा कडून येणाऱ्या गीतांजली ट्रेन मधून उतरतांना जळगाव रेल्वे स्टेशनवर समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रदिप पाटील यांना थंडीने कुरकुळत दिसला यांनी ताबडतोब टीम सदस्य विश्वजीत सपकाळे , रविना भगत यांना बोलवून , लागलीच त्या बालकाला धीर देऊन आपल्या जळगाव रेल्वे स्थानक येथील समतोल प्रकल्प बाल सहायता केंद्रात आणले, बालकाची तब्येत खराब दिसत होती , बालकाला चक्कर येत होते , ताप ही भरपूर प्रमाणात होता , थंडीने कुळकुळत होता. ताबडतोब समितीच्या आदेश्याने बालकाला हॉस्पिटलमध्ये एडमिट केले, सलाईन लवण्यात आल्या, त्यासोबत ओषधी बालकाला देण्यात आली. हा बालक एका छोट्याश्या गावात हडकपुर कमलनगर , टाटा नगर येथील असुन , मुलगा ८ दिवसा पासून घराच्या बाहेर आहे, घरात आई सोबत झगडे झाल्याने रागाच्या भरात बालकाने घर सोडले आहे, अशी माहिती बालकाने समतोल प्रकल्पाला दिली . बालकाला वडील नाहीत , मुलगा अश्या परिस्थितीत मुंबई ला मिळेल ते काम करण्यासाठी घरून कोणाला न सांगता निघालेला आहे , पण मध्येच तब्येत खराब झाली. अश्या वेळेस समतोल च्या कर्मचारी यांनी मुलाला धीर देत, मुलाची दखल घेऊन त्याला हॉस्पिटल मध्ये नेत उपचार सुरू केला.



आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424



# तंदुरी टेस्टी मोमोज

मोमोज आणि त्यातून तंदुरी म्हटले की सुटले ना पाणी तोंडाला ? मग वाट कसली पाहताय ,चला बनवूया लगेंच ..काय..आश्चर्य वाटले का...पण खरंच, अगदी मोमोज पार्लर सारखे बेस्ट मोमोज ते सुद्धा घरी गॅसवर आपण नक्की बनवू शकतो .चला पाहाच मग करून .

**साहित्य :** स्टफींगसाठी : १ लहान कोबीचा गड्डा , 1 गाजर , 2 सिमला मिरच्या , 1 वाटी कांदापात , 1 चमचा आले लसूण पेस्ट , 1 चमचा लाल तिखट ,1 चमचा कसुरी मेथी ,1 चमचा धने जिरे पावडर , अर्धा चमचा बारीक कट केलेला लसूण , 2 चमचे बटर , मीठ . **पारीसाठी :** दीड वाटी मैदा , अर्धी वाटी कणिक, मीठ ,2 चमचे तेल . मोमोज मॅरेनाईट करण्यासाठी साहित्य : पाऊण वाटी फुटाणे डाळांची पावडर , 4 चमचे दही ,अर्धा चमचा मिरपूड , 1 चमचा लाल तिखट , मीठ ,हिंग , थोडीशी आले लसूण पेस्ट , मिक्स हर्बज , 2 चमचे तिळाचे किन्वा मोहरीचे तेल ,1 चमचा मोहरी ,1 चमचा घट्ट क्रीम.

सर्वांत आधी आपण मोमोजचे स्टफींग बनवून घेऊ .त्यासाठी गॅसवर कढई ठेवून त्यात प्रथम मोठ्ठ्या आचेवर कोबी परतावा .बारीक चिरल्यामुळे कोबीला पाणी भरपूर सुटलेले असते .पाण्यामुळे स्टफींग ओलसर राहिले तर तिखट मिठामुळे सारखे पाणी सुटत राहील व त्यामुळे मोमोज व्यवस्थित ड्राय होणार नाहीत .मग सर्व भाज्या घालुनकोरड्या झाल्या की तिखट ,मीठ ,आले लसूण पेस्ट ,बटाटा , कसुरी मेथी ,बारीक कट केलेला लसूण हे सर्व घालून मग बटर घालावे. म्हणजे सारण आपल्याला पाहिजे तसे छान बनेल.आता हे थंड होऊ द्यावे. स्टफींग बनवत असतानाच एका बाजूला पारीची कणिक सुद्धा मैदा, मीठ, तेल घालून शक्यतेवढी घट्ट भिजवावी व झाकून ठेवावी. भिजलेल्या कणकेच्या पातळ छोट्या छोट्या पुऱ्या लाटून त्यात सारण भरपूर भरून मोदक बनवावेत .वरची जास्तीची कणिक काढावी नाहीतर घट्ट व कडक होते व चांगली लागत नाही. असे सर्व मोमोज बनवून घ्यावेत. एका मोठ्ठ्या भांड्यात मॅरेनाईट करण्यासाठी डाळाची पावडर, दही, घट्ट क्रीम, तिखट, मीठ, मिरपूड, हिंग, कसुरीमेथी, मिक्स हर्बज, तिळाचे किंवा मोहरीचे तेल गरम करून भरपूर मोहरी घालून खमंग फोडणी करून ती थंड करून त्यावर घालावी. सर्व एकत्र छान मिक्स करावे. त्यात छान बाहेरच्या मोमोज सारखा रंग पाहिजे असेल तर ऑरेंज फूड कलर घालावा. आता त्यात सर्व मोमोज घालून सर्व व्यवस्थित मॅरेनाईट करायला ठेवावेत. आता कोळशाचा मोठ्ठा तुकडा गॅसवर ठेवून पेटवून घ्यावा. भांड्यातल्या मोमोजच्या मध्यभागी थोडी जागा करून एका वाटीत किंवा अल्यूमिनियम फॉईल वर तो कोळसा ठेवावा व 2..3 मिनिटे झाकण ठेवून मोमोजना मस्त स्मोक द्यावा. त्यामुळे सेम तंदुरची टेस्ट येते. तोपर्यंत गॅसच्या बर्नरभोवती आल्यूमिनीयम फॉईल लावावी. म्हणजे आपण गॅसवर मोमोज भाजू तेंव्हा त्याला जास्तीची व न चिकटलेली मॅरेनाईट पेस्ट गळून पडते व शेगडी खराब होते.

ते स्वच्छ करायचा त्रास वाचेल् . स्मोक देऊन झाल्यावर झाकण काढून सर्व मोमोज लोखंडी ग्रील करण्याच्या सळईला लावून घ्यावेत. मग गॅस सुरु करून मोठ्ठ्या फ्लेमवर हे मोमोज मस्त भाजावेत. मध्ये एकदा थोडेसे तेल लावावे व पुन्हा खरपूस भाजावेत म्हणजे आतपर्यंत व्यवस्थितपणे भाजले जातात. सर्व मोमोज भाजून झाले की मोठ्ठ्या बाऊल मध्ये काढून त्यावर कांद्याच्या उभ्या चकत्या, मेयोनीज, मिरपूड, चाट मसाला , मिक्सहर्ब्ज, कोथिंबीर, बारीक चिरलेली कांदा पात घालून टॉस करावे व लाल ,हिरव्या डिप बरोबर छान सर्व्हिंग डिश मध्ये सर्व्ह करावेत. **वैशिष्ट्य :** हे मोमोज पाहून सर्वजणच अतिशय खुश होतील. रंग, टेस्ट, स्मोकमुळे तंदूरची अशी काही भन्नाट टेस्ट येते ना ,कोणालाही घरात ते सुद्धा गॅसवर बनवले यावर विश्वास ठेवणेच अशक्य आहे. नक्की बनवा आणि सर्वांना खुश करा.

# आदिवासी भागातही "मेरी माटी मेरा देश" अभियानाला प्रचंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज
सागरकुमार झनके

**जळगाव जा :** जळगाव जामोद तालुक्यात ग्रामीण भागासाह आदिवासी भागातही "मेरी मिट्टी मेरा देश" अभियानाला मोठ्या प्रमाणावर प्रतीसाद मिळत असून, तालुक्यातील प्रत्येक गावातील प्रत्येक घरापर्यंत हे अभियान पोहचवून तेथील तांदूळ व माती एकत्र करण्याचे काम गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, आशा वर्कर यांच्या माध्यमातून केल्या जात आहे. जळगाव जामोद तालुक्यात अभायानाला. मोठ्या प्रमाणावर लोकांचा प्रतीसाद मिळत आहे.

अमृत कलश यात्रेला केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री यांचे उपस्थीतीत १ सप्टेंबर पासून दिल्ली येथून सुरवात झाली आहे. संपूर्ण भारतात "आझादी का अमृत महोत्सव"अंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश अभियानाला १५ ऑगष्ट पासून सुरवात झाली असून त्याअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायत स्थरावर शिला फलक आणि ७५ वृक्ष लागवड करण्यात आली आहे. आता याच्या दुसऱ्या टप्प्याची सुरवात अमृत कलश यात्रेच्या स्वरूपात १सप्टेंबर पासून दिल्ली येथून झाली आहे. त्याअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातही या अभियानाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे सुरवात झाली असून,जळगाव जामोद तालुक्यातही गटविकास अधिकारी संजय पाटील, विस्तार अधिकारी संदीपकुमार मोरे,पी.एस.राजपूत यांचे नेतृत्वात अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर,ग्रामसेवक,हे तालुक्यातील प्रत्येक गावात जावून अमृत कलशामध्ये माती व तांदूळ एकत्र करत आहेत.या उपक्रमाला ग्रामीण भागासह आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर प्रतीसाद मिळत असून सदर अमृत कलश मुंबई येथे पाठवल्या जाणार आहे.

अमृत कलश यात्रा या उपक्रमाच्या माध्यमातून भारतातील जवळपास सर्व घराप्रयंत हा उपक्रम पोहचविण्याचे उदिष्ट ठरले आहे. अमृत कलश यात्रेसाठी गाव हे उपक्रमाचे एकक मानण्यात आले असून,भव्य उत्साही स्वरूपात ही यात्रा १ ते ३० सप्टेंबर प्रयंत चालणार आहे.

सदर अभियान भारत सरकारच्या माध्यमातून प्रत्येक राज्यात,प्रत्येक राज्यातील गावागावात हे अभियान जिल्हा, तालुका, व ग्रामस्थरावर राबवल्या जात असून याला मोठ्या प्रमाणावर लोकांचा प्रतीसाद मिळत आहे.या अभियानामध्ये प्रत्येक गावातून जमा केलेल्या माती व तांदुळाच्या अमृतकलशाचे तालुक्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी एकत्र करणे,व या अमृत कलशामधील माती व तांदूळ एका मोठ्या कलशामध्ये एकत्रीतपणे प्रत्येक तालुक्यातून व शहरातून मुंबई येथील ऑगष्ट क्रांती मैदान येथे एकत्रीकरण करण्यात येणार आहे.मुख्यमंत्र्यांच्या उपस्थीतीत भव्यदिव्य अशा कार्यक्रमाचे आयोजन करून,स्वयंसेवक सदर अमृत कलश रेल्वेने दिल्लीला घेवून जातील.त्यासाठी विशेष रेल्वेचे आयोजन करण्यात आले आहे.संपूर्ण देशातून आलेली माती महान शहिदांच्या स्मृतीप्रित्यर्थ अमृत वाटीका निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणार आहे...

अमृत कलश घेवून जाणाऱ्या स्वयंसेवकांची नवी दिल्ली येथे व्यवस्था करण्यात आली असून,भारतातून जवळपास ७५ हजार स्वयंसेवक दिल्लीला जाणार आहेत.सुविधा संस्कृती व युवक कल्याण व क्रिडा मंत्रालय त्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

"अमृत कलश यात्रेचा" अंतीम सोहळा १ नोव्हेबर रोजी प्रधानमंत्र्याच्या उटस्थीतीत संपन्न होत असून, यामध्ये पंचप्रण शपथ घेणे,भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव स्मृतीस्थळाचे समर्पण, अमृत वाटिकेच्या निर्मितीचे उद्घाटन तसेच अमृत कलश यात्रेला झेंडा दाखवण्यात येईल.

# वाकी येथे सत्यशोधक संवाद सभेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** वाकी, ता. बारामती येथे सत्यशोधक समाज स्थापना दिवस शतकोत्तर सुवर्ण महोत्सव दिना निमित्त 'सत्यशोधक कार्यकर्ता निर्माण अभियान अंतर्गत' सत्यशोधक संवाद सभेचे आयोजन रविवार दि. २४ सप्टेंबर रोजी सायं ५:०० वाजता करण्यात आले आहे.राष्ट्रपिता जोतीराव फुले यांचा सत्यशोधकी विचार जनमाणसात घेऊन जाण्याचे काम सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने गेली अनेक वर्षांपासून केले जात आहे.सत्यशोधक संवाद सभेच्या माध्यमातून लोकांशी एक सामाजिक मंथन घडवून आणली जात आहे. सत्यशोधक समाज स्थापनेचे ध्येय, उद्देश, सत्यशोधक चळवळीचा इतिहास, वर्तमान आणि भविष्यकालीन संकल्पना, उपक्रम आदी विषयांवर सविस्तरपणे संवाद होणार आहे.या संवाद सभेसाठी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक बहुउद्देशीय सामाजिक संस्था महा.राज्यचे संस्थापक अध्यक्ष व स्वराज्याचा जाहीरनामाचे मुख्य संपादक विशाल धेंडे हे असणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून ग्रामपंचायत वाकीचे सरपंच किसन बोडरे,उपसरपंच हनुमंत जगताप, सेवानिवृत्त आर.टी.ओ.अधिकारी व शांतता कमिटी सातारचे सदस्य डॉ.मधुकर वाघमारे,जर्नालिस्ट हर्षद रुपवते,प्रा.संदिप लोखंडे,संजीव संरक्षण आणि जागृतीचे संस्थापक अध्यक्ष भालचंद्र महाडीक,स्वराज्याचा जाहीरनामाचे उप संपादक संभू कांबळे आदी उपस्थित असणार आहेत.



# प्रा. सूर्यवंशी शिक्षक रत्न पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील नागवाडी फाटा तलवाडा येथील पांडूरंग इंग्लिश स्कूल आणी स्व. भागीनाथ बोडखे गुरुजी विद्यालय, जु.कॉलेज चे प्राचार्य संतोष देवीदास सुर्यवंशी यांना नुकताच शिक्षकरत्न पुरस्कार मिळाला आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बदल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. विद्यार्थीचे हस्ताक्षर मोती करून मुलांना उत्तम शिक्षण, संस्कार, शिस्त लावून जवळ पास 40 विद्यार्थ्यांना आर टी ई अंतर्गत मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. अल्प फी मध्ये दर्जेदार शिक्षण व विद्यार्थ्यांना उत्कृष्ट हस्ताक्षर याची दखल घेवून ग्रामीण भागातून संतोष सुर्यवंशी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती नाशिक येथे नुकताच पुरस्कार सोहळा पार पडला . कला कुंज न्यूज चॅनल आणी दर्पणकार बाळ शास्त्रीं जांभेकर पत्रकार संघ यांच्या वतीने महेंद्र देशपांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला . पुरस्कार मिळाल्याबद्दल संतोष सुर्यवंशी यांचे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे . या पुरस्कारानी ऊर्जा मिळाली असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांना कमी फी मध्ये दर्जेदार शिक्षण देवून त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी प्रचंड मेहनत घेण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन प्रा. संतोष सुर्यवंशी यांनी केले.




# तलवाडा येथे मराठा आरक्षणासाठी उपोषण

आधुनिक केसरी न्यूज
शांताराम मगर

**लोणी खुर्द :** राज्यातील मराठा आरक्षण प्रश्नावर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा. मराठा समाजाच्या सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी वैजापुर तालुक्यातील मराठवाड्याचे प्रवेशद्वार समझल्या जानार्या तलवाडा येथेल ग्रामस्थांनी साखळी उपोषण सुरू केले.

जालना येथे मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तलवाडा ग्रामस्थांनी मराठा समाजाच्या आरक्षणाची लढाई निर्णय टप्प्यात आली असून सर्वांनी एकजुटीने मनोज जरांगे अजय पाटील साळुंके यांच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पंचक्रोशीतील सरपंच विविध पक्षाचे पदाधिकारी यांचा या साखळी उपोषणाला पाठिंबा मिळत आसुन तलवाडा येथे ग्रामस्थांकडून साखळी उपोषण सुरू करण्यात आले.

दररोज दहा जण या आंदोलनात सहभागी होऊन पाठिंबा देणार आहेत. आरक्षणासोबतच वैजापुर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने उपाययोजना लागू कराव्यात अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली. तालुक्यात जनावरांसाठी चारा डेपो सुरू करावेत, वाड्यावस्त्यांवर आवश्यकतेनुसार पाण्याचे टँकर सुरू करावेत या मागण्यांचे तहसीलदार निवेदन सुनिल सावंत शिऊर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप पाटिल यांना देण्यात आले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# खारघरमध्ये रस्ते दुरुस्तीला सुरुवात

## दैनिक आधुनिक केसरी इम्पॅक्ट

आधुनिक केसरी न्यूज

**खारघर :** मुख्य रस्त्यांची पावसात पूर्णतः वाट लागली असून, रस्त्यांवर खड्डे पडलेले होते. त्यामुळे रस्त्यावर मोठे डबके साचत होते.त्यामुळे वसाहती मधील नागरिकांना व वाहनधारकांना त्यातूनच मार्गक्रमण करीत होते.त्यामुळे तातडीने खड्डेमय रस्ते दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली होती.पनवेल महापालिका प्रशासनाने पुढाकार घेऊन ताबडतोब रस्ते दुरुस्तीला सुरुवात केली. अपघाताची शक्यता पाहता नुकतेच याबाबत


केसरी
श्री गणरायाचे आगमन खड्ड्यांतून

'आधुनिक केसरी'ने 'श्री गणेशाचे आगमन खड्ड्यांतून' या मथळ्याखाली सचित्र बातमी प्रसिद्ध करून संबंधित महापालिका विभागाचे लक्ष वेधले होते.त्याची दखल घेत संबंधित रस्त्याच्या दुरूस्तीला वेग प्राप्त झाला.श्री गणरायाचे आगमन अगदी २ दिवसांवर येऊन ठेपले असून रस्ते दुरुस्तीला जलदगती प्राप्त झाल्याने वाहनधारक व नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

# आमखेडा येथील शिधापत्रिकाधारक गोरगरिबांच्या साखरेचा झाला घोटाळा

## तहसील कार्यालयासमोर विश्वनाथ बोडखे यांचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** आमखेडा येथील आमखेडा येथील १२० अंत्योदय शिधापत्रिका धारक गोर गरीबांच्या साखरेचा घोटाळा करणाऱ्या सोयगाव तहसील पुरवठा अधिकाऱ्याची व पुरवठा विभागाच्या गोडावून हमालाची चौकशी करण्यात येऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तहसील कार्यालयासमोर सोनसवाडी विविध सहकारी सेवा संस्थेचे माजी चेअरमन विश्वनाथ बोडखे हे शुक्रवारी (दी.१५) प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत. सोयगाव तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात पुरवठा अधिकारी नाना मोरे हे आर्थिक देवाण घेवाणीतून गोडावून हमाल व रेशन माफिया असलेल्या भगवान वारंगने यांच्या संगनमताने गरिबांच्या हक्काच्या रेशनच्या धान्याचा काळाबाजार करीत आहेत. पुरवठा अधिकाऱ्यांनी अधिकाराचा गैरवापर करीत रेशन माफिया हमाल भगवान वारांगणे यास धान्यदुकान ताब्यात देऊन इ पॉश मशीन दिले आहे. यात पुरवठा अधिकाऱ्यांनी पन्नास हजार रुपये घेऊन धान्य दुकान ताब्यात देतांना स्टोक व माल मोजून घेतला नाही. त्यामुळे १२० अंत्योदय शिधापत्रिका धारक गोर गरीबांना साखर न वाटता ही साखर काळाबाजारात विक्री करण्यात आली आहे. या प्रकरणाची तक्रार करणाऱ्या सोनसवाडी विविध सहकारी सेवा संस्थेचे माजी चेअरमन विश्वनाथ बोडखे यांना जीवे ठार मारण्याच्या धमक्या देण्यात येत आहे.याप्रकरणी पुरवठा अधिकारी व हमाल भगवान वारंगने यांची चौकशी व्हावी तसेच त्यांच्यावर कारवाई व्हावी या मागणीसाठी सोनसवाडी विविध सहकारी सेवा संस्थेचे माजी चेअरमन विश्वनाथ बोडखे हे शुक्रवारी (दी.१५) प्राणांतिक उपोषणाला बसले आहेत.

# नबाजीराव पा. गाडेकर यांचा गौरव सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** नबाजीराव पा. गाडेकर यांनी बजाज कंपनीतील सेवा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सेवा गौरव सोहळा करण्यात आला. यावेळी माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरीभाऊ बागडे नाना, माजी मंत्री डॉ. नामदेवरावजी गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच मा. जि. प. सदस्य शिवाजी महाराज पाथ्रीकर, तालुकाध्यक्ष सांडू आण्णा जाधव, माजी सभापती सर्जेराव मेटे, ज्येष्ठ नेत्या मंगलाताई वाहेगावकर, जनार्दन शेजुळ, गजानन नागरे, वाल्मीक जाधव, बाळासाहेब तांदळे, इलियास शहा,साहेबराव बेडके, सोमिनाथ कोलते, कल्याण चव्हाण, रोशन अवसरमल, विलास उबाळे, गोपाल वाघ तसेच परिसरातील सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन, संचालक, पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला, नातेवाईक - स्नेही, मित्र परिवार व आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# राजूर ग्रामीण रुग्णालयात आयुष्मान भारत योजनेचे कार्ड वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत लाभार्थ्यांना आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड वितरण करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राजुर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने २५ लाभार्थ्यांना आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन राजूरच्या सरपंच प्रतिभा भुजंग यांच्या हस्ते करण्यात आले. सर्वसामान्य माणसांना मोठ्या आजारांचा सामना करावा लागतो म्हणून आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन-आरोग्य योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना पाच लाखापर्यंत मोफत उपचार मिळतात. म्हणून जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी कार्ड काढून योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मान्यवरांच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमास माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, वैद्यकीय अधीक्षक डॉ.डी.एम. पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ.राजू राठोड, डॉ. सतीश कावळे,डॉ, सोनटक्के, इन्चार्ज सिस्टर प्रेरणा निर्मल,डाटा ऑपरेटर आकाश कोलते, रुग्णालयातील कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.





# चिमुकल्या हातांनी दिला मातीच्या गोळ्यांना आकार

आधुनिक केसरी न्यूज

**संजय व्यापारी**

**छत्रपती संभाजीनगर :** छावणी गणेश महासंघ, गरवारे कम्युनिटी सेंटर, आणि छावणी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्टोन्मेंट इंग्लिश मिडियम स्कूल येथे विनामूल्य शाडू माती पासून गणपती बनविणे कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळे मध्ये चिमुकल्या हातांनी मातीच्या गोळ्याला आकार देत आपल्या मनातील बाप्पाची मूर्ती साकारली या कार्यशाळेत जवळपास 100 विद्यार्थांनी सहभाग घेतला सहभागी सर्व विद्यार्थ्यांना गरवारे कम्युनिटी सेंटर छावणी तर्फे माती देण्यात आली सहभागी विद्यार्थांना प्रशिक्षक शालवी दंडे व समृद्धी देशमुख यांनी क्रमाक्रमाने मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण दिले जसे जसे मातीच्या गोळ्याला मूर्तीचा आकार येत होता तस तस विद्यार्थ्यांची उत्सुकता वाढत होती या कार्यशाळेसाठी छावणी परिषदेचे CEO संजय सोनवणे, छावणी गणेश महासंघाचे अध्यक्ष, सचिव, कार्याध्यक्ष तसेच सर्व पदाधिकारी, गरवारे चे सुनिल सुतवने , रमाकांत रौतल्ले शाळेच्या मुख्याध्यापिका प्रियांका तारगे, अनघा बादुल सुप्रिया गायकवाड प्राज्ञा बागुल यांनी या कार्यशाळेसाठी पुढाकार घेतला प्रवीण हिवाळे ,जगदीश बेडवाल, उद्धव मोरे यांनी यासाठी परिश्रम घेतले विद्यार्थांनी साकारलेल्या मूर्ती ला रंग देऊन हीच मूर्ती ची स्थापना करून दहा दिवस पूजा अर्चना करणार असल्याचे सांगितले



# स्व.पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात बालविवाह मुक्तीची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** स्थानिक रिसोड इंडियन सोशल सर्विस युनिट ऑफ एज्युकेशन नागपूर व समाजशास्त्र विभाग, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली "बालविवाह मुक्त वाशिम जिल्हा" अभियान अंतर्गत जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इंडियन सोशल सर्विस युनिट ऑफ एज्युकेशन नागपुर ही संस्था बालविवाह मुक्ती अभियान, स्त्री अत्याचार प्रतिबंध, बाल तस्करी या क्षेत्रात कार्यरत असून, त्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी शाळा, महाविद्यालयात अशा प्रकारचे उपक्रम राबवत आहे. येथील स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातर्फे आणि उपरोक्त स्वयंसेवी संस्थेचे क्षेत्रीय अधिकारी श्री ओम साखरकर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. व्ही. मोरे यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबामध्ये, गावामध्ये, समाजामध्ये बालविवाह होत असतील तर त्याला अटकाव घालावा. तसेच त्यांचे समुपदेशन करावे. किंव्हा शासनाला सुचित करावे. जेणेकरून बालविवाह होणार नाही. तसेच बालविवाह मुक्तीची सामूहिक शपथ या याप्रसंगी घेण्यात आली. या कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

# वैनगंगेच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** काल मध्यरात्रीपासून वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होऊन पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. धोक्याची पातळी ओलांडल्यानंतर कारधा नदीच्या लहान पुलावरून पाणी शहरातील सखल भागात शिरते. भंडारा शहरात बिटीबी बाजारात पाणी शिरल्याने बाजार बंद आहे. तसेच बिटीबी मार्केटलगत बांधण्यात आलेले शासकीय महिला व बाल रुग्णालयातसुद्धा पुराचे पाणी शिरले आहे.

सध्या आत प्रवेश करता येत नाही.

संपूर्ण रस्त्यावर दवाखान्यासमोर पाणी साचलेले आहे व पाण्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. मात्र आजवर पूर परिस्थिती निर्माण झाली की सरकारी दवाखाना परिसर, अशोका हॉटेल व स्मशान घाट असा सर्व परिसर बुडतो. महिला रुग्णालयासाठी चुकीची जागा निवडण्यात आल्याने पुराच्या वेळी हा दवाखाना बंद ठेवण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या महिला रुग्णालयाचा मुद्दा कायम चर्चेचा विषय ठरतो.

भंडारा शहरांमध्ये तहसील कार्यालयाच्या पुढे ऑफिसर क्लबमध्ये व त्यामागील रोपवाटिका येथे भरपूर प्रमाणात जागा उपलब्ध असताना सरकारी रुग्णालय याच ठिकाणी का बांधण्यात आले, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. येत्या दहा-पंधरा दिवसांमध्ये या रुग्णालयाचे उद्घाटन होणार आहे. त्यामुळे ही चिंतेची बाब आहे.

# राजर्षी शाहू महाविद्यालयास 'बी प्लस' दर्जा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील पाथ्री येथील राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत नॅक मूल्यांकन समितीचा 'बी प्लस' दर्जा प्राप्त झाला आहे. २८ व २९ ऑगस्ट २०२३ रोजी समितीने महाविद्यालयास भेट दिली. या मूल्यांकन समितीमध्ये माजी कुलगुरू डॉ. प्रवीण त्रिवेदी, प्रो. शालिनी सिंग, प्राचार्य डॉ. मनोहर लाल यांनी महाविद्यालयास भेट देऊन मूल्यांकन केले होते. महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेत संस्थाध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर, सचिव उषाताई पाथ्रीकर, उपाध्यक्ष राजेंद्र पाथ्रीकर, सहसचिव वरुण पाथ्रीकर व संस्थेचे इतर पदाधिकारी यांचे महत्त्वाचे योगदान मिळाले. मूल्यांकन यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. कैलास इंगळे, नॅक समितीचे समन्वयक डॉ सुरेश आलोने, उपप्राचार्य डॉ. शशिकांत बंडेवार, डॉ. रश्मीताई पाथ्रीकर, डॉ. सचिन मोरे, डॉ. प्रवीण बेराड, डॉ. राजू पोपळघट, डॉ. शिवाजी उबरहंडे, डॉ. दत्तात्रय फुके, डॉ. राम जाधव, प्रा. किरण धनेधर यांनी समितीचे कामकाज पाहिले. त्याबरोबरच डॉ. बी. टी. शेळके, पाथ्रीकर डी. एफ., डॉ. ठाकरे पी. व्ही., डॉ. लहाने के. एल., डॉ. पोपळघट आर. एस. डॉ. गायकवाड डी. एम., डॉ. उबरहंडे एस. बी. डॉ. जाधव आर. आर. पी. आर. काळे, प्रा. राठोड अजय, डॉ. वाय. बी. गहेराव, डॉ. एस. व्ही. कंटूले, डॉ. टी. बी. दले, डॉ. आर. के. जाधव, डॉ. ए. एस. ठाले, डॉ. टी. बी. कांबळे, डॉ. के. के. वाघ, डॉ. शेलार, कल्याणीताई पाथ्रीकर, सुनील अन्नदाते, नितीन बोडखे, सुनील पंडित, ललित अन्नदाते, दीपक पैठणे आदींचे सहकार्य मिळाले.

# पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांच्या नेतृत्वात शहरात विशेष मोहीम

## एका दिवसात एकूण ७ गुन्हे आणि ५४ खटले/केसेस दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पोलीस स्टेशन लोहा मार्फत शहरातील विविध क्षेत्रातील अवैध धन्यांविषयी विशेष मोहीम हाती घेतली असून यात अवैध ट्राफिक, अवैद्य वाहने पार्किंग, अवैद्य हात गाडी, रोडवर अवैद्य माल ठेवणारे दुकानदार, सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करणारे आशा अनेक अवैद्य धन्यांविष विशेष अंतर्गत कारवाही करण्यात आली.

यावेळी लोहा येथे अवैधपणे मटका/जुगार चालविणाऱ्या दोघांवर पोलिसांनी छापा टाकून महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) प्रमाणे कारवाई करून ०२ गुन्हे दाखल केले आहेत. तसेच अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या दिनेश राठोड लोहा व मुरलीधर पवार पार्डी यांच्यावर छापा टाकून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ कलम ६५ (ई) प्रमाणे २ गुन्हे दाखल केले आहेत.

दरम्यान वारंवार सांगूनही तंबी देऊनही ज्यांनी आपले हातगाडे, दुकान रोडवर लावले व ज्यामुळे ये-जा करणाऱ्या सामान्य नागरिक, वाहनांना अडथळा निर्माण होऊन त्रास होत होता. अशा व्यक्तीवर भारतीय दंड विधान १९६० कलम २८३ प्रमाणे ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर ज्यांनी दुकानदारांनी आपल्या ताब्यातील दुकानाचा माल रोड लगत नाल्याच्या अलीकडे सार्वजनिक जागेत सर्वसामान्य नागरिकांना अडथळा होईल अशा पद्धतीने धोकादायकरीत्या ठेवला आणि अडचण निर्माण केली अश्या व्यक्तींवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १०२/११७ प्रमाणे २१ केसेस दाखल केल्या असून याबाबत खटला कोर्टात पाठवण्यात येणार असल्याची तसेच आपल्या ताब्यातील वाहने शहरातील मुख्य रस्त्यावर अस्ताव्यस्त ठेवून रहदारीस अडचण करणारे वाहन चालक, ट्रिपल सीट वाहन चालविणारे, रॉंग साईड वाहन उभे करणारे, रॉंग साईड वाहन चालविणारे, विना नंबर वाहन चालविणारे अशा वाहनाची चेकिंग करून मोटार वाहन कायदा १९८८ प्रमाणे २३ केसेस दाखल करून १०,७०० रुपयाचा दंड आकरण्यात आला आहेत.

तसेच सार्वजनिक ठिकाणी, कॉलेज, शाळा, क्लासेस परिसरात विनाकारण फिरणारे, रोडवर गैरवर्तणूक करणारे रोड रोमियो, भाई दादा बॉस यांच्या विरोधात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ११०,११२/११७ प्रमाणे १० केसेस दाखल केल्या असल्याची माहिती पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही पोलीस निरीक्षक



लोहा पोलीस स्टेशन विशेष मोहीम. १) दारूबंदी केसेस – २ गुन्हे. २) मटका/जुगार – २ गुन्हे. ३) ipc २८३ रोडवर वहाणे – ३ गुन्हे. ४) दुकानातील सामान रोडवर ठेवून अडथळा १०२/११७ – केसेस/ कोर्ट खटले – २१. ५) सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करणे ११०/११२/११७ – १० केसेस दाखल. ६) ट्राफिक केसेस – २३. १०,७०० दंड.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर